




# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठीत सवय

■ अमरावती, शनिवार १६ मे २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०


# पेट्रोल-डिझेलमध्ये 3 रुपयांची वाढ

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** देशभरातील सर्वसामान्यांच्या खिशाला आज पुन्हा एकदा महागाईची झळ बसली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती आणि जागतिक तणावाचे कारण देत तेल विपणन कंपन्यांनी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर ३ रुपयांची मोठी वाढ केली आहे. विशेष म्हणजे, देशात तब्बल चार वर्षांच्या प्रदीर्घ काळानंतर इंधन दरात इतकी मोठी वाढ करण्यात आली आहे.



शुक्रवारी पहाटे ६ वाजल्यापासून लागू झालेल्या नवीन दरांनुसार, देशाची राजधानी दिल्लीमध्ये पेट्रोलची किंमत ९७.७७ रुपये प्रति लिटरवर पोहोचली असून डिझेल ९०.६७ रुपये प्रति लिटर झाले आहे. मुंबई, कोलकाता आणि चेन्नईसह देशातील सर्व प्रमुख शहरांमध्येही इंधन दरात मोठी वाढ झाली आहे. काही शहरांत राज्य स्तरावरील कर आणि व्हॅटमुळे ही वाढ ३ रुपयांपेक्षा अधिक नोंदवली गेली आहे.आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्माण झालेल्या प्रतिकूल परिस्थितीमुळे ही दरवाढ अपरिहार्य असल्याचे कंपन्यांचे म्हणणे आहे. गेल्या काही दिवसांपासून आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत सातत्याने वाढ होत होती. मध्यपूर्वेतील वाढता तणाव, पुरवठा साखळीवरील दबाव आणि अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपयाची होणारी घसरण यामुळे भारतीय तेल कंपन्यांवर मोठा आर्थिक ताण निर्माण झाला होता. केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी काही दिवसांपूर्वीच तेल कंपन्यांना दररोज हजारो कोटींचा तोटा होत असल्याचे संकेत दिले होते.इंधन दरवाढीचा हा निर्णय केवळ वाहनधारकांसाठीच नाही, तर सर्वसामान्यांच्या संपूर्ण घरगुती बजेटवर परिणाम करणारा ठरणार आहे.

### पंतप्रधान मोदी म्हणाले होते इंधनाचा वापर कमी करा

*पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी तेलंगणामध्ये एका कार्यक्रमादरम्यान पश्चिम आशियातील भू-राजकीय परिस्थिती लक्षात घेउन पेट्रोलियम उत्पादनांचा काळजीपूर्वक वापर करण्याचा सल्ला दिला होता. पंतप्रधानांनी म्हटले होते की, आज काळाची गरज आहे की पेट्रोल, गॅस आणि डिझेलचा वापर अत्यंत संयमाने केला जावा. आपण आयात केलेल्या पेट्रो उत्पादनांचा वापर केवळ गरजेनुसारच केला पाहिजे. यामुळे केवळ परकीय चलनच वाचणार नाही, तर युद्धाचे प्रतिकूल परिणामही कमी होतील.*

मालवाहतुकीचा खर्च वाढल्यामुळे आगामी दिवसात भाजीपाला, दूध, किराणा आणि इतर अत्यावश्यक वस्तूंच्या किमती वाढण्याची शक्यता व्यापारी आणि ग्राहकांकडून व्यक्त होत आहे. अर्थतज्ज्ञांच्या मते, इंधन महागल्यामुळे आगामी काही आठवड्यांत महागाईचा दर आणखी वाढू शकतो.गेल्या चार वर्षांपासून सरकारने जागतिक स्तरावर तेलदर वाढलेले असूनही ग्राहकांना दिलासा देण्यासाठी देशांतर्गत दर स्थिर ठेवले होते. मात्र आता वाढत्या आंतरराष्ट्रीय दबावामुळे आणि तेल कंपन्यांचा तोटा भरून काढण्यासाठी इंधन दरवाढ करणे अपरिहार्य झाले असल्याचे मानले जात आहे. या निर्णयामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण पाहायला मिळत आहे.

# *NEET* परीक्षा आता हायटेक! पुढच्या वर्षापासून परीक्षा ऑनलाइन होणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** वैद्यकीय प्रवेशासाठी घेतली जाणारी नीट (NEET-UG) परीक्षा आता कात टाकणार आहे. गेल्या काही दिवसांपासून गाजत असलेल्या पेपरफुटीच्या प्रकरणांनंतर केंद्र सरकारने




एक ऐतिहासिक आणि मोठा निर्णय घेतला आहे. पुढील वर्षापासून (२०२७) NEET परीक्षा पूर्णपणे ऑनलाइन (Computer Based Test CBT) पद्धतीने घेतली जाईल. त्यामुळे आता विद्यार्थ्यांना पेन-पेपर आणि ग्रेड शीटद्वारे परीक्षा देण्याची गरज उरणार नाही.

**शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांची घोषणा-**NEET परीक्षेच्या फेरपरीक्षेची (Re-exam) घोषणा केल्यानंतर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले की, परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी आणि कोणताही गैरप्रकार रोखण्यासाठी आम्ही तंत्रज्ञानाचा वापर करणार आहोत. पुढील वर्षापासून ओएमआर शीट पद्धत बंद करून परीक्षा ऑनलाइन घेतली जाईल.

**महत्त्वाचे बदल-**ऑफलाइन पद्धतीत होणारी प्रश्नपत्रिकांची गळती आणि फेरफार रोखण्यासाठी ऑनलाइन मोड हा सर्वात सुरक्षित पर्याय असल्याचे सरकारने मानले आहे. यापूर्वी विद्यार्थ्यांना गोल रंगवण्यासाठी OMR शीट दिली जात असे, ज्यामुळे निकालाला उशीर होत असे. आता संगणकीय पद्धतीमुळे निकाल प्रक्रिया अधिक वेगवान होणार आहे. ३ मे २०२६ रोजी झालेली परीक्षा रद्द झाल्यानंतर, आता ही फेरपरीक्षा २१ जून २०२६ रोजी घेतली जाणार आहे. फेरपरीक्षेसाठी १४ जूनपर्यंत प्रवेशपत्रे उपलब्ध होतील. तसेच, विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचे परीक्षा केंद्र निवडण्याची मुभा देण्यात आली आहे.

**झिरो टालरन्स धोरण-**शिक्षणमंत्र्यांनी स्पष्ट केले की, सरकार परीक्षा माफियांच्या विरोधात झिरो टालरन्स (शून्य सहनशीलता) धोरण राबवत आहे. या संपूर्ण प्रकरणाचा तपास सीबीआय कडे सोपवण्यात आला असून, दोषी आढळणा-यांवर कठोर कारवाई केली जाईल. तंत्रज्ञानाच्या या बदलामुळे भविष्यात लाखो विद्यार्थ्यांचे नुकसान टळेल आणि परीक्षेची विश्वासार्हता कायम राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# 21 जून रोजी देशभरात फेरपरीक्षा

**नवी दिल्ली :** वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न पाहणा-या लाखो विद्यार्थ्यांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सी (NTA) NEET (UG) २०२६ परीक्षेची नवीन तारीख अधिकृतपणे जाहीर केली असून, आता ही परीक्षा २१




जून २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार आहे. पेपरफुटीच्या गंभीर प्रकरणानंतर ३ मे रोजी घेण्यात आलेली परीक्षा रद्द करण्यात आली होती. त्यानंतर केंद्र सरकारच्या मंजुरीनंतर ही फेरपरीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.NTA कडून जारी करण्यात आलेल्या माहितीनुसार, परीक्षा देशभरात एकाच वेळी आणि कडक सुरक्षा व्यवस्थेत पार पडणार आहे. २१ जून हा रविवार असल्याने परीक्षा केंद्रांवर विशेष पोलीस बंदोबस्त, सीसीटीव्ही देखरेख आणि तपासणी व्यवस्था ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांना कोणतीही गैरसोय होउ नये यासाठी प्रशासनाने तयारी सुरू केली आहे. दरम्यान, सोशल मीडियावर परीक्षा संदर्भात अनेक अफवा आणि भ्रामक संदेश व्हायरल होत असल्याने NTA ने विद्यार्थी आणि पालकांना सावध राहण्याचे आवाहन केले आहे. केवळ अधिकृत वेबसाईट आणि अधिकृत सूचनांवरच विश्वास ठेवावा, असे स्पष्ट करण्यात आले आहे. कोणत्याही अनधिकृत लिंक, मेसेज किंवा सोशल मीडिया पोस्टवर विश्वास ठेवू नये, असा इशाराही देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांसाठी पुढील काही आठवडे अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहेत. तज्ज्ञांच्या मते, आता नवीन अभ्यास सुरू करण्याऐवजी रिव्हिजन, मागील प्रश्नपत्रिका आणि माक टेस्ट सोडवण्यावर भर द्यावा. वेळेचे योग्य नियोजन आणि सातत्यपूर्ण सराव विद्यार्थ्यांसाठी फायदेशीर ठरणार आहे. परीक्षा केंद्रांची माहिती, प्रवेशपत्र आणि इतर आवश्यक सूचना विद्यार्थ्यांच्या नोंदणीकृत मोबाईल नंबर आणि ईमेलवर लवकरच पाठवण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण आल्यास NTA च्या हेल्पलाइन क्रमांकांवर संपर्क साधता येणार आहे. NEET UG 2026 परीक्षेच्या नव्या तारखेच्या घोषणेमुळे विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा तयारीसाठी संधी मिळाली असून, आता सर्वांचे लक्ष २१ जून रोजी होणा-या या महत्त्वाच्या परीक्षेकडे लागले आहे.

# शिवसेना चिन्ह आणि पक्षाच्या सुनावणीत कोर्टाने ठाकरे गटाला फटकारले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** शिवसेना पक्ष आणि चिन्ह प्रकरणाशी संबंधित याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात शुक्रवारी (१५ मे) सुनावणी पार पडली. या सुनावणीमध्ये सरन्यायाधीश सुर्य कांत यांनी ठाकरे गटाचे वकील देवदत्त कामत यांना चांगलेच सुनावल्याचे समोर आले आहे. ठाकरे गटाच्या वकिलांनी जेव्हा सरन्यायाधीशांना त्यांच्या सोयीनुसार या प्रकरणाची तारीख लवकरात लवकर निश्चित करण्याची विनंती केली, तेव्हा न्यायालयाने संतप्त भावना व्यक्त केल्या. न्यायालयात एकीकडे तारखेची मागणी करायची आणि दुसरीकडे बाहेर जाउन न्यायालयाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करायचे, अशी भूमिका खपवून घेतली जाणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. ठाकरे गटाच्या नेत्यांच्या वक्तव्यांवरुन न्यायालयाने थेट आक्षेप घेतला आहे. तसेच, या प्रकरणातील पुढील सुनावणी ही ३० जुलै रोजी होईल, असे सांगण्यात आले आहे.सरन्यायाधीशांनी ठाकरे गटाच्या वकिलांना खडसावताना सांगितले की, सर्वप्रथम तुम्ही तुमच्या लोकांना माध्यमांसमोर जाउन सर्वोच्च न्यायालय निर्णय घेत नसल्याची बेजबाबदार विधाने करण्यापासून रोखा. तुम्ही येथे न्यायालयात तारखेची मागणी करता आणि बाहेर जाउन न्यायालय काम करत नसल्याचे भासवता. यापुढे




न्यायालयाच्या कामकाजाबाबत शब्द वापरताना काळजी घ्या, कारण मी अशा प्रकारचे वर्तन स्वीकारणारा व्यक्ती नाही, अशा कडक शब्दांत सरन्यायाधीशांनी आपली नाराजी उघडपणे व्यक्त केली.

**ठाकरेंचे वकिल काय म्हणाले?**

वरिष्ठ वकील देवदत्त कामत यांनी युक्तिवाद करताना, हे प्रकरण आज केवळ दिशानिर्देशांसाठी यादीत ठेवण्यात आले होते आणि आम्ही लवकर सुनावणीची अपेक्षा करत आहोत, असे न्यायालयाला सांगितले.त्यावर सरन्यायाधीशांनी आपली भूमिका स्पष्ट करताना, आम्ही दोन्ही बाजूंनी सहकार्य अपेक्षित करतो. आम्ही तारखाही निश्चित करू. मात्र कोणत्याही टप्प्यावर झालेल्या विलंबाबाबत अशा प्रकारची बेजबाबदार विधाने होणे योग्य नाही, असे सांगितले. कामत यांनी पुढे सांगितले की, आम्ही गेल्या ३ वर्षांपासून या निर्णयाची प्रतीक्षा करत आहोत. आम्हाला फक्त योग्य वेळ मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. मात्र, न्यायालयाने अत्यंत कडक शब्दांत नाराजी व्यक्त केल्यामुळे आता पुढील काळात ठाकरे गटाचे नेते वक्तव्ये करणे टाळतात का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

**शिंदे गटाच्या वकिलांनी काय म्हंटले?-**दरम्यान, ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी यांनी, न्यायालयावर किती दबाव आहे हे आम्हाला माहिती आहे. आमच्या बाजूने अशा प्रकारची कोणतीही वक्तव्ये करण्यात आलेली नाहीत. कोणत्याही बाजूने असे विधान होउ नये. न्यायालयाने सर्व पक्षांबाबत संयम दाखवला आहे आणि कोणत्याही पक्षाला न्यायालयावर असा आरोप करण्याचा अधिकार नाही, या विधानावर आपलं मत मांडताना म्हटलं.






# बेरोजगार तरूण झुरळांसारखे: CJI

### हे मीडिया, सोशल मीडिया आणि आरटीआय कार्यकर्ते बनून सिस्टीमवर हल्ला करतात



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांनी एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान देशातील बेरोजगार तरुणांना झुरळ म्हटले. ते म्हणाले- काही बेरोजगार तरुण झुरळांसारखे असतात, जे नंतर मीडिया, सोशल मीडिया किंवा आरटीआय कार्यकर्ते बनून व्यवस्थेवर हल्ला करू लागतात.मुख्य न्यायाधीश आणि न्यायमूर्ती ज?यमाल्या बागची यांच्या खंडपीठाने शुक्रवारी एका वकिलाच्या याचिकेवर सुनावणी केली, ज्यात त्याने वरिष्ठ वकील (सीनियर अॅडव्होकेट) दर्जा मिळवण्याची मागणी केली होती. खंडपीठाने वकिलाला फटकारत म्हटले- समाजात आधीच परजीवी (पॅरासाइट) आहेत, जे व्यवस्थेवर हल्ला करतात.खंडपीठाने म्हटले की, जगात प्रत्येकजण वरिष्ठ होण्यास पात्र असू शकतो, परंतु तुम्ही त्याचे हक्कदार नाही. जर दिल्ली उच्च न्यायालयाने तुम्हाला वरिष्ठ वकील (सीनियर अॅडव्होकेट) बनवले तरी, सर्वोच्च न्यायालय तुमच्या वर्तनाकडे पाहून तो निर्णय रद्द करेल.

कोर्टाने विचारले की, याचिकाकर्त्याकडे दुसरे कोणतेही प्रकरण नाही का आणि हे एखाद्या वरिष्ठ वकील बनण्याची इच्छा असलेल्या व्यक्तीचे योग्य वर्तन आहे का. वरिष्ठ वकिलाचा दर्जा दिला जातो, तो स्वत?हून मिळवण्याचा प्रयत्न केला जात नाही.बेंचने प्रश्न केला की, तुम्ही हे मिळवण्यामागे लागला आहात, हे योग्य वाटते का. सर्वोच्च न्यायालय अनेक वकिलांच्या पदवीची सीबीआय कडून चौकशी करण्यावर विचार करू शकते, कारण त्यांच्या पदवीच्या सत्यतेवर गंभीर प्रश्न आहेत. बार कौन्सिल ऑफ इंडिया यावर काहीही करणार नाही, कारण त्यांना मते हवी आहेत.सुनावणीच्या शेवटी याचिकाकर्त्याने न्यायालयाची माफी मागितली आणि आपली याचिका मागे घेण्याची परवानगी मागितली. न्यायालयाने याचिका मागे घेण्यास परवानगी दिली.

सर्वोच्च न्यायालय म्हणाले- दोन एअरलाईनचे भाडे वेगवेगळे का?

सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी सांगितले की, एकाच दिवशी, एकाच सेक्टरमध्ये उड्डाण करणारी एक एअरलाइन काही वेगळे हवाई भाडे आकारते, तर दुसरी एअरलाइन वेगळे भाडे आकारते. हे दुरुस्त केले पाहिजे. केंद्र सरकारने प्रवाशांना दिलासा द्यावा.खरं तर, न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने सामाजिक कार्यकर्ते एस. लक्ष्मीनारायणन यांच्या याचिकेवर सुनावणी केली. त्यांची मागणी आहे की, देशात एक मजबूत आणि स्वतंत्र नियामक (रेगुलेटर) तयार केला जावा, जो एअरलाइन्सच्या भाड्यावर आणि अतिरिक्त शुल्कावर लक्ष ठेवेल

## टरबूज खाल्ल्याने वडिलांचा मृत्यू, मुलाची प्रकृती चिंताजनक

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** मध्यप्रदेशातील श्योपूर जिल्ह्यातून एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. येथे टरबूज



खाल्ल्याने एकाचा मृत्यू झाला तर एक जण गंभीर आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर बाजारात विकल्या जाणा-या टरबूजांच्या गुणवत्तेवरच मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. त्यात विषारी घटक अथवा घातक रसायने असण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे. मात्र, मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतरच समोर येईल. दरम्यान, प्रशासकीय यंत्रणा आणि आरोग्य विभाग सक्रिय झाला असून प्रकरणाचा तपास सुरू करण्यात आला आहे. मूळचे शाजापूर जिल्ह्यातील ४३ वर्षीय इंद्र कुमार परिहार ➪ (पान २ वर)

# मान्सून 26 मे रोजी केरळममध्ये पोहोचणार

**नवी दिल्ली/भोपाळ/जयपूर/लखनउ/वृत्तसंस्था-**हवामान विभागाने शुक्रवारी सांगितले की, मान्सून केरळममध्ये २६ मे रोजी दाखल होउ शकतो. साधारणपणे मान्सून १ जूनच्या आसपास केरळममध्ये पोहोचतो, त्यानंतर देशाच्या इतर भागांना व्यापण्यासाठी उत्तरेकडे सरकतो. गेल्या वर्षी मान्सून २४ मे रोजी आला होता.२०२५ मध्ये सामान्यपेक्षा ८% जास्त पाउस झाला होता. ३० सप्टेंबर २०२५ रोजी हवामान विभागाने (IMD) सांगितले होते की, देशभरात सामान्यपेक्षा ८ टक्के अधिक पाउस (९३७.२ मिमी) नोंदवला गेला. IMD प्रमुख मृत्युंजय महापात्रा यांनी याला खूप यशस्वी हंगाम म्हटले होते. देशाच्या अनेक भागांमध्ये अजूनही पाउस सुरू आहे. उत्तर प्रदेशात बुधवारी वादळ आणि पावसाने मोठी हानी केली. राज्यात १११ लोकांचा मृत्यू झाला. सर्वाधिक २१ मृत्यू प्रयागराजमध्ये आणि १७ मृत्यू भदोहीमध्ये झाले. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनीही या मृत्यूंबद्दल दुख व्यक्त केले. दुसरीकडे, देशाचा अर्ध्याहून अधिक भाग उष्णतेच्या लाटेच्या विळख्यात आहे. महाराष्ट्र, राजस्थान, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशातील अनेक शहरांमध्ये गुरुवारी तापमान ४०°C च्या वर नोंदवले गेले. महाराष्ट्रातील अकोला ४५.९°C सह देशातील सर्वात उष्ण शहर ठरले. जळगाव, वर्धा आणि अमरावतीमध्येही पारा ४५°C च्या वर नोंदवला गेला. राजस्थानमधील ➪ (पान २ वर)



# नीट पेपरफुटी प्रकरणात पुण्यातील केमिस्ट्रीच्या प्राध्यापकाला अटक

### *सीबीआयने मास्टरमाईंड असल्याचे सांगितले*

**नवी दिल्ली-** NEET (UG) पेपर लीक प्रकरणात शुक्रवारी ८वी अटक झाली. पुण्यातील रसायनशास्त्राचे प्राध्यापक पी.व्ही. कुलकर्णी यांच्यावर आरोप आहे की, त्यांनी परीक्षेपूर्वी विद्यार्थ्यांना प्रश्न आणि त्यांची योग्य उत्तरे सांगितली होती.सीबीआय कुलकर्णी यांनाच लीक प्रकरणाचा सूत्रधार (मास्टरमाइंड) सांगत आहे. तपास यंत्रणेनुसार, कुलकर्णी लातूरचे रहिवासी आहेत. ते रसायनशास्त्राचे डोमेन एक्सपर्ट आहेत. अनेक वर्षांपासून ते NEET पेपर तयार करणा-या पॅनेलचा भागही होते.कुलकर्णी यांना पेपरपर्यंत थेट पोहोच होती. ते पुण्यात त्यांच्या घरी कोचिंग क्लास चालवत होते. जिथे ते NEET पेपरमध्ये येणा-या प्रश्नांची उत्तरे उमेदवारांना आधीच सांगत होते. ३ मे च्या पेपरपूर्वी एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात आरोपी मनीषा वाघमारेच्या मदतीने अनेक विद्यार्थ्यांना लीक झालेला पेपर दिला.दरम्यान, पेपरफुटीमुळे दुःखी झालेल्या दिल्लीतील २० वर्षीय तरुणीने, उत्तर प्रदेशातील लखीमपूर खेरी येथील २१ वर्षीय तरुणाने आणि गोव्यातील १७ वर्षीय मुलाने गळफास घेउन आत्महत्या केली आहे. ➪ (पान २ वर)



### होर्मुझ तणाव; भारताचा मोठा निर्णय

# ओमान-UAE पर्यंत अंथरणार 'पाइपलाइन'

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-**अमेरिका आणि इराण संघर्षामुळे 'स्ट्रेट ऑफ होर्मुझ'मधील तणावही प्रचंड वाढला आहे. यामुळे संपूर्ण जगभरातच मोठे इंधन संकट निर्माण झाले आहे. परिणामी बाजारातही मोठी अस्थिरता दिसून येत आहे. या संपूर्ण पार्श्वभूमीवर आता भारताने




आपल्या उर्जा सुरक्षेसाठी एक अत्यंत महत्वाचा आणि महत्त्वाकांक्षी निर्णय घेतला आहे. आखाती देशांकडून होणारा नैसर्गिक वायू (Gas) पुरवठा अखंडपणे सुरू रहावा, यासाठी आता भारत थेट खोल समुद्रात पाइपलाइन अंथरणार आहे. या योजनेवर वेगाने कामही सुरू झाले आहे. या योजनेमुळे भारताचे अस्थिर एलएनजी स्पाट मार्केटवरील अवलंबित्वही कमी होईल. ➪ (पान २ वर)

# राज्याच्या पोलीस दलात मोठा फेरबदल

### *नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक दत्ता कराळे यांची बदली*

**मुंबई/प्रतिनिधी-**मुख्यमंत्री देवेंद्र यांनी पोलीस दलात मोठ्या प्रमाणात फेरबदल करण्याचा निर्णय घेतला असून शुक्रवारी गृह विभागांतर्गत वरिष्ठ पोलीस अधिका-यांच्या बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले.गृह विभागाने अप्पर पोलीस महासंचालक आणि विशेष पोलीस महानिरीक्षक श्रेणीतील अनेक अधिका-यांच्या बदल्या व पदोन्नतीचे आदेश निर्गमित केले असून संबंधित अधिका-यांना तातडीने नव्या ठिकाणी रुजू होण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.आज जाहीर करण्यात आलेल्या बदल्यांमध्ये कृष्ण प्रकाश यांची अप्पर पोलीस महासंचालक, फोर्स वन पदावरून अप्पर पोलीस महासंचालक (प्रशिक्षण) पदावर बदली ➪ (पान २ वर)



# न्यायालयाच्या कर्मचा-यांना 2 दिवस वर्क फ्रॉम होम

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-**पंतप्रधान मोदींच्या इंधन बचतीच्या आवाहनावर शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयाने कामकाजासंदर्भात नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. आता न्यायालयाच्या प्रत्येक विभागातील कर्मचारी दोन दिवस वर्क फ्राम होमवर असतील. सर्व न्यायाधीश कार पूल करतील. रजिस्ट्रीशी संबंधित ५० टक्के कर्मचारी देखील घरून काम करतील.सोमवार, शुक्रवार आणि मिसलेनियस डे (जे दिवस आधीपासून निश्चित नसतात) रोजी सूचीबद्ध प्रकरणांची सुनावणी केवळ व्हिडिओ कान्फरन्सिंगद्वारे होईल. याव्यतिरिक्त न्यायालयाच्या इतर कामकाजाच्या दिवशीही सुनावणी ऑनलाइनच केली जाईल. न्यायालयाने रजिस्ट्री विभागाला निर्देश दिले आहेत की व्हिडिओ कान्फरन्सिंग लिंक वेळेवर पाठवावी आणि तांत्रिक सहाय्य (टेक्निकल सपोर्ट) नेहमी उपलब्ध असावे, जेणेकरून ➪ (पान २ वर)



पान १ व १० वरून

## मान्सून 26 मे रोजी

फलोदीमध्ये तापमान ४५.२°C, जैसलमेर आणि बाडमेरमध्ये ४५.१°C नोंदवले गेले. श्रीगंगानगरमध्ये ४४.८°C आणि जोधपूरमध्ये ४४°C तापमान होते. जयपूर, बिकानेर आणि नागौरमध्ये दिवसभर उष्णतेच्या लाटेसारखी परिस्थिती राहिल्यानंतर संध्याकाळी पाउस पडला. यामुळे उष्णतेपासून थोडा दिलासा मिळाला.

यावर्षी मान्सूनचा पाउस सामान्यपेक्षा कमी राहू शकतो. खासगी हवामान संस्था स्कायमेट वेदरने यावर्षीच्या मान्सूनचा अंदाज जारी केला आहे. त्यानुसार, पाउस सामान्यपेक्षा ६ऽ कमी राहू शकतो.जून ते सप्टेंबर या मान्सूनच्या ४ महिन्यांत देशात पावसाची सामान्य सरासरी ८६८.६ मिलीमीटर आहे. सामान्यपेक्षा कमी मान्सूनचा अर्थ असा आहे की, पाउस ९०ऽ ते ९५ऽ च्या दरम्यान राहील. संस्थेने ९४ऽ पावसाचा अंदाज दिला आहे.जूनमध्ये सामान्य पाउस होईल, परंतु जुलैपासून घट सुरू होउन ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये मान्सून कमकुवत होईल. विशेषत? ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये पावसाची कमतरता जास्त राहण्याची चिन्हे आहेत.मध्य आणि पश्चिम भारताच्या मुख्य भागांमध्ये पाउस कमी राहण्याची शक्यता आहे. ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये मध्य प्रदेश, पंजाब, हरियाणा आणि राजस्थानमध्ये सामान्यपेक्षा कमी पावसाची शक्यता आहे.

**१६ मे**:पंजाब, हरियाणा, दिल्ली, राजस्थान आणि पश्चिम यूपीमध्ये पाउस, सोसाट्याचा वारा वाहू शकतो.जम्मू-काश्मीर, हिमाचल आणि उत्तराखंडमध्ये पावसासोबत गारपीट होउ शकते. डोंगराळ भागात सोसाट्याचा वाराही वाहू शकतो.बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, छत्तीसगड आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये पावसासोबत वीज कोसळण्याचा इशारा आहे.

**१७ मे**:राजस्थानमध्ये तीव्र उष्णतेच्या लाटेचा इशारा आहे. रात्रीही उष्ण राहतील. छत्तीसगड, हरियाणा, दिल्ली, मध्य प्रदेश, पंजाब, तेलंगणा, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रातही उष्णतेची लाट राहील.आंध्र प्रदेश, बिहार, छत्तीसगड, कर्नाटक, केरळम, आसाम, मेघालय, अरु णाचल प्रदेश, पश्चिम बंगाल आणि ओडिशा येथे विजांच्या कडकडाटासह आणि सोसाट्याच्या वा?्यासह खराब हवामानाचा इशारा आहे.आसाम, मेघालय, केरळम, नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा, कर्नाटक आणि तामिळनाडूमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज आहे.

०००

## नीट पेपरफुटी प्रकरणात पुण्यातील

**टेलीग्राम ग्रुपवर लीक झालेला पेपर शेअर झाला होता-**सीबीआयच्या तपासात हे देखील समोर आले आहे की, NEET २०२६ चा पेपर १ मे रोजीच लीक झाला होता. तो 'प्रायव्हेट माफिया' नावाच्या टेलीग्राम ग्रुपवर टाकला गेला होता. याचा एक व्हिडिओ देखील समोर आला आहे. मात्र, दिव्य मराठी असा दावा करत नाही की ग्रुपमध्ये टाकलेला पेपर NEET चा लीक झालेला पेपरच आहे. टेलीग्राम ग्रुपवर १ मे रोजी रात्री सुमारे ११:३० वाजता टाकलेल्या पेपरची PDF फाईल उघडल्यावर १२ नंबरचा सेट दिसतो. याची पडताळणी करण्यासाठी आम्ही NEET SII सेट नंबर-१२ चा पेपर काढला. NEET च्या पेपरमध्ये प्रश्न क्रमांक ५ मध्ये एका चेंडूच्या उभ्या दिशेने वर जाण्याबद्दल आणि परत येण्याबद्दल वेग आणि वेळ दर्शवण्यासाठी आकृती तयार करण्यात आली आहे. हा प्रश्न लीक झालेल्या पेपरमध्ये आणि मूळ पेपरमध्ये १००% जुळत आहे. या पानातील इतर प्रश्न देखील पूर्णपणे जुळत आहेत.

## ओमान-UAE पर्यंत अंथरणार

**या महाप्रकल्पासाठी किती खर्च अपेक्षित -** 'द इकोनामिक टाइम्स'च्या वृत्तानुसार, ओमान ते भारतापर्यंत प्रस्तावित या पाइपलाइनचा अंदाजित खर्च सुमारे ४०००० कोटी रुपये अथवा ४.७ ते ४.८ अब्ज डालर्स एवढा असणार आहे. तसेच हा प्रकल्प पूर्ण होण्यासाठी ५ ते ७ वर्षांचा कालावधी लागणे अपेक्षित आहे. यासंदर्भात, पेट्रोलियम मंत्रालय 'गेल', 'इंजिनियर्स इंडिया' आणि 'इंडियन ऑइल' यांसारख्या सरकारी कंपन्यांना खाजगी कन्सोर्टियम 'SAGE' ने केलेल्या अभ्यासाच्या आधारे सविस्तर अहवाल तयार करण्यास सांगणार आहे. या अहवालामुळे ओमानसोबत गॅस पुरवठा आणि निधीबाबत औपचारिक सरकारी चर्चा करणे सोपे होईल.

**समुद्राखालून २४०० किमीचा प्रवास-**ही पाइपलाइन भू-राजकीयदृष्ट्या संवेदनशील भाग टाळून ओमान आणि संयुक्त अरब अमिराती (UAE) मार्गे अरबी समुद्रातून भारतात येईल. या पाइपलाइनद्वारे भारताला ओमानसह सौदी अरब, इराण, कतार आणि तुर्कमेनिस्तान यांसारख्या वायू साठा संपन्न देशांकडून गॅस मिळवता येईल. विशेष म्हणजे, ही पाइपलाइन समुद्रसपाटीपासून ३,४५० मीटर खोलीवर बिछवली जाउ शकते, ज्यामुळे ती जगातील सर्वात खोल समुद्री पाइपलाइनपैकी एक ठरेल.२८ फेब्रुवारी रोजी इस्त्रायल आणि अमेरिकेने इराणवर केलेल्या हवाई हल्ल्यांनंतर इराणने होर्मुझ समुद्रधुनी जवळपास बंदच केली आहे. यामुळे जागतिक उर्जा बाजार विस्कळीत झाला आहे. इराणला जेरीस आणण्यासाठी अमेरिकेनेही इराणची नौदलाद्वारे नाकेबंदी केली आहे. अशा परिस्थितीत, होर्मुझवर अवलंबून न राहता गॅसचा अखंड पुरवठा व्हावा यासाठी भारताचा हा निर्णय अत्यंत धोरणात्मक मानला जात आहे.

## राज्याच्या पोलीस दलात मोठा

करण्यात आली आहे.तसेच दत्ता कराळे यांची विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र येथून विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य मानवी हक्क आयोग येथे बदली करण्यात आली आहे. तर प्रवीण पडवळ नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक असणार आहेत.राज्य सरकारच्या या मोठ्या प्रशासकीय निर्णयामुळे पोलीस दलातील कामकाजात वेग आणि शिस्त वाढवण्याचा प्रयत्न असल्याची चर्चा प्रशासनात सुरू आहे. वरिष्ठ पातळीवरील या बदल्यांनंतर आणखी काही अधिका-यांच्या बदल्यांची शक्यता व्यक्त केली जात आहे.तेजस्वी सातपुते यांची पुण्याच्या गुन्हे शाखेचे अप्पर पोलीस आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे, मात्र खरात प्रकरणातील एसआयटीचा तपास सातपुते यांच्याकडेच राहणार असल्याची माहिती समोर आली आहे. मोक्षदा पाटील यांची अप्पर पोलीस आयुक्त मुंबई येथे नियुक्ती करण्यात आली आहे. योगेश गुप्ता यांची गडचिरोलीच्या पोलीस उपमहानिरीक्षपदी बदली करण्यात आली आहे.

## न्यायालयाच्या कर्मचा-यांना

न्यायालयाच्या कामकाजावर परिणाम होणार नाही. सर्वोच्च न्यायालयाचे सचिव जनरल भारत पराशर यांनी या संदर्भात परिपत्रक (सर्कुलर) जारी केले आहे.

**पंतप्रधानांच्या आवाहनाचा राज्यांवरही परिणाम-**पंतप्रधान मोदींच्या पेट्रोल-डिझेल वाचवण्याच्या आवाहनाचा परिणाम देशातील राज्यांमध्येही दिसू लागला आहे. शुक्रवारी केरळचे मुख्यमंत्री होणार असलेले व्ही.डी. सतीशन यांनी पदभार स्वीकारण्यापूर्वीच आपल्या ताफ्यात केवळ तीन गाड्या ठेवण्याचा निर्णय घेतला आहे, ज्यात फक्त एक पायलट आणि एक एस्कार्ट वाहन असेल.

एक दिवसापूर्वी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गुरुवारी एमएलसी शपथविधी समारंभासाठी बाईकने विधान भवनात पोहोचले होते. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी पेट्रोल-डिझेलच्या बचतीसाठी नवीन आदेश जारी केले. आता दिल्लीत सरकारी कर्मचारी आठवड्यातून २ दिवस 'वर्क फ्राम होम' करतील.५०ऽ सरकारी बैठका ऑनलाइन होतील आणि कोणताही मंत्री १ वर्षापर्यंत परदेशी दौ-यावर जाणार नाही. त्रिपुरामध्ये गट क आणि ड चे फक्त ५०ऽ सरकारी कर्मचारीच दररोज कार्यालयात येतील, बाकीचे कर्मचारी वर्क फ्राम होम करतील.

पंजाबमध्ये राज्यपाल कार्यालयात दर बुधवारी अधिकारी चारचाकी वाहनाने येणार नाहीत. हरियाणात मुख्यमंत्री नायब सिंह सैनी आठवड्यातून एक दिवस गाडीशिवाय फिरतील. पंतप्रधान मोदीही बुधवारी ताफा सोडून फक्त २ गाड्यांसह निघाले. तर गृहमंत्री अमित शहा यांच्या ताफ्यात ४ गाड्या दिसल्या होत्या.

पंतप्रधानांच्या आवाहनानंतर १३ राज्यांमध्ये सरकार-नेत्यांचे निर्णय

१. ओडिशाः मुख्यमंत्र्यांनी ताफ्यातील गाड्या कमी केल्या

ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन माझी यांनी आपल्या ताफ्यातील गाड्या कमी केल्या आहेत. त्यांच्या ताफ्यात फक्त चार गाड्या आहेत, ज्यात दोन पोलिसांच्या गाड्यांचा समावेश आहे.

२. अरुणाचल प्रदेशः मंत्री-सरकारी अधिका-यांच्या परदेश दौ-यांवर बंदीअरुणाचल प्रदेश सरकारने खर्च कमी करण्यासाठी पुढील एक वर्षासाठी मंत्री आणि सरकारी अधिका-यांच्या परदेश दौ-यांवर पूर्णपणे बंदी घातली आहे. याव्यतिरिक्त, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि इतर मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या ५०ऽ पर्यंत कमी करण्याचे आदेश दिले आहेत.सरकारने सरकारी बैठकांसाठी 'व्हर्च्युअल फर्स्ट' धोरणही लागू केले आहे. आता आवश्यक सरकारी प्रवासांसाठी किमान १५ दिवस आधी तिकीट बुक करणे अनिवार्य असेल, तर एलटीसी (भारत सरकार आपल्या कर्मचा-यांना देत असलेला खर्च) प्रवासांचे नियोजन ४५ दिवस आधी करावे लागेल.

३. त्रिपुराः ५०ऽ कर्मचारीच कार्यालयात येतील, बाकीचे वर्क फ्राम होम करतीलत्रिपुरा सरकारने खर्च आणि पेट्रोल-डिझेल वाचवण्यासाठी मोठा निर्णय घेतला आहे. आता सरकारी कार्यालयांमध्ये गट क आणि ड मधील फक्त ५०ऽ कर्मचारीच दररोज कार्यालयात येतील, बाकीचे कर्मचारी वर्क फ्र?म होम करतील. सरकारने सर्व विभागांना कर्मचा-यांचे साप्ताहिक ड्युटी रोस्टर तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. आवश्यक आणि आपत्कालीन सेवांमधील कर्मचा-यांना हा नियम लागू होणार नाही.

४. हरियाणाः मुख्यमंत्र्यांनी ताफा कमी केला, आठवड्यातून एक दिवस गाडीशिवाय फिरतील

हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिंह सैनी यांनी पेट्रोल-डिझेल वाचवण्यासाठी आपल्या सरकारी ताफ्यातील गाड्यांची संख्या कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांनी सांगितले की, आता त्यांच्या ताफ्यात फक्त सुरक्षेसाठी आवश्यक असलेली वाहनेच असतील. मुख्यमंत्र्यांनी हे देखील ठरवले आहे की, ते आठवड्यातून एक दिवस कोणतीही गाडी वापरणार नाहीत.

५. आंध्र प्रदेशः मुख्यमंत्र्यांसोबत आता पूर्वीपेक्षा अर्धा ताफा

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्रबाबू नायडू यांनी आपल्या ताफ्यात वापरल्या जाणा-या गाड्यांची संख्या ५०ऽ कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. आता जिल्हा दौ-यांदरम्यान त्यांच्यासोबत पूर्वीपेक्षा निम्म्या गाड्याच असतील. मुख्यमंत्र्यांनी मंत्री, व्हीआयपी लोकांनाही सरकारी गाड्यांचा कमी वापर करण्याचे आणि गरज असेल तेव्हाच प्रवास करण्याचे आवाहन केले आहे.

६. पंजाबः प्रत्येक बुधवारी अधिकारी चारचाकी वाहनाने येणार नाहीत

पंजाबचे राज्यपाल गुलाबचंद कटारिया म्हणाले, आम्ही आमच्या अधिका-यांसोबत बैठकीनंतर हा निर्णय घेतला आहे की, प्रत्येक बुधवारी आमचा कोणताही अधिकारी चारचाकी वाहनाने येणार नाही.

७. राजस्थानः मुख्यमंत्री भजनलाल यांच्या ताफ्यात आता ५ गाड्या

जयपूरमध्ये विमानतळावर जाताना मुख्यमंत्री भजनलाल यांच्यासोबत ५ गाड्या दिसल्या.जयपूरमध्ये विमानतळावर जाताना मुख्यमंत्री भजनलाल यांच्यासोबत ५ गाड्या दिसल्या.राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी त्यांच्या ताफ्यातील गाड्यांची संख्या कमी करण्याचे आदेश दिले. यापूर्वी ताफ्यात १४-१६ गाड्या असायच्या, पण बुधवारी दिल्ली दौ-यादरम्यान त्यांच्यासोबत फक्त ५ गाड्या होत्या.

८. बिहारः मुख्यमंत्री सम्राट चौधरी इलेक्ट्रिक गाडीने सचिवालयात पोहोचले

बिहारचे मुख्यमंत्री सम्राट चौधरी बुधवारी मंत्रिमंडळाच्या बैठकीसाठी इलेक्ट्रिक गाडीने सचिवालयात पोहोचले. मात्र, मीडिया रिपोर्ट्सनुसार, मुख्यमंत्र्यांच्या गाडीमागे पेट्रोल-डिझेलच्या सुमारे २० गाड्यांचा ताफा होता. आता अनेक मंत्री केवळ एक किंवा दोन गाड्यांमध्येच कार्यक्रम आणि बैठकांना उपस्थित राहत आहेत.

९. मध्य प्रदेशः व्हीआयपी ताफ्यांवर ब्रेक, मुख्यमंत्र्यांनी गाड्यांची संख्या कमी केली

मध्य प्रदेशात आता मंत्री आणि व्हीआयपींच्या ताफ्यातील गाड्यांची संख्या मर्यादित केली जाईल. तसेच, सरकारी दौरे आणि भेटींदरम्यान रॅलींवरही बंदी असेल.मुख्यमंत्री मोहन यादव यांना इअ श्रेणीची सुरक्षा मिळाली आहे. यामुळे त्यांच्या ताफ्यात आतापर्यंत एकूण १३ वाहने समाविष्ट होती. नवीन आदेशानंतर भोपाळमधील स्थानिक दौ-यादरम्यान मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यात आता फक्त ८ वाहने समाविष्ट असतील.

१०. यूपीः बैठका व्हर्च्युअल असतील; २ दिवस वर्क फ्राम होम

उत्तर प्रदेशमध्ये योगी सरकारने मंगळवारी ७ मोठे निर्णय घेतले. मुख्यमंत्री, मंत्री, आमदार आणि अधिका-यांचा ताफा ५०ऽ कमी होईल. आठवड्यातून एक दिवस त्यांना सार्वजनिक वाहतूक किंवा बस-मेट्रोने प्रवास करावा लागेल.दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी पेट्रोल-डिझेलच्या बचतीसाठी नवीन आदेश जारी केले आहेत. आता सर्व सरकारी कर्मचारी २ दिवस 'वर्क फ्राम होम' करतील. ५०ऽ सरकारी बैठका ऑनलाइन होतील, कोणताही मंत्री १ वर्षापर्यंत परदेशी दौ-यावर जाणार नाही, कार्यालयांची वेळ सकाळी १०:३० ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंतच असेल आणि दिल्ली सरकार ६ महिन्यांपर्यंत कोणतीही नवीन गाडी खरेदी करणार नाही.

दरम्यान, दिल्लीचे शिक्षण मंत्री आशिष सूद यांनी मंगळवारी दिल्ली मेट्रोमध्ये क्षत्र पासून कडकडडूमा कोर्टापर्यंत प्रवास केला. त्यानंतर त्यांनी मेट्रो स्टेशनवरून सूरजमल विहार येथील 'क्व श्री स्कूल' पर्यंत जाण्यासाठी ई-रिक्षा घेतली. तेथे त्यांनी झोन १ आणि २ मधील शाळांच्या प्रमुखांसोबत एका सत्रात भाग घेतला.

१२. महाराष्ट्रः मंत्री फ्रान्सला जाणार नाहीत, विभागाचे खर्च कमी केले

पंतप्रधानांच्या आवाहनानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बाईकवरून प्रवास करत आहेत. तर मंत्री आशीष शेलार यांनी सांगितले की, ते यावर्षी फ्रान्समध्ये होणा-या कान्स चित्रपट महोत्सवात सहभागी होणार नाहीत. ते म्हणाले की, आव्हानात्मक काळात राष्ट्रीय हिताला प्राधान्य देत विभागीय खर्चात कपात आणि संयम राखण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

१३. गोवाः मुख्यमंत्री सावंत यांनी आपल्या ताफ्याचा आकार कमी केला

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आवाहनानंतर गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी आपल्या ताफ्याचा आकार अर्धा केला आहे. मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यात आधी सहा गाड्या होत्या, ज्या आता कमी करून तीन करण्यात आल्या आहेत. या तीन गाड्यांमध्ये मुख्यमंत्री प्रवास करतात ती गाडी देखील समाविष्ट आहे.

## टरबूज खाल्ल्याने वडिलांचा मृत्यू,

हे श्योपूरमध्ये भाड्याच्या घरात कुटुंबासह राहत होते. ते व्यवसायाने ड्रायव्हर होते. माध्यमांतील वृत्तांनुसार, गुरुवारी रात्री इंद्र कुमार आणि त्यांचा २१ वर्षीय मुलगा विनोद यांची तब्येत ठीक नव्हती. त्यांनी शुक्रवारी सकाळी उठून टरबूज खाल्ले. मात्र, टरबूज खाल्ल्यानंतर काही वेळातच दोघांची प्रकृती कमालीची खालावली. प्रकृती अधिकच खालावल्यानंतर, त्यांना तातडीने श्योपूर जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे प्रकृती अधिक चिंताजनक झाल्याने इंद्र कुमार यांना कोटा येथे हलवण्याचा सल्ला देण्यात आला, मात्र वाटेतच त्यांचा मृत्यू झाला. मुलगा विनोद याची प्रकृती अद्यापही नाजूक आहे. त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

जिल्हा रुग्णालयाचे सिव्हिल सर्जन डॉ. आर. बी. गोयल यांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतरच स्पष्ट होईल; प्राथमिकदृष्ट्या हे पोटातील इन्फेक्शन असू शकते. नातेवाईकांनी दिलेल्या माहितीनुसार, हे टरबूज गुरुवारी संध्याकाळी खातौली तिराहा येथून खरेदी केले होते.

## कौटुंबिक वादाचा रक्तरंजित

माहिती दिली. माहिती मिळताच ठाणेदार यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविला. पोलिसांकडून घटनेमागील नेमके कारण शोधण्याचे काम सुरू आहे.

## १७ वर्षीय मुलीचा १३

प्रतिबंधक कायदा, पोक्सोसह विविध गंभीर कलमान्वये गुन्हे नोंदवले आहेत. पीडितेने पोलिसांना दिलेल्या तक्रारीनुसार, तिला तिच्या इच्छेविरुद्ध या विवाहांसाठी भाग पाडण्यात आले. दुसऱ्या विवाहादरम्यानही तिला अनेक त्रासांना सामोरे जावे लागले. घरगुती वाद आणि छळ असह्य झाल्याने तिने कायदेशीर मार्गाचा अवलंब केला.दरम्यान आता पोलिस पुढील तपास करीत आहेत.

## NEET पेपरफुटी विरोधात

नेतृत्व महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष अनुराग भोयर आणि अमरावती जिल्हाध्यक्ष राहुल येवले यांनी केले. यावेळी कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसर घोषणाबाजीने दणाणून सोडला होता. केंद्र सरकारने विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणे थांबवावे, अन्यथा यापेक्षाही तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

आंदोलनाप्रसंगी अमरावती जिल्हा युवक काँग्रेसचे कार्याध्यक्ष अनिकेत ढेंगले, प्रदेश महासचिव परीक्षित जगताप, रितेश पांडव, निलेश गुहे, नितेश वानखेडे, शहर उपाध्यक्ष नितीन काळे, विधानसभा अध्यक्ष वैभव देशमुख, बडनेरा अध्यक्ष आशिष यादव, शुभम बांबल यांच्यासह मोठ्या संख्येने युवक काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## लक्झरी बसची दुचाकीला

रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचार सुरू असतानाच पुरण यांचा मृत्यू झाला, तर वैष्णवी यांना डॉक्टरांनी तपासणीनंतर मृत घोषित केले. या घटनेची माहिती मिळताच रुग्णालयात नातेवाईकांनी एकच आक्रोश केला. अजून संसार उभाही राहिला नव्हता आणि काळाने दोघांनाही हिरावून नेले, अशा भावना गावकऱ्यांनी व्यक्त केल्या. नववधूच्या हातातील मेहंदी फिकी होण्याआधीच मृत्यूने या दाम्पत्याला कायमचे दूर नेल्याने संपूर्ण परिसर शोकमग्न झाला आहे. दरम्यान, बडनेरा पोलिसांनी संबंधित लक्झरी बस आणि चालकाला ताब्यात घेतले असून, निष्काळजीपणे वाहन चालवून मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. पुढील तपास सुरू आहे.

## स्व-जणगणनेत तिवसा

विभागाचे अधिकारी नरेंद्र कुरळकर उपस्थित होते. यावेळी त्यांनी ग्रामस्थांचे अभिनंदन करत स्व-जनगणनेचे महत्त्व स्पष्ट केले.

तहसीलदार मयूर कळसे यांनी सांगितले की, 'स्व-जनगणना ही भविष्यातील विकास आराखड्यासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. शासनाच्या विविध योजनांचे अचूक नियोजन करण्यासाठी लोकसंख्येची अचूक माहिती आवश्यक असते. सुलतानपूर गावाने पुढाकार घेत संपूर्ण तालुक्यासमोर आदर्श निर्माण केला आहे.'

नायब तहसीलदार आशीष नागरे, माष्टर ट्रेनर स्वप्नील भुयार, वैभव देशमुख, कासीब शेख, अजय खाकसे, चंद्रकांत आगरकर, तुषार निभेकर, यांनी नागरिकांना शासनाच्या डिजिटल उपक्रमांना सहकार्य करण्याचे आवाहन केले. तसेच उर्वरित गावांनीही सुलतानपूरचा आदर्श घेऊन स्व-जनगणना प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी, असे आवाहन त्यांनी केले.

ग्रामस्थांनी प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली उत्साहाने सहभाग नोंदविल्याने ही प्रक्रिया सुरळीत पार पडली. यावेळी गावातील ग्रामसेवक, सरपंच, गावातील युवक, ग्रामपंचायत सदस्य व कर्मचाऱ्यांनी नागरिकांना माहिती भरण्यासाठी विशेष मदत केली.

तिवसा तालुक्यातील इतर गावांमध्येही स्व-जनगणना मोहिमेला वेग आला असून, प्रशासनाकडून जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. सुलतानपूरच्या यशामुळे तालुक्यातील इतर गावांनाही प्रेरणा मिळत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

## सोलर पंप योजनेच्या

फिर्यादीच्या ओळखीचा असलेला आरोपी सुनिल टाके हा ऑनलाईन सेंटरवर येत होता. त्याने गावातील शेतकऱ्यांना 'जास्त एचपीचे सोलर पंप मंजूर करून देतो' असे सांगून विश्वास संपादन केला. त्यानंतर शेतकऱ्यांकडून रोख रक्कम तसेच फोन-पेच्या माध्यमातून पैसे स्वीकारले. मात्र, सोलर योजना मंजूर करून न देता तब्बल ४ लाख ७०२ रुपयांची फसवणूक केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.या प्रकरणी नांदगाव खंडेश्वर पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३१६(५), ३१८(२) आणि ३१८(४) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. अमरावती ग्रामीण पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, आरोपी सुनिल टाके याने अशाच प्रकारे सोलर पंप योजना मंजूर करून देण्याचे आमिष दाखवून कोणाची फसवणूक केली असल्यास त्यांनी नांदगाव खंडेश्वर पोलिसांशी संपर्क साधावा.तसेच, शासनाच्या योजनांच्या नावाखाली कोणत्याही व्यक्तीच्या फसव्या आश्वासनांना बळी पडू नये आणि संशयास्पद प्रकार आढळल्यास तातडीने पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहनही पोलिस प्रशासनाने केले आहे.

## पोलीस आयुक्त राकेश

पोलीस उपायुक्त (डीसीपी) गणेश शिंदे यांची मुंबई येथे बदली करण्यात आली आहे. त्यांची नियुक्ती बृहन्मुंबई पोलीस दलात पोलीस उपायुक्त पदावर करण्यात आली आहे. त्यांच्या रिक्त जागी नाशिक सीआयडीचे पोलीस अधीक्षक दिपक गि-हे यांची अमरावती शहर पोलीस दलात पोलीस उपायुक्त म्हणून वर्णी लागली आहे.

तसेच, नाशिक पोलीस अकादमीच्या पोलीस अधीक्षक अनिता पाटील यांची अमरावती येथील नागरी हक्क संरक्षण विभागात बदली करण्यात आली आहे.

## धारणीत अवैध गोवंश मांस

ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड आणि उपविभागीय पोलीस अधिकारी माधवराव गरुड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अवतारसिंग चव्हाण यांच्या पथकाने केली. कारवाईत पोउपनि सतीश झाल्टे, सपोउपनि प्रकाश गिरडकर, पोहेकॉं सुमीत घोटेकर, पोकॉ जगत तेलगोटे, नामदेव कुरवाळे, आदित्य सुरनर आणि महिला पोलीस कर्मचारी वंदना तायडे यांनी सहभाग घेतला.

## परतवाडा शहरातील आठवडी

झाल्याचे संचालक दिपक जयस्वाल यांनी माहिती दिली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. काही दिवसांपूर्वीच लक्कड बाजार परिसरात मोठी आग लागण्याची घटना घडली होती. त्यानंतर पुन्हा शहरात आग लागल्याने व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरात वारंवार घडणाऱ्या आगीच्या घटनांमुळे विद्युत यंत्रणा व अग्निसुरक्षा व्यवस्थेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

## नामांकित शाळेतील इयत्ता

प्रवेश अनियमितपणे होतात.संस्थे मार्फत फक्त १४ जागांसाठी लकी ड्रॉ काढल्या गेले असुन उर्वरित १५०-२०० जागा मनमानी पद्धतीने भरल्या जातात. ही बाब बेकायदेशीर असल्याचे त्यांनी नमूद केले होते तसेच याअनियमीततेमुळे पालकांमध्ये असंतोष निर्माण झाला होता. या तक्रारीचा गांभीर्याने विचार करत गटशिक्षण अधिकारी शीला आठवले यांनी दि. १३ मे रोजी पत्र काढुन पत्रात मुख्याध्यापक, सिताबाई संगई प्राथमिक शाळा यांना स्पष्ट आदेश देण्यात आले की, चौकशी पूर्ण होईपर्यंत इयत्ता पहिलीची प्रवेश प्रक्रिया तात्पुरत्या स्वरुपात स्थगित ठेवावी. पत्र गटशिक्षण अधिकारी कार्यालयाने दिले असुन या प्रकरणाची चौकशी लवकरात लवकर पूर्ण करण्याचे संकेत दिले आहेत.

या घटनेबाबत अनेक पालकांनी नाराजी व्यक्त करत लकी ड्रॉ ही प्रक्रिया पारदर्शक व्हायला हवी. फक्त १४ जागांसाठी ड्रॉ काढून बाकी जागा कोणत्या पद्धतीने भरल्या जातील, याची स्पष्टता नसल्याने आम्हाला शंका येत आहे. काही जणांनी मात्र शाळेच्या पारंपरिक प्रवेश पद्धतीचा बचावही केला आहे.सध्या शाळेतील प्रवेश प्रक्रिया थांबवल्याने पालकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला असला तरी, अंतिम निर्णय लवकरात लवकर व्हावा, प्रकरणात लवकरच अधिकृत चौकशी सुरू करण्यात येउन चौकशीअंती दोषींवर कारवाई करण्याची मागणी होत आहे. शिक्षण विभागाच्या पुढील चौकशीनंतर नेमके वास्तव समोर येणार असून याकडे तालुक्यातील विद्यार्थी व पालकांचे लक्ष लागले आहे.

## उन्हाच्या तडाख्याने दर्यापूरातील

मोठी गैरसोय होत आहे. अनेक विद्यार्थी डोक्यावर रुमाल स्कार्फ तसेच पाण्याच्या बाटल्या घेऊन प्रवास करताना दिसून येत आहेत. दुपारच्या वेळेत रस्त्यावर चालणेही कठीण होत असल्याने पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. दुसरीकडे उन्हामुळे थंड पेये उसाचा रस लिंबूपाणी व आईस्क्रीमच्या दुकानांवर काही प्रमाणात गर्दी वाढली असली तरी इतर बहुतांश बाजारपेठांमध्ये शांतता पसरलेली आहे. वाढत्या तापमानामुळे नागरिक शक्यतो सकाळी किंवा सायंकाळीच बाहेर पडणे पसंत करत आहेत. हवामानातील वाढता उकाडा आणखी काही दिवस कायम राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.उन्हाळ्याच्या तीव्र झळांपासून बचावासाठी नागरिकांनी दुपारी १२ ते ४ या वेळेत शक्यतो बाहेर जाणे टाळावे. भरपूर पाणी, लिंबूपाणी, ताक, ओआरएस यांचे सेवन करावे. हलके व सैल सूती कपडे वापरावेत तसेच डोक्यावर टोपी किंवा रुमाल ठेवावा. लहान मुले, वृद्ध व्यक्ती व शेतात काम करणाऱ्यांनी विशेष काळजी घ्यावी. चक्कर येणे, जास्त घाम येणे, ताप, उलट्या किंवा बेशुद्धी अशी लक्षणे दिसल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

-डॉ.ओमप्रकाश जळमकर

## जिल्हाधिकाऱ्यांकडून संत्रा बागेतील

जिल्हाधिकाऱ्यांनी तंत्रज्ञानाची सविस्तर माहिती घेतली. या प्रकल्पात एआय आणि आयओटी सेन्सर्सच्या मदतीने पिकांची रिअल-टाइम माहिती मिळवणे, उपग्रहाद्वारे पिकाच्या वाढीवर आणि ताणावर लक्ष ठेवणे, मातीतील ओलावा, खत व्यवस्थापन, पाण्याचे नियोजन आणि रोग-कीड नियंत्रणासाठी तंत्रज्ञानाचा वापर करणे, तज्ज्ञांचे मार्गदर्शनाचा समावेश आहे.

सिट्रस इस्टेटचे अध्यक्ष तथा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी राहुल सातपुते आणि 'मॅप माय क्रॉप' कंपनीच्या ॲग्रोनॉमिस्टनी सॅटेलाईट डेटाचा वापर दैनंदिन शेतीकामात कसा होऊ शकतो, याचे प्रात्यक्षिक दिले. यामुळे शेतकऱ्यांना योग्य वेळी अचूक निर्णय घेणे सुलभ होणार आहे. बदलत्या काळात हवामानात तंत्रज्ञान स्वीकारणे ही काळाची गरज असल्याचे मत जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी व्यक्त केले. आयओटी सेन्सर्समुळे खते आणि पाण्याचा कार्यक्षम वापर होऊन उत्पादन खर्च कमी होईल आणि संत्र्याचा दर्जा सुधारेल, अशी आशा त्यांनी यावेळी व्यक्त केली. यावेळी सिट्रस इस्टेटचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजय तळेगावकर, मोर्शीचे उपविभागीय अधिकारी प्रदिप पवार, तहसीलदार सागर ढवळे, तालुका कृषि अधिकारी प्रथमेश माने उपस्थित होते.

## चांदूर रेल्वे हद्दीत

दारूबंदी कायद्यान्वये कलम ६५(ई) व ८३ अंतर्गत गुन्हा दाखल करून पुढील कारवाई सुरू करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशानुसार, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड व उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वात एपीआय अमोल मुडे, हेड कॉन्स्टेबल रवींद्र वऱ्हाडे, पोलीस कर्मचारी सागर नाठे, शांताराम सोनोने आणि चालक प्रज्वल राऊत यांनी ही कारवाई पार पाडली.


**टीसी हरवला आहे**

**स्वरा सतीश धांडे हिचा नोबेल इंग्लिश स्कूल, करडा (वाशिम) येथील मूळ शाळा सोडल्याचा दाखला (TC) हरवला आहे. सापडल्यास संपर्क मो.:८८८८१५४२८७**


### जाहीर नोटीस

विद्यमान २ रे सहदिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती

**आर.एम.जे.सी.क्र.२६२/२०२६** **ने.ता.२५.०६.२०२६**

अर्जदार :
१. **सुरेश तुळशीदासजी बीरे, वय ६२ धंदा - मजुरी रा.श्रीकृष्ण नगर जवळ, पाठ्यपुस्तक वितरण मंडळ, वि.म.वि.अमरावती**
२. **संजयराव तुळशीदास बीरे, वय ५९ धंदा - मजुरी रा.महेंद्र कॉलनी,गल्ली नं.१, व्ही.एम.व्ही.अमरावती**
३. **कुसूम अशोकराव अघाडे, वय ७३ धंदा - घरकाम रा.कोंडवर्धा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती**
४. **लता भाष्कर राऊत, वय ५६ वर्षे, व्यवसाय - घरकाम रा.लाखांदूर साईनाथ लेआऊट, लाखांदूर, भंडारा, ता.जि.भंडारा**

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत

**अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात.** मृतक तुळशीदास मुकिंदराव बीरे **हे रा.तुळजापूर गढी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील कायमचे रहिवासी होते. त्यांचा मृत्यू दिनांक** २९.१२.२०१४ **रोजी रा.तुळजापूर गढी, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे. तसेच मयत** सोनुला तुळशीदास बीरे **ही रा.तुळजापूर गढी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील कायमची रहिवासी होती. ती दिनांक** २८.०७.२०२० **रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मरण पावली. त्यामुळे मयत तुळशीदास मुकिंदराव बीरे व मयत सोनुला तुळशीदास बीरे यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात** आर.एम.जे.सी.क्र.२६२/२०२६ **नुसार अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.**

**आज दि.**१४.०५.२०२६ **रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.**

शिक्का

**आदेशानुसार,**
सहायक अधीक्षक
**दिवाणी व फौजदारी न्यायालय ,**
**चांदूर बाजार**

### जाहीर नोटीस

विद्यमान सहदिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती

**आर.एम.जे.सी.क्र.१८९/२०२६** **ने.ता.०९.०६.२०२६**

अर्जदार :
१. **गजानन लक्ष्मणराव बुटे, वय ६४ धंदा - शेती रा.बेलज, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती**
२. **शालिनी बाळकृष्ण काळे, वय ७४ धंदा - घरकाम रा.भिलोना, ता.अचलपूर, जि.अमरावती**
३. **सुनंदा विजयराव बंड, वय ६० धंदा - घरकाम रा.खराळा, ता.अचलपूर, जि.अमरावती**
४. **कुसूम मधुकर काळे (मयत) तर्फे वारस ४अ) श्रीकांत मधुकर काळे, वय ४९ वर्षे व्यवसाय - शेती रा.येसुर्णा, ता.अचलपूर, जि.अमरावती**

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत

**अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात.** मृतक लक्ष्मण जयरामजी बुटे **यांचा मृत्यू दिनांक** १२.०७.२००१ रोजी **तसेच** मृतक अनुसयाबाई लक्ष्मण बुटे **हिचा मृत्यू** ३०.०५.१९९९ रोजी **तर** मृतक मनोहर लक्ष्मणराव बुटे **यांचा मृत्यू दिनांक** १८.०८.२००७ रोजी **बेलज, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे. तसेच** मृतक कुसूम मधुकरराव काळे **ही दिनांक** ०५.०३.१९९६ **रोजी येसुर्णा येथे मरण पावली आहे. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात** आर.एम.जे.सी.क्र.१८९/२०२६ **नुसार अर्ज दाखल केला आहे.**

**त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.**

**आज दि.**१८.०४.२०२६ **रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.**

शिक्का

**आदेशानुसार,**
सहायक अधीक्षक
**दिवाणी व फौजदारी न्यायालय ,**
**चांदूर बाजार**

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शनिवार, १६ मे २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## प्रधानमंत्री आवास योजनेत अकोल्याची राज्यात 'टॉप-३' मध्ये झेप ; पातूर तालुका ठरला अव्वल

### बेलोरा बुद्रुक ग्रामपंचायतीलाही सर्वोत्कृष्टबहुमजली इमारतीचा राज्यस्तरीय सन्मान

■ प्रतिनिधी | अकोला ■

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत सन २०२३-२४ मध्ये उत्कृष्ट कामगिरी करत अकोला जिल्ह्याने राज्यात तृतीय क्रमांक पटकावला असून, पातूर तालुक्याने राज्यात प्रथम क्रमांक मिळवून जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. तर अकोट तालुक्यातील बेलोरा बुद्रुक ग्रामपंचायतीला सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारतीचा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे.

सैनिक स्कूल, सातारा येथे शुक्रवारी आयोजित प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण लाभार्थी मेळावा व महाआवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात हा गौरव प्रदान करण्यात आला. केंद्रीय ग्रामीण विकास, कृषी व किसान कल्याण मंत्री ना. शिवराज सिंग



चौहान, मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस आणि ग्रामविकास मंत्री ना. जयकुमार गोरे यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

अकोला जिल्ह्याच्या वतीने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. अनिता मेश्राम, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी बी. वैष्णवी, तत्कालीन प्रकल्प संचालक मनोज जाधव, विद्यमान प्रकल्प संचालक दिगंबर लोखंडे, पातूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुभाष काळे, अकोट पंचायत समितीचे गटविकास अधिकारी रमाकांत माळी यांनी पुरस्कार स्वीकारला. तसेच बेलोरा बुद्रुक ग्रामपंचायतीचे सरपंच राम मंगळे व ग्रामपंचायत अधिकारी ज्ञानेश्वर बिडकर यांचाही यावेळी गौरव करण्यात आला.

प्रधानमंत्री आवास योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे अकोला जिल्ह्याने राज्यपातळीवर उल्लेखनीय स्थान मिळविल्याचे मानले जात आहे.

जिल्हा प्रशासन, ग्रामविकास यंत्रणा आणि पंचायत समिती स्तरावरील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या समन्वयपूर्ण कार्याची ही पावती असल्याची भावना व्यक्त होत आहे. नियोजनबद्ध कामकाज, सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि जनहिताची बांधिलकी यामुळेच हा सन्मान मिळाल्याची प्रतिक्रिया प्रशासनाकडून व्यक्त करण्यात आली. या यशाबद्दल संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि लोकप्रतिनिधींचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.

## उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडून मृत शिवसैनिकाच्या कुटुंबाला एक लाख रुपयांची मदत

■ प्रतिनिधी | अकोला ■

शिवसेना पक्षप्रमुख तथा राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांनी पुन्हा एकदा आपल्या कार्यकर्त्यांप्रती असलेली संवेदनशीलता दाखवून दिली आहे. पातूर तालुक्यातील तुलंगा बु. येथील निष्ठावान शिवसैनिक दिलीप मुंडे यांचा मन नदीत बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्यानंतर शिंदे यांनी तत्काळ त्यांच्या कुटुंबीयांना एक लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली.

दिलीप मुंडे यांच्या निधनाची माहिती स्थानिक पदाधिकाऱ्यांनी ८ मे रोजी उपमुख्यमंत्री शिंदे यांच्यापर्यंत पोहोचवली. ही घटना समजताच कोणताही विलंब न लावता शिंदे यांनी मुंडे कुटुंबीयांना रोख एक लाख रुपयांची मदत पाठवली. त्यामुळे शिवसेना कार्यकर्त्यांमध्ये समाधान व्यक्त होत असून, 'कार्यकर्त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणारे नेते' अशी



पातूर तालुक्यातील तुलंगा बु. येथील दिलीप मुंडे यांच्या कुटुंबीयांना आर्थिक सहाय्य; मुलाच्या शिक्षणाची जबाबदारीही स्वीकारल

भावना व्यक्त केली जात आहे.

यावेळी मदत प्रदान करताना शिवसेना अकोला जिल्हा संपर्क प्रमुख तथा माजी आमदार राजन साळवी, माजी आमदार तथा जिल्हाप्रमुख नारायण गव्हाणकर, जिल्हाप्रमुख चंद्रशेखर पांडे गुरुजी, जिल्हा समन्वयक प्रणव तायडे पाटील यांच्यासह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, मुंडे यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबावर ओढावलेल्या परिस्थितीची जाणीव ठेवून राजन साळवी, नारायण गव्हाणकर आणि चंद्रशेखर पांडे गुरुजी यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे त्यांच्या मुलाच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारण्याची विनंती केली.

## भव्य रक्तदान शिबिराचे जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक यांना निमंत्रण



■ प्रतिनिधी | वाशिम ■

दि वाशिम अर्बन को-ऑप.बँक लि.वाशिम तर्फे बँकेचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय रामकृष्णजी राठी उर्फ बाबाजी यांच्या स्मृती प्रित्यर्थ दि. १८ मे रोजी बँकेचे अध्यक्ष श्रीमती शीलाताई सुभाष राठी यांच्या मार्गदर्शनात भव्य रक्तदान शिबिर आयोजित केले आहे .त्यानिमित्य बँकेच्या वतीने जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, जिल्हा पोलीस अधीक्षक नरेश खाटमोडे यांना निमंत्रण देताना बँकेचे उपाध्यक्ष . पुरुषोत्तम चरखा ,वाशिम शाखेचे शाखा सभापती.नितीन करवा , मुख्य कार्यकारी अधिकारी महेंद्र देशमुख व कर्मचारी प्रतिनिधी तेजराव वानखेडे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांनी रक्तदान हे जीवनदान असून वाशिम अर्बन बँके अतिशय चांगला उपक्रम राबवत आहे. बँकेला सामाजिक कार्याला शुभेच्छा दिनांक १८ तारखेला आम्ही रक्तदान शिबिराला उपस्थिती राहणार असे कळविले.

## आजपासून प्रत्यक्ष जनगणना - प्रगणकांना सहकार्याचे आवाहन

■ प्रतिनिधी | अकोला ■

केंद्र शासनाच्या आदेशानुसार जनगणना-२०२७ कार्यक्रमाला सुरुवात झाली असून अकोला महानगरपालिका क्षेत्रात १६ मे ते १४ जून २०२६ दरम्यान पहिल्या टप्प्यात घरगणनेचे काम हाती घेण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर शुक्रवारी मनपाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात पर्यवेक्षकांची विशेष बैठक पार पडली.

मनपा आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. सुनिल लहाने यांच्या निर्देशानुसार शहर जनगणना अधिकारी तथा उपायुक्त दिलीप जाधव यांनी पूर्व, पश्चिम, उत्तर आणि दक्षिण झोनमधील पर्यवेक्षकांना मार्गदर्शन केले. यावेळी



### मनपात पर्यवेक्षकांची बैठक ; गैरहजर कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचा इशारा

घरगणना करताना घ्यावयाची काळजी, माहिती संकलनाची प्रक्रिया, लॉगिन-पासवर्ड अडचणी, ॲप क्रॅशिंग, नेटवर्क कनेक्टिव्हिटी, डेटा एन्ट्रीची कार्यपद्धती तसेच डिव्हाईस कॉन्फिगरेशनबाबत सविस्तर सूचना देण्यात आल्या.

दरम्यान, नियुक्त पर्यवेक्षक किंवा प्रगणक कर्तव्यावर हजर न राहिल्यास संबंधितांविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश डॉ. लहाने यांनी चार्ज अधिकाऱ्यांना दिल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

घरगणनेच्या कामासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, प्रगणकाचे ओळखपत्र तपासून त्यांना आवश्यक माहिती द्यावी, तसेच उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर त्यांना पाणी आदी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे आवाहनही डॉ. लहाने यांनी केले. बैठकीला चारही झोनचे चार्ज अधिकारी विठ्ठल देवकते, राजेश सरप, देविदास निकाळजे, गजानन घोंगे, जीआयएस विभाग प्रमुख चंदन प्रसाद, कैलास भिरड तसेच बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंते उपस्थित होते.

## प्रतिबंधित गुटखा प्रकरणात आरोपीची निर्दोष मुक्तता

### ॲड. सुमित महेश बजाज यांचा यशस्वी युक्तिवाद

■ प्रतिनिधी | अकोला ■

एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सीपना कंपनीजवळील विकी हॉटेल परिसरात १३ मे २०२२ रोजी टाकलेल्या धाडीत अवैध प्रतिबंधित गुटखा, गॅस सिलेंडर व इतर साहित्य असा एकूण १९ हजार ९५२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. या प्रकरणी संजय गजानन देवनाडे याच्याविरुद्ध भादंवि कलम १८८, २७२, २७३, ३२८ तसेच अन्न सुरक्षा अधिनियम कलम २६(२)(४) आणि अत्यावश्यक वस्तू अधिनियम कलम ७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या प्रकरणाची सुनावणी तदर्थ जिल्हा न्यायाधीश-२ यांच्या न्यायालयात झाली. सरकार पक्षाने सादर केलेले पुरावे, साक्षीदारांचे जबाब तसेच आरोपी पक्षाचा युक्तिवाद यांचा सखोल विचार करून न्यायालयाने आरोपीला दिलासा दिला. आरोपीतर्फे विधीज्ञ ॲड. सुमित महेश बजाज यांनी प्रभावी बाजू मांडली. त्यानंतर तदर्थ जिल्हा न्यायाधीश-२ न्या. तेजवंत सिंग सिंधू यांनी ७ मे २०२६ रोजी दिलेल्या निकालात संजय देवनाडे याची प्रतिबंधित गुटखा प्रकरणातून निर्दोष मुक्तता केली.

या प्रकरणात आरोपीतर्फे ॲड. वर्षा सदार यांनीही बाजू मांडली. तसेच ॲड. अजय भारसाकळे, ॲड. लवेश गुरबाणी आणि ॲड. अनमोल उपाध्ये यांनी सहकार्य केले.

## पक्षबळकटीसाठी शिवसैनिकांनी जनसेवेत सक्रिय राहावे : राजन साळवी



■ प्रतिनिधी | अकोला ■

शिवसेना हा केवळ राजकीय पक्ष नसून समाजसेवेची भूमिका जपणारी संघटना आहे. पक्षप्रमुख तथा राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन प्रत्येक शिवसैनिकाने पक्ष बळकटीसाठी आणि जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी सदैव तत्पर राहावे, असे आवाहन शिवसेना संपर्कप्रमुख तथा माजी आमदार राजन साळवे यांनी केले.

शासकीय विश्रामगृह येथे आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी अनिल मालगे यांनी आयोजित केलेल्या विविध सामाजिक व पक्षीय उपक्रमांचा अहवाल राजन साळवी यांना सादर करण्यात आला. अहवालाची पाहणी केल्यानंतर त्यांनी अनिल मालगे यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांच्या उपक्रमांना प्रशंसनीय असल्याचे सांगितले.

बैठकीला शिवसेना जिल्हाप्रमुख अश्विन नवले, महानगराध्यक्ष राजेश मिश्रा, महिला आघाडी प्रमुख उषाताई विरक, डॉ. अशोक ओळंबे, उपजिल्हाप्रमुख योगेश अग्रवाल, रमेश गायकवाड, गजानन चव्हाण यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

या कार्यक्रमाची माहिती गणेश भुजबळ यांनी दिली.

## नैसर्गिक शेतीकडे जिल्ह्याची वाटचाल

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्याची नैसर्गिक शेतीच्या दिशेने भक्कम पाऊल टाकत असून शेतकरी आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करीत आहेत. आत्मा व कृषी विभागामार्फत परंपरागत कृषि विकास योजना, डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन तसेच राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान अंतर्गत जिल्ह्यात नैसर्गिक व सेंद्रिय शेतीला मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन देण्यात येत आहे. या अभियानास जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून पर्यावरणपूरक व खर्चमुक्त शेतीचा नवा आदर्श निर्माण होत आहे.

सदर योजनांअंतर्गत जिल्ह्यातील तब्बल ८९२२ शेतकरी ७२४३ हेक्टर क्षेत्रावर नैसर्गिक व सेंद्रिय शेती करीत आहेत. रासायनिक खत व कीटकनाशकांच्या वाढत्या खर्चाला पर्याय म्हणून शेतकरी आता नैसर्गिक शेतीचा स्वीकार करीत असून उत्पादन खर्चात मोठी बचत होत आहे.

जिल्ह्यात स्थापन करण्यात आलेल्या २१ जैविक निविष्ठा संसाधन केंद्रांच्या माध्यमातून जीवामृत, दशपर्णी अर्क, सेंद्रिय खते तसेच इतर जैविक निविष्ठा निर्मितीबाबत शेतकऱ्यांना प्रशिक्षण, मार्गदर्शन व प्रात्यक्षिके देण्यात येत आहेत. त्यामुळे शेतकरी स्वयंपूर्ण होत असून जमिनीची सुपीकता वाढण्यासही मदत होत आहे.

## कृषी विज्ञान केंद्राद्वारे शेतकऱ्यांना आवाहन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

भारतीय शेती ही देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानली जाते. वाढती लोकसंख्या, बदलते हवामान, जमिनीची घटती सुपीकता आणि उत्पादन खर्चातील सातत्याने होणारी वाढ या पार्श्वभूमीवर अधिक उत्पादन घेण्याच्या प्रयत्नात रासायनिक खतांचा असंतुलित वापर मोठ्या प्रमाणात वाढलेला दिसून येतो. विशेषतः नत्रयुक्त खतांचा (युरिया) अति वापर, स्फुरद व पालाशाचा अपुरा वापर तसेच सूक्ष्म अन्नद्रव्यांकडे दुर्लक्ष यामुळे जमिनीच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत. परिणामी मातीतील सेंद्रिय कर्ब कमी होत असून उत्पादनक्षमता घटण्याची समस्या गंभीर बनत आहे.

या पार्श्वभूमीवर भारत सरकार, भारतीय कृषी अनुसंधान परिषद (ध्र्घ्ॅ), कृषी विभाग आणि कृषी विज्ञान

### 'संतुलित खतांचा वापर अभियान'



केंद्रांच्या माध्यमातून 'संतुलित खतांचा वापर अभियान' प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांमध्ये माती परीक्षणावर आधारित खत व्यवस्थापनाबाबत जनजागृती निर्माण करणे, जमिनीची सुपीकता टिकवून ठेवणे आणि शाश्वत शेतीला चालना देणे हा आहे.

संतुलित खत व्यवस्थापन म्हणजे पिकांच्या गरजेनुसार योग्य प्रमाणात, योग्य वेळी आणि योग्य पद्धतीने रासायनिक, सेंद्रिय व जैविक खतांचा समन्वित वापर होय. केवळ रासायनिक खतांवर अवलंबून न राहता शेणखत, गांडूळखत, हिरवळीची खते, जैविक खते आणि सूक्ष्म अन्नद्रव्यांचा समावेश करून जमिनीचे आरोग्य सुधारण्याचा प्रयत्न या अभियानातून केला जात आहे.

आज अनेक भागांमध्ये माती परीक्षणाशिवाय अंदाजाने खतांचा वापर केला जातो. त्यामुळे काही अन्नद्रव्यांचा अतिरेक तर काहींची कमतरता निर्माण होते. यामुळे उत्पादन खर्च वाढतो, पिकांची गुणवत्ता कमी होते तसेच जमिनीची दीर्घकालीन उत्पादकता घटते. माती परीक्षणाच्या आधारे खतांचा वापर केल्यास जमिनीतील उपलब्ध अन्नद्रव्यांची अचूक माहिती मिळते आणि त्यानुसार पिकांना आवश्यक खत व्यवस्थापन करता येते. यामुळे खतांचा अपव्यय कमी होऊन उत्पादनात वाढ होते.

असंतुलित खत वापरामुळे जमिनीतील सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता वाढत असून झिंक, गंधक, बोरॉन आणि लोह यांसारख्या अन्नद्रव्यांच्या अभावामुळे पिकांमध्ये विविध लक्षणे दिसून येतात. तसेच जमिनीतील उपयुक्त सूक्ष्मजीवांची संख्या घटून मातीचा पोत खराब होतो. अतिरिक्त रासायनिक खतांचा वापर पर्यावरण आणि भूजल प्रदूषणास कारणीभूत ठरत आहे. त्यामुळे संतुलित खत व्यवस्थापन ही आजच्या काळातील अत्यंत महत्त्वाची गरज बनली आहे.

संतुलित खत वापरामुळे पिकांना आवश्यक पोषण योग्य प्रमाणात मिळाल्याने उत्पादनात व गुणवत्तेत वाढ होते.

## इच्छाशक्ती असेल तर प्रश्न सुटतात ; कबरस्थान रस्त्याचा ४० वर्षांचा वनवास अखेर संपला

### राष्ट्रवादीच्या पाठपुराव्याला यश ; शेतक-यांची जमीन अबाधित ठेवत ३५ फुटी रस्ता मोकळा

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

मुस्लिम समाजासाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला कबरस्थान रस्त्याचा तब्बल ४० वर्षांपासून रखडलेला प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा महासचिव विकास पवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे महसूल व नगर परिषद प्रशासनाने संयुक्त कारवाई करत ३५ फूट रुंदीचा रस्ता मोकळा केला. विशेष म्हणजे, या प्रक्रियेत एकाही शेतकऱ्याच्या जमिनीला धक्का लागलेला नाही.

कबरस्थानाकडे जाणाऱ्या रस्त्याचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रशासकीय कागदपत्रांमध्ये अडकून पडला होता. स्थानिक मुस्लिम समाजाने विविध स्तरावर मागण्या करूनही प्रश्न सुटत नव्हता. अखेर राष्ट्रवादी काँग्रेसने हा विषय हाती घेत ठोस पाठपुरावा सुरू केला. विकास पवार यांनी ऑगस्ट महिन्यात तहसीलदारांकडे आवश्यक पुराव्यांसह निवेदन सादर केले. त्यानंतर नगर परिषद व भूमी अभिलेख विभागाची संयुक्त बैठक घेण्यात आली. बैठकीतील चर्चेनंतर अधिकृत मोजणीचा प्रस्ताव भूमी अभिलेख विभागाकडे पाठवण्यात आला.

दरम्यान, केवळ निवेदनापुरते मर्यादित न राहता राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी नगर परिषदेकडून मोजणीचे चलन भरून घेतले व भूमी अभिलेख विभागाकडे सातत्याने



पाठपुरावा केला. परिणामी, ५ मे रोजी प्रत्यक्ष मोजणी पार पडली. यावेळी शेतकरी, मुस्लिम समाजाचे प्रतिनिधी तसेच नगर परिषदेचे अभियंते उपस्थित होते.

१४ मे रोजी रस्त्याच्या खुणा निश्चित करण्यात आल्या. सरकारी नकाशानुसार सुमारे ३५ फूट रुंदीचा रस्ता उपलब्ध झाल्याचे स्पष्ट झाले. विशेष म्हणजे, कोणत्याही स्थानिक शेतकऱ्याच्या जमिनीचे नुकसान न होता हा मार्ग मोकळा झाल्याने सर्व स्तरातून समाधान व्यक्त होत आहे. या रस्त्याच्या डांबरीकरण अथवा सिमेंट काँक्रिटीकरणासाठी अल्पसंख्याक विकास विभागातून निधी उपलब्ध करून दिला जाणार असल्याची माहिती विकास पवार यांनी दिली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सुनेत्रा पवार यांच्या माध्यमातून निधी मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. लवकरच रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन होणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी तालुका अध्यक्ष महेश पाटील खारोडे, शहर युवक अध्यक्ष सचिन पोहरकार, सतीश मामनकार यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. दरम्यान, चार दशकांपासून प्रलंबित असलेला प्रश्न सुटल्यामुळे मुस्लिम समाजात समाधानाचे वातावरण असून, राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांचे आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १६८ ■ शनिवार, १६ मे २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## जिल्हा परिषदेतील ३३ कर्मचाऱ्यांच्या बदल्या

### जनगणना कामातील कर्मचारी वगळले; समुपदेशनाद्वारे प्रक्रिया पूर्ण

**वर्धा जनमाध्यम :** जिल्हा परिषदेत विविध विभागांतील गट-क व गट-ड संवर्गातील ३३ कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या. राज्य शासनाच्या ग्राम विकास विभागाच्या उपसचिवांच्या १७ एप्रिल २०२६ रोजीच्या पत्रानुसार ही बदली प्रक्रिया राबविण्यात आली. जनगणना २०२६ च्या कामासाठी नियुक्त कर्मचाऱ्यांना वगळून समुपदेशनाद्वारे बदल्या करण्यात आल्या.



जिल्हा परिषदेच्या सिंधूताई सपकाळ सभागृहात ही प्रक्रिया पार पडली. सामान्य प्रशासन, आरोग्य, पशुसंवर्धन व वित्त विभागातील कर्मचाऱ्यांचा यात समावेश आहे.

सामान्य प्रशासन विभागात सहाय्यक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, वरिष्ठ सहाय्यक (लिपीक), वाहन चालक व शिपाई संवर्गातील बदल्या करण्यात आल्या. जनगणना कामामुळे एका विस्तार अधिकाऱ्यासह एका कनिष्ठ सहाय्यकाला प्रक्रियेतून वगळण्यात आले.

आरोग्य विभागात औषध निर्माण अधिकारी, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेवक व महिला आरोग्य सेवकांच्या बदल्या करण्यात आल्या. महिला आरोग्य सेवकांच्या प्रशासकीय व विनंती बदल्यांची संख्या अधिक राहिली. एका आरोग्य पर्यवेक्षकाला जनगणना कामामुळे प्रक्रियेतून वगळण्यात आले.

पशुसंवर्धन विभागात पशुधन पर्यवेक्षक व सहाय्यक पशुधन विकास अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या. वित्त विभागात सहाय्यक लेखा अधिकारी व कनिष्ठ लेखा अधिकाऱ्यांचा समावेश होता. जनगणना कामामुळे वरिष्ठ सहाय्यक (लेखा) व कनिष्ठ सहाय्यक (लेखा) यांना बदली प्रक्रियेतून वगळण्यात आले.

दरम्यान, या बदल्यांमुळे संबंधित विभागांतील कामकाजात फेरबदल होणार असून, काही कर्मचाऱ्यांनी इच्छित ठिकाणी बदली मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

## वाघ पकडणारा अधिकारी मेळघाटला

**समुद्रपूर जनमाध्यम :** परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या पट्टेदार वाघांना पिंजराबंद करून शेतकऱ्यांना दिलासा देणारे वनपरिक्षेत्र अधिकारी निलेश रमेश गावंडे यांची धारणी मेळघाट येथे अतिक्रमण निर्मूलन विभागात बदली करण्यात आली आहे. गावंडे यांनी सहकाऱ्यांसह रात्रंदिवस जंगल पिंजून दोन वाघांना पकडण्याची धाडसी मोहीम यशस्वी केली होती. त्यामुळे समुद्रपूर परिसरातील ग्रामस्थांचा त्यांच्यावर मोठा विश्वास निर्माण झाला होता.

स्थानिक शेतकरी आणि शेतमजुरांची त्यांना मुदतवाढ द्यावी अशी जोरदार मागणी असतानाच त्यांची बदली झाल्याने वनवर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. आता नव्या अधिकाऱ्यांना वाढत्या मानव-वन्यजीव संघर्षात कितपत यश मिळते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## एका क्लिकने खातं साफ! 'योनो'च्या नावाखाली सायबर चोरट्यांचा डल्ला

### एपीके फाईल उघडताच सेवानिवृत्त कर्मचाऱ्याचे ३.७५ लाख रुपये गायब; व्हॉट्सअॅप लिंकने घातला गंडा

**वर्धा जनमाध्यम :** मोबाईलवर आलेली एक लिंक उघडणे एका सेवानिवृत्त कर्मचाऱ्याला चांगलेच महागात पडले. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या नावाने व्हॉट्सअॅपवर आलेल्या बनावट 'योनो एसबीआय' एपीके फाईलच्या जाळ्यात अडकवत सायबर ठगांनी तब्बल ३ लाख ७५ हजार रुपयांवर डल्ला मारल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. एका क्लिकने संपूर्ण बँक खाते साफ झाल्याने शहरात खळबळ उडाली आहे.




हनुमान नगर येथील समशेर राजमोहम्मद शेख (वय ५९) हे प्रकल्प कार्यालयातून सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांचे मगनवाडी भागातील ्ग्रँ्हॅ द ध्र्् शाखेत खाते आहे. त्यांच्या खात्यात जीपीएफचे १५ लाख रुपये जमा होते. त्यापैकी काही रक्कम वैयक्तिक कामासाठी खर्च केल्यानंतर खात्यात ३ लाख ८७ हजार १८७ रुपये शिल्लक होते.

४ मे रोजी त्यांच्या मोबाईलवर ्भ्द्ध ए्ँ च्या नावाने एपीके फाईलची लिंक पाठविण्यात आली. तुमचे योनो अॅप बंद झाले असून ते पुन्हा सुरू करण्यासाठी खालील प्रक्रिया पूर्ण करा, असा संदेश त्या लिंकसोबत होता. बँकेकडून अधिकृत संदेश असल्याचा विश्वास बसल्याने त्यांनी लिंक उघडून मोबाईल क्रमांक, एटीएम कार्डचे शेवटचे चार अंक आणि इतर माहिती भरून सबमिट केली.

मात्र काही क्षणांतच त्यांच्या मोबाईलवर व्यवहारांचे संदेश येण्यास सुरुवात झाली आणि खात्यातील रक्कम टप्प्याटप्प्याने ऑनलाइन काढण्यात आली. काही मिनिटांतच जवळपास संपूर्ण खाते रिकामे झाल्याचे लक्षात येताच त्यांना मोठा धक्का बसला.

या प्रकरणी वर्धा पोलीस यांनी तक्रारीवरून गुन्हा दाखल केला असून सायबर पोलिसांनी तांत्रिक तपास सुरू केला आहे. दरम्यान, अनोळखी लिंक, एपीके फाईल किंवा बँकेच्या नावाने येणाऱ्या संदेशांपासून सावध राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. कोणतीही गोपनीय माहिती मोबाईलवर शेअर करू नका, असा इशाराही नागरिकांना देण्यात आला आहे.

## समृद्धी महामार्गावर पोलिसांचा थरारक पाठलाग; दारू तस्करांचा डाव उधळला

### ३६ पेट्या विदेशी दारूसह तब्बल १२.९५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा जनमाध्यम :** शहर पोलिसांच्या रात्रगस्तीदरम्यान समृद्धी महामार्गावर दारूतस्करांचा मोठा डाव उधळून लावण्यात आला. पोलिसांनी संशयित वाहनाला थांबविण्याचा प्रयत्न केला असता चालकाने भरधाव वेगाने गाडी पळवून थेट पोलिसांनाच चकवा देण्याचा प्रयत्न केला. मात्र थरारक पाठलागानंतर तस्करांनी वाहन रस्त्यावर टाकून अंधाराचा फायदा घेत पलायन केले. पोलिसांनी वाहनाची झडती घेतली असता तब्बल ३६ पेट्या विदेशी दारूचा साठा आढळून आला. या कारवाईत सुमारे १२ लाख ९५ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दि. १५ मे रोजी उमेश उगले हे पोलीस कर्मचारी अनिल चव्हाण आणि चालक आकाश कुंभारे यांच्यासह शहर पोलीस ठाणे हद्दीत रात्रगस्त करीत होते. यावेळी मुखबिराकडून जेल रोड परिसरात एक संशयित वाहन येत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली.



त्यानंतर पोलिसांनी दोन पंचांसमक्ष वर्धा कारागृहाजवळ सापळा रचून संशयित वाहनाला थांबविण्याचा प्रयत्न केला. मात्र चालकाने वाहन न थांबवता भरधाव वेगाने पोस्ट ऑफिस चौक, डॉ. पंजाबराव देशमुख चौक, आरती चौक मार्गे नागपूरच्या दिशेने धूम ठोकली. पोलिसांनीही तत्काळ पाठलाग सुरू केला.

दरम्यान, तस्करांनी खडकीजवळील पुलाखालून सिंधी रेल्वे मार्गे थेट समृद्धी महामार्गावर विरुद्ध दिशेने वाहन नेऊन पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांचा पाठलाग सुरूच असल्याचे पाहून अमगावजवळ वाहन रस्त्यावर सोडून आरोपी अंधाराचा फायदा घेत पसार झाले.

पोलिसांनी पंचांसमक्ष वाहनाची तपासणी केली असता इद्दे म्दिएज्दू या वाहनात विनापरवाना ३६ पेट्या विदेशी दारूचा साठा आढळून आला. दारूसाठा आणि वाहनासह एकूण १२ लाख ९५ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई प्रमोद मकेश्वर आणि संतोष टाले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. फरार आरोपींचा शोध सुरू असून, दारूतस्करीच्या मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

## हरवलेले मोबाईल शोधून सेलू पोलिसांची दमदार कामगिरी

**सेलू जनमाध्यम :** गहाळ झालेल्या मोबाईलचा शोध घेण्यात सेलू पोलीस स्टेशन ला यश आले असून दोन नागरिकांना त्यांचे मोबाईल परत मिळाल्याने समाधान व्यक्त होत आहे. प्राप्त तक्रारींचा तातडीने पाठपुरावा करत पोलिसांनी एकूण ३१ हजार रुपये किमतीचे दोन मोबाईल शोधून काढले.



यामध्ये कैलास चौधरी रा. सेलू यांचा ओप्पो कंपनीचा अंदाजे १० हजार रुपये किमतीचा मोबाईल तसेच आदित्य उईके रा. जुनगड यांचा मोटोरोला कंपनीचा अंदाजे २१ हजार रुपये किमतीचा मोबाईल शोधण्यात पोलिसांना यश आले. शोधमोहीम पूर्ण होताच दोन्ही मोबाईल तक्रारदारांच्या स्वाधीन करण्यात आले.

## पालकमंत्री कार्यालय आपल्या दारी उपक्रमाचा शुभारंभ

### शिबिराच्या माध्यमातून प्रशासन आणि नागरिक संवाद अधिक सक्षम होणार

**वर्धा जनमाध्यम :** पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या विशेष पुढाकारातून 'पालकमंत्री कार्यालय आपल्या दारी' हा विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत आज हनुमान मंदिर परिसर प्रभाग क्रमांक १ येथे नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी तसेच लाभार्थ्यांच्या अर्ज प्रक्रियेसंदर्भात मार्गदर्शन करण्याकरीता शिबिराचे आयोजन करुन पालकमंत्री कार्यालय आपल्या दारी उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी पालकमंत्री कार्यालयाचे योगेश देशमुख, यश आगे, रवी डोमाले, आकाश चावके, ऋषिकेश तहकिक, पियुष गांगरेडीवार, नयन करे यांच्यासह नगर परिषदेचे माजी बांधकाम सभापती निलेश किटे, नगरसेवक सतिश मिसाळ, नगरसेविका उज्वला पेठे, प्रफुल शर्मा, गुंजन मिसाळ, आशिष मिश्रा व परिसरातीलल नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी शिबिरात विविध शासकीय योजनांची माहिती नागरिकांना देण्यात आली. तसेच लाभार्थ्यांच्या अर्ज प्रक्रियेसंदर्भात मार्गदर्शन आणि आवश्यक सहाय्य करण्यात आले. तसेच नागरिकांकडून योजनेच्या लाभाकरीता अर्ज भरण्यात आले.



पालकमंत्री कार्यालय आपल्या दारी या उपक्रमांतर्गत वर्धा शहरातील विविध प्रभागांमध्ये दि.१६ ते २२ मे या कालावधीत सानेगुरुजी नगर, गोंड प्लॉट, होमगार्ड ऑफिस रोड, अशोक नगर, राष्ट्रभाषा रोड, महादेवपुरा तसेच मोठी विहिर परिसरात शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

राज्य शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध योजना सर्वसामान्याच्या दारापर्यंत पोहोचविण्यासाठी सदर उपक्रम सुरु करण्यात आला असून या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून अशा शिबिरांच्या माध्यमातून प्रशासन आणि नागरिक यांच्यातील दुवा अधिक सक्षम होत असल्याचे पालकमंत्री कार्यालयाच्यावतीने सांगण्यात आले आहे.

## कर्जाच्या आमिषाने युवकाला जाळ्यात ओढले; बँक खात्यातून सट्ट्याचा काळाबाजार

### -क्रिकेट बेटिंगसाठी लाखोंची उलाढाल; चौकशी करताच जीवे मारण्याची धमकी

#### फायनान्स कंपनी संचालकावर गुन्हा

**वर्धा जनमाध्यम :** कर्ज मिळवून देण्याचे आमिष दाखवत युवकाच्या नावाने बँक खाते उघडून त्या खात्यातून क्रिकेट बेटिंग आणि सट्टापट्टीच्या लाखो रुपयांच्या व्यवहारांचा काळाबाजार चालवल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. एवढेच नव्हे, तर या व्यवहारांबाबत चौकशी करणाऱ्या युवकाला जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याने शहरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी फायनान्स कंपनीचा संचालक तन्मय भगत याच्याविरुद्ध शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

वाहीतपूर येथील प्रशील लोकेश लोटे (वय २१) याला पैशांची गरज असल्याने त्याची ओळख समतानगर येथील तन्मय भगत याच्याशी झाली. स्वतःला फायनान्स कंपनीचा संचालक सांगणाऱ्या तन्मयने प्रशीलला कर्ज मंजूर करून देण्याचे आमिष दाखविले. विश्वास संपादन करण्यासाठी त्याच्याकडून विविध कागदपत्रे घेतली आणि बँक ऑफ महाराष्ट्र च्या निर्मल बेकरी चौक शाखेत त्याच्या नावाने खाते उघडले. एवढ्यावरच न थांबता त्याच्या नावाने नवीन सिमकार्डही घेण्यात आले.

यानंतर त्या खात्यातून अचानक लाखो रुपयांची उलाढाल सुरू झाली. संशय आल्याने प्रशीलने वारंवार चौकशी केली असता फायनान्स कंपनीच्या कामासाठी खाते वापरत आहोत, काही धोका नाही, असे सांगत तन्मयने वेळ मारून नेली. मात्र नंतर तन्मय भगतविरुद्ध फसवणुकीचा आणखी एक गुन्हा दाखल झाल्यानंतर त्याचे विविध कारनामे समोर येऊ लागले.

यामुळे धास्तावलेल्या प्रशीलने पोलिसांकडे धाव घेत तक्रार दाखल केली. तपासादरम्यान प्रशीलच्या नावाने उघडलेल्या खात्यातून तब्बल ६ ते ७ लाख रुपयांचे व्यवहार झाल्याचे उघड झाले. विशेष म्हणजे, या व्यवहारांची कोणतीही माहिती प्रशीलला नव्हती. ही रक्कम क्रिकेट बेटिंग, सट्टापट्टी आणि इतर अवैध व्यवहारांतून फिरविण्यात आल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. या प्रकरणी वर्धा पोलीस यांनी तन्मय भगत याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. तन्मयने इतर काही युवकांच्या नावानेही अशाच प्रकारे बँक खाती उघडून काळा पैसा फिरविल्याची माहिती समोर येत असून, सखोल तपासात आणखी मोठे रॅकेट उघड होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## महागाईच्या आगीत जनता होरपळली; महिला काँग्रेसचा भाजप सरकारवर हल्लाबोल

### पेट्रोल, डिझेल अन् दूध दरवाढीविरोधात वर्ध्यात रणरागिणी रस्त्यावर

**वर्धा जनमाध्यम :** पेट्रोल, डिझेल आणि दूधाच्या सातत्याने वाढणाऱ्या किमतींमुळे सर्वसामान्य जनतेचे आर्थिक कंबरडे मोडले असताना केंद्रातील भाजप सरकार मात्र बघ्याची भूमिका घेत असल्याचा संतप्त आरोप करीत वर्धा जिल्हा महिला काँग्रेस कमिटीच्या वतीने आज जोरदार आंदोलन करण्यात आले. वाढत्या महागाईविरोधात महिला काँग्रेसच्या कार्यकर्त्या अक्षरशः रणरागिणी बनून रस्त्यावर उतरल्या आणि केंद्र सरकारच्या जनविरोधी धोरणांविरोधात तीव्र घोषणाबाजी करत निषेध नोंदविला.

स्व. इंदिरा गांधी यांच्या पुतळ्याजवळील पेट्रोल पंपासमोर हे आंदोलन पार पडले. 'बहोत हो गई महंगाई की मार'च्या घोषणांनी परिसर दणाणून गेला.



पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या दरामुळे वाहतूक खर्च प्रचंड वाढला असून त्याचा थेट परिणाम भाजीपाला, अन्नधान्य आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किमतींवर होत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. दूधाच्या दरवाढीमुळे घरगुती बजेट पूर्णपणे कोलमडले असून महिलांना संसाराचा गाडा चालविताना मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. महागाईमुळे शेतकरी, कामगार, महिला, युवक आणि मध्यमवर्गीय कुटुंबांचे जगणे कठीण झाले असून केंद्र सरकार मात्र केवळ घोषणा आणि जाहिरातबाजी करण्यात व्यस्त असल्याची टीका आंदोलनादरम्यान करण्यात आली. जनतेच्या प्रश्नांवर उत्तर नाही, पण दरवाढ मात्र थांबण्याचे नाव घेत नाही, असा संताप महिला काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. या आंदोलनाचे नेतृत्व अरुणा धोटे यांनी केले. यावेळी कमल डगवार, संगीता ठवळे, लता नंदरधने, दमयंती घोडमारे, ऋतुजा भोयर, दामिनी कुमरे, कल्याणी पाटील, वनिता मरसकोल्हे यांच्यासह महिला काँग्रेसच्या अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## कचरा-अतिक्रमणाने वर्ध्याचा गळा घोटला; नगराध्यक्षांची अखेर धडक एन्ट्री

**वर्धा जनमाध्यम :** गांधींच्या कर्मभूमीची ओळख असलेल्या वर्धा शहराला कचरा, अतिक्रमण आणि ट्रॅफिक कोंडीने अक्षरशः वेठीस धरले असताना अखेर नगर परिषद प्रशासनाला जाग आली आहे. शहरातील बकाल झालेली परिस्थिती, रस्त्यांवर वाढलेले अतिक्रमण आणि बाजारपेठांतील अनियंत्रित वाहतूक यामुळे नागरिक त्रस्त झाले असतानाच नगर परिषद अध्यक्ष डॉ. सुधीर पांगुळ यांनी शहरात धडक दौरा करून प्रशासनाला ?क्शन मोडवर आणले.

छत्रपती शिवाजी महाराज चौक, ठाकरे मार्केट, सोशलिस्ट चौक, निर्मल बेकरी परिसर, अंबिका हॉटेल परिसरासह विविध व्यापारी भागांची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. या पाहणीत शहरातील विदारक वास्तव समोर आले. रस्त्यांच्या कडेला साचलेला कचरा, फूटपाथ गिळंकृत करणारे अतिक्रमण आणि चौकाचौकात उभ्या वाहनांमुळे शहराचा श्वासच कोंडल्याचे चित्र दिसून आले. डॉ. सुधीर पांगुळ यांनी व्यापारी, वाहनचालक आणि नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांच्या समस्या ऐकून घेतल्या. अतिक्रमणामुळे पादचाऱ्यांना चालायला जागा नाही, तर ट्रॅफिक जाममुळे बाजारपेठेत येणेच अवघड झाले आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली. पाहणीदरम्यान नगराध्यक्षांनी संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दांत सुनावत, 'ही आपली शहरं आहे. शहर स्वच्छ, सुंदर आणि सुस्थितीत ठेवणे ही सर्वांची जबाबदारी आहे, असे ठणकावले. ट्रॅफिक कोंडी कमी करण्यासाठी विशेष मोहीम, अतिक्रमण हटाव कारवाई आणि कचरा व्यवस्थापन सुधारण्यासाठी तातडीने कृती आराखडा तयार करण्याचे आदेश त्यांनी दिले. दरम्यान, नगर परिषद प्रशासन आता शहरातील प्रमुख बाजारपेठांमध्ये विशेष स्वच्छता मोहीम आणि अतिक्रमणविरोधी कारवाई राबविण्याच्या तयारीत असल्याची माहिती सूत्रांनी दिली. अनेक दिवसांपासून केवळ कागदोपत्री राहिलेल्या कारवाया आता प्रत्यक्षात उतरतील का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. शहराच्या विकासासाठी केवळ बैठका नव्हे, तर मैदानात उतरून काम करण्याची गरज असल्याचा संदेश या दौऱ्यातून देण्यात आला.

## पालकमंत्री आज घेणार जिल्ह्यातील विविध विकास कामे व पाणी टंचाईचा आढावा

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील विविध विकासकामे, पर्यटन व तीर्थ स्थळ प्रकल्प, पाणीटंचाई आणि विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा पालकमंत्री तथा राज्याचे गृह (ग्रामीण), शालेय शिक्षण, सहकार व खनिकर्म राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर शनिवारी १६ मे रोजी घेणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

बैठकीला जिल्हाधिकारी वान्मथी सी यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत. सकाळी ११ वाजता बैठकीत प्रारंभ होईल. बैठकीत सन २०२४-२५ व २०२५-२६ या आर्थिक वर्षात मंजूर तसेच प्रस्तावित तीर्थ स्थळ व यात्रा क्षेत्राचा विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात येणार आहे. विभागामार्फत सुरू असलेल्या कामांची प्रगती, निधीची उपलब्धता आणि कामांच्या अंमलबजावणीची स्थिती यावर चर्चा होणार आहे.

दुपारी १२ वाजता जिल्ह्यातील वन पर्यटन विकास, इको टुरिझम तसेच पर्यटन विभागांतर्गत मंजूर व प्रस्तावित प्रकल्पांचा आढावा घेण्यात येणार आहे. जिल्ह्यातील पर्यटन स्थळांच्या विकासाला गती देण्याच्या दृष्टीने ही बैठकी महत्त्वपूर्ण आहे. दुपारी १२.३० वाजता बोरधरण परिसरातील एफडीसीएम रिसॉर्ट आणि प्रस्तावित बॉटनिकल गार्डनच्या आराखड्याबाबत चर्चा होणार आहे.


ग्रामपंचायत, वायगांव (गोंड)
तालुका - समुद्रपूर, जि.वर्धा

**निविदा सूचना क्र.०१/२०२५-२६**

**ग्रामपंचायत वायगांव (गोंड) वतीने पाणी टंचाई कार्यक्रम (सन २०२६ चा उन्हाळा) अंतर्गत कामाची पत्र ब-१ फॉर्म मध्ये खालील योजना मधील नोंदणीकृत असलेले ठेकेदार जे पूर्व अर्हता अटी पूर्ण करतील अशा कंत्राटदारांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहे.**

| | | |
|---|---|---|
| **मौजा** | - | **वायगांव (गोंड) येथील नळ पाणी पुरवठा विशेष दुरुस्ती करणे.** |
| **प्राकलन किंमत** | - | **रु.६९६६०७/-** |
| **TS No.EE/३६३** | - | **२३.०३.२०२६** |
| **निविदा रक्कम** | - | **१०००/-** |
| **अनामत रक्कम** | - | **६९६६/-** |
| **निविदा प्रसिध्दी दिनांक** | - | **१८.०५.२०२६ ते २४.०५.२०२६ सायं.५.०० वाजता** |
| **निविदा उघडण्याची दिनांक** | - | **येत्या मासिक सभेमध्ये** |

**निविदेच्या अटी व शर्ती ग्रामपंचायत नोटीस बोर्डवर पाहता येईल.**

सरपंच,
ग्रामपंचायत वायगांव (गोंड)
तालुका - समुद्रपूर, जि.वर्धा

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत वायगांव (गोंड)
तालुका - समुद्रपूर, जि.वर्धा

# भारताला महागाईचा झटका, पण UAE कडून मोठा दिलासा!



## इंधन दरवाढीदरम्यान पंतप्रधान मोदींच्या दौ-यात 5 ऐतिहासिक करार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** देशात पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या दरांमुळे सर्वसामान्य नागरिकांवर महागाईचा मोठा भार पडत असतानाच भारतासाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. पंतप्रधान यांच्या संयुक्त अरब अमिराती (UAE) दौ-यात भारत आणि UAE दरम्यान उर्जा, व्यापार, तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधांसंदर्भात पाच महत्त्वपूर्ण करारांवर स्वाक्ष-या करण्यात आल्या आहेत. या करारांमुळे भारताला कच्च्या तेलाच्या पुरवठ्यात स्थिरता मिळण्यास मदत होणार असून भविष्यात इंधन दर नियंत्रणात ठेवण्यासाठीही मोठा फायदा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.




पेट्रोल आणि डिझेलच्या दरवाढीमुळे वाहतूक, अन्नधान्य, बांधकाम आणि दैनंदिन वस्तूंच्या किंमती वाढण्याची भीती निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत छत्र्क कडून मिळालेला उर्जा सहकार्याचा प्रस्ताव भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. दोन्ही देशांमध्ये दीर्घकालीन तेलपुरवठा, एलएनजी आयात, हरित उर्जा प्रकल्प आणि डिजिटल पेमेंट प्रणाली मजबूत करण्यावर भर देण्यात आला.

या दौ-यात झालेल्या पाच प्रमुख करारांमध्ये उर्जा सुरक्षेसाठी दीर्घकालीन सहकार्य, रुपया-दिरहम व्यवहार वाढविणे, भारतीय कंपन्यांसाठी UAE मध्ये गुंतवणुकीच्या नव्या संधी, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील भागीदारी तसेच बंदरे आणि लॉजिस्टिक नेटवर्क विकसित करण्यासंदर्भातील सहकार्याचा समावेश आहे. विशेष म्हणजे, जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किंमती वाढत असताना भारताला स्थिर पुरवठा मिळावा यासाठी UAE ने सकारात्मक भूमिका घेतल्याचे सूत्रांनी सांगितले. त्यामुळे भविष्यात भारताच्या उर्जा सुरक्षेला बळकटी मिळणार असल्याचा विश्वास केंद्र सरकारने व्यक्त केला आहे.

पंतप्रधान मोदी यांनी या बैठकीनंतर भारत-UAE संबंध नव्या आर्थिक युगात प्रवेश करणारे असल्याचे म्हटले. तर UAE नेतृत्वाने भारताला आपला सर्वात विश्वासू रणनीतिक भागीदार असल्याचे सांगत भविष्यात आणखी गुंतवणूक वाढविण्याचे संकेत दिले आहेत. दरम्यान, देशातील नागरिकांना इंधन दरवाढीचा फटका बसत असला तरी UAE सोबतचे हे करार दीर्घकालीन दृष्टीने भारतासाठी आर्थिक स्थैर्य आणि उर्जा सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.



## राज्यभरात उन्हाच्या तीव्र झळा; 22 जिल्ह्यांत पारा 45 अंशावर

**मुंबई / प्रतिनिधी-** राज्यभरात उन्हाच्या तीव्र झळा सोसाव्या लागत आहेत. अवघ्या आठ दिवसांपूर्वी राज्यातील केवळ सहा जिल्हे आणि २ तालुक्यांत तापमानाचा पारा ४५ अंशांच्या पुढे होता. आता मात्र राज्यातील एकूण २२ जिल्हे आणि तब्बल १८३ तालुके उन्हाच्या तडाख्यात सापडले असून, येथील तापमानाचा पारा ४५ अंश सेल्सिअसच्या पुढे गेला आहे. राज्य मंत्रिमंडळासमोर सादरीकरणातून ही बाब समोर आली आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या गुरु वारच्या बैठकीत आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाकडून राज्यभरातील तापमानाची बदलती स्थिती, अवकाळी पाउस आणि वीज कोसळून झालेल्या जीवितहानीबाबत सादरीकरण करण्यात आले.७ मे या दिवशीचा एकमेव अपवाद वगळता दररोज विविध जिल्हे आणि तालुक्यांतील पारा वाढून ४५ अंशांच्या पुढे जात असल्याचे निदर्शनास आले आहे. सोमवार, ११ मे रोजी १६ जिल्ह्यांतील ५१ तालुक्यांत पारा ४५ अंशांवर पोहोचला होता. त्यानंतर सलग दोन दिवस १०६ आणि १८३ तालुक्यांतील तापमानाचा पारा वाढलेला असून, ४५ च्या पुढे गेला आहे.दरम्यान, या हीट वेव्हचा सामना करण्यासाठी प्रशासनाने अलर्ट जारी केल्याचेही सांगण्यात आले. दरम्यान, या काळात वीज कोसळून दहा लोकांसह २७ प्राणी दगावल्याचीही माहिती देण्यात आली.

**३ हजार २८ धरणांत ५०३.७६ टीएमसी पाणीसाठा-**राज्यातील सहा महसुली विभागांतील एकूण ३ हजार २८ धरणांत ५०३.७६ टीएमसी इतका उपयुक्त पाणीसाठा म्हणजे ३५ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. गेल्यावर्षी ३० टक्के पाणीसाठा होता. मोठ्या, मध्यम आणि लघू प्रकल्पांतील उपयुक्त पाणीसाठादेखील मागील वर्षीच्या तुलनेत यंदा जास्त आहे. हीच स्थिती राज्यातील १२ मोठ्या धरणांतील पाणीसाठ्याबाबत आहे. मात्र, यंदा उन्हाची तीव्रता जास्त असून, अल निनोमुळे पाउस लांबण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्यामुळे पाणी काटकसरीने वापरण्याची आवश्यकता आहे.

## भजन करता करताच प्रबोधनकार रामधन महाराजांचे निधन

जालना : जालना जिल्ह्यातून अत्यंत दुःखद आणि धक्कादायक घटना समोर आली आहे. बंजारा समाजाचे ज्येष्ठ प्रबोधनकार तथा प्रसिद्ध भजनकार रामधन महाराज राठोड यांचे भजन कार्यक्रमादरम्यान हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. भजनात तल्लीन होउन समाजप्रबोधनाचे विचार मांडत असतानाच त्यांना



अचानक अस्वस्थ वाटू लागले आणि काही क्षणांतच ते मंचावर कोसळले. ही संपूर्ण घटना तेथील एका तरुणाने मोबाईल कॅमे-यात रेकार्ड केली असून, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, परतूर तालुक्यातील सुरु मगाव तांडा येथे बंजारा समाजाच्या वतीने रामधन महाराज राठोड यांच्या भजन आणि समाजप्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला परिसरातील तसेच विविध भागांतील बंजारा बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. रामधन महाराज आपल्या खास शैलीत भजन सादर करत समाजातील ऐक्य, संस्कार आणि सामाजिक परिवर्तन याबाबत मार्गदर्शन करत होते. भजनाच्या कार्यक्रमात वातावरण पूर्णपणे भक्तिमय झाले असताना अचानक रामधन महाराज यांना चक्कर आली. काही क्षणांतच ते मंचावर कोसळल्याने उपस्थितांमध्ये एकच खळबळ उडाली. कार्यक्रमस्थळी उपस्थित नागरिकांनी तातडीने धाव घेत त्यांना सावरण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर त्यांना तात्काळ उपचारासाठी जवळच्या रु ग्णालयात नेण्यात आले. मात्र, डाक्टरांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले. भजनाच्या सुरांमध्ये आणि समाजप्रबोधनाच्या कार्यात आयुष्य घालवणा-या या महान व्यक्तिमत्त्वाचा अंतही भजन करतानाच झाल्याने उपस्थित अनेकांच्या डोळयांत अश्रू आले. रामधन महाराज यांच्या निधनाची बातमी समजताच बंजारा समाजात शोककळा पसरली असून, विविध स्तरांतून हळहळ व्यक्त केली जात आहे.

## आषाढी यात्रेत 6 तासांत होणार विठ्ठल-रूक्मिणीचे दर्शन

**पंढरपूर/प्रतिनिधी-**अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या पंढरीचे श्री विठ्ठल-रु क्मिणी हे महाराष्ट्रासह कर्नाटक आणि देशभरातील भाविकांचे श्रद्धास्थान आहे. आषाढी-कार्तिकी, चैत्री-माघी यात्राबरोबरच अगदी वर्षभरदेखील लाखो भाविक पंढरपूरला येत असतात. वारकरी, भाविकांची सोय आणि तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी सरकारने वाराणसीच्या धर्तीवर क?रीडोर प्रकल्प हाती घेतला आहे. याच कारिडारला नुकतेच राज्याच्या शिखर समितीने मंजुरी दिली. त्यामुळे यात्रा काळात केवळ सहा ते सात तासांत श्री विठ्ठल-रु क्मिणी मातेचे भाविकांना सुलभतेने दर्शन घेता येईल, अशी माहिती जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी दिली. प्रस्तावित पंढरपूर कारिडारसाठी ४ हजार २५ कोटी रु पयांचा निधी अपेक्षित होता. मात्र सुधारित आराखड्यानुसार ३ हजार ९९३.९० कोटी रु पयांची तरतूद केली आहे. विशेष म्हणजे भूसंपादनासाठी २ हजार २६ कोटी ७२ लाख रु पयांचा निधी केवळ खर्च होणार आहे. ३० महिन्यांत प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. त्यासाठी १५ दिवसांच्या काळात ३० टक्के निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पंढरपूर कारिडारमुळे श्री विठ्ठल-रु क्मिणी मंदिर परिसराचा चेहरामोहराच बदलणार आहे. चार पुरातन वास्तू बाधित होणार असल्या तरी त्यांची जपणूक करण्यात येईल. शिवाय १४ स्वागत कमानी उभारण्यात येतील. हिंदू स्मशानभूमीचे सुशोभिकरण करण्यात येईल. पंढरपूर शहरात तीन हेलिपॅड उभारण्यात येतील. संपूर्ण शहरात सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यात येणार आहेत. पुढील ५० वर्षांचा विचार करून कारिडार विकसित करण्यात येणार आहे. त्यासाठी चंद्रभागा नदीवरील जुन्या दगडी पुलाच्या शेजारी दोन नवे पादचारी पूल बांधण्यात येतील. पोलिस चौकी, पालखी तळाचा विकास, वाहनतळाची व्यवस्था आणि ५० एकर क्षेत्रातील पालखी तळाची उभारणी आदी कामांचादेखील कारिडारमध्ये समावेश असेल.

**यात्रा काळात श्री विठ्ठल दर्शन लवकर होणार-**मुख्यमंत्र्यांनी ३० महिन्यांच्या काळात कारिडार प्रकल्प पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. पहिल्या सहा महिन्यांत भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. कारिडार पूर्ण झाल्यानंतर यात्रा काळात येणा-या भाविकांना सहा ते सात तासांत श्री विठ्ठल-रु क्मिणीचे दर्शन घेता येईल असेही जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी



सांगितले.

**कारिडारमधील कामांचे असे असेल नियोजन-** एक ते सहा महिन्यांत होणार भूसंपादन.जागा रिकाम्या करण्यासाठी लागणार चार महिने.-बांधकामासाठी ११ ते २८ महिने, बांधकाम पूर्ण झाल्यानंतर हस्तांतरणास २९ ते ३० महिने.

-पंढरपूर शहराला जोडणारे नवे २२ मार्ग विकसित केले जाणार आहेत.-कारिडारमध्ये स्थानिक व्यापा-यांना खालील बाजूस व्यापारी गाळे तर त्यावरील बाजूस प्रशासकीय कार्यालयांना जागा देणार.-४८८ व्यापारी गाळ्यांचे संकुल नव्याने उभारण्यात येणार आहे. त्यामध्ये संतपीठ, व्हीआयपी रूम, सुरक्षा, वैद्यकीय केंद्रे उभारली जाणार आहेत.

-२.२ किलोमीटर लांबी आणि १५ मीटर रुंदीचा नगर प्रदक्षिणा मार्ग विकसित होणार आहे.-वयस्कर वारक-यांसाठी उज्जैनच्या धर्तीवर नदीकाठी स्नान कुंड उभारणार आहे.

-४३५ चारचाकी, ८०० दुचाकी क्षमतेचे वाहनतळ निर्माण करणार.-नगरपरिषदेची जुनी इमारत,लोकमान्य विद्यालय,नगरपरिषदेच्या शाळा क्रमांक सहाचे जतन आणि संवर्धन होणार आहे. -पंढरपूर परिसरात १५ स्वागत कमानी उभारणार आहे.

## पुण्यात टायमर बॉम्ब ठेवणा-या संशयित आरोपीला नागपूरमधून अटक

**पुणे :** पुण्यातील हडपसर परिसरात एका रु ग्णालयाच्या आवारात एक टायमर बाम्बसदृश वस्तू आढळून आल्याने बुधवारी (१३ मे) संध्याकाळी मोठी खळबळ उडाली होती. या घटनेनंतर पुणे पोलिस, बाम्ब शोधक पथक व दहशतवादविरोधी पथक तसेच पुणे गुन्हे शाखेने तातडीने तपास सुरू केला होता. यावेळी, रात्री उशिरा ही संशयित वस्तू सुरक्षितपणे निकामी करण्यात पोलिसांना यश आले आणि सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला. पण यानंतर ही वस्तू ठेवणा-या व्यक्तीचा शोध सुरू झाला. अखेर एटीएसने या प्रकरणातील आरोपीला अटक केली आहे.या प्रकरणात आतापर्यंत समोर आलेल्या माहितीनुसार, या प्रकरणाचा कोणत्याही दहशतवादी संघटनेशी संबंध नसल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. प्राथमिक माहितीनुसार, वैयक्तिक रागातून आरोपीने रु ग्णालयाला लक्ष्य केले असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती. यापूर्वी, तपासात पोलिसांनी १०० हून अधिक सीसीटीव्ही कॅमेरे तपासले होते. तसेच सीसीटीव्हीतील संशयित हालचाली पाहून १५ ते १८ जणांची चौकशीही करण्यात आली होती. आता अखेर तांत्रिक पुराव्यांमुळे आरोपीच्या चेह-यावरून पडदा उठला असून आरोपीची ओळख पटली. त्यानंतर त्याला नागपूरमधून अटक करण्यात आली आहे. पण, अद्याप आरोपीने असे कृत्य का केले? याबाबत आता चौकशी सुरू आहे. शिवाजी राठोड असे संशयित आरोपीचे नाव असून त्याला नागपूरमध्ये सापळा रचून अटक करण्यात आली. पुणे येथील उषाकिरण रु ग्णालयात ब?म्ब ठेवणारा राठोड नावाचा संशयित आरोपी हा आझाद हिंद एक्स्प्रेसने नागपूरला येणार असल्याची माहिती एटीएसला मिळाली. त्यानंतर, फलाट क्रमांक ६ वर त्याला अटक करण्यासाठी एटीएसने सापळा रचला होता.

## 31 वर्षीय महिलेने 5 दिवसांत दिला 4 बाळांना जन्म

**मुरादाबाद / वृत्तसंस्था-** उत्तर प्रदेशातील मुरादाबाद जिल्ह्यातून निसर्गाचा एक अजब चमत्कार पाहायला मिळाला आहे. तीर्थंकर महावीर युनिव्हर्सिटी रु ग्णालयात एका ३१ वर्षीय महिलेने अवघ्या पाच दिवसांच्या अंतराने चार गोंडस बाळांना जन्म दिला. पाच दिवसांच्या अंतराने चार मुले जन्माला येण्याची ही पहिलीच दुर्मिळ घटना



असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे. महत्त्वाचे म्हणजे, संबंधित महिला आणि तिचे चारही बाळ सुखरूप आहेत.

अमिना (वय, ३१) असे या मातेचे नाव असून तिने पहिल्यांदाच बाळाला जन्म दिला आहे. सुरु वातीच्या तपासण्या आणि अल्ट्रासाउंड अहवालातच तिच्या गर्भात चार बाळे असल्याचे डाक्टरांना समजले. या प्रसूतीमध्ये असलेले धोके लक्षात घेता डाक्टरांनी कुटुंबीयांना पूर्वकल्पना दिली. परंतु, अमिनाचे पती अलीम आणि कुटुंबीयांनी सर्व बाळांना जन्माला घालण्याचा धाडसी निर्णय घेतला. या महिलेची प्रसूती प्रक्रिया अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण ठरली. अमिनाला प्रसूती कळा सुरु झाल्यानंतर तिला ६ मे रोजी टीएमयू रूग्णालयात दाखल करण्यात आले. तिने ९ मे रोजी पहिल्या मुलाला जन्म दिला. पहिल्या प्रसूतीनंतर पाच दिवसांनी (१४ मे) पुन्हा कळा सुरू झाल्या आणि अमिनाने एका मुलाला आणि दोन मुलींना जन्म दिला. अशा प्रकारे, पाच दिवसांच्या कालावधीत अमिनाने एकूण दोन मुले आणि दोन मुली अशा चार अपत्यांना जन्म दिला.

**कुटुंबामध्ये आनंदाचो वातावरण-**रुग्णालयातील विशेष वैद्यकीय पथक या संपूर्ण प्रक्रियेवर बारीक लक्ष ठेवून होते. रुग्णालयाच्या प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या रु ग्णालयात सामान्य प्रसूतीद्वारे अशा प्रकारे चार मुले जन्माला येण्याची ही पहिलीच वेळ आहे. सध्या आई आणि चारही बाळांची प्रकृती स्थिर असून त्यांच्या आरोग्याची विशेष काळजी घेतली जात आहे. पत्नी आणि मुलांच्या सुरक्षिततेबद्दल पती अलीम यांनी समाधान व्यक्त केले असून, अत्यंत कठीण परिस्थितीत साथ दिल्याबद्दल डाक्टर आणि रु ग्णालय कर्मचा-यांचे आभार मानले आहेत. या चमत्कारिक प्रसूतीची चर्चा सध्या संपूर्ण परिसरात रंगली आहे.

## तीव्र उष्णतेमुळे अंगणवाड्या महिनाभर बंद

**जालना** : तीव्र उष्णतेच्या पार्श्वभूमीवर राज्यातील अंगणवाड्या एक महिना बंद ठेवण्याची सूचना राज्य बालहक्क आयोगाने केली आहे. राज्यभरात मे महिन्यात



वाढलेल्या तीव्र उष्णतेच्या पार्श्वभूमीवर अंगणवाडीतील बालकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला असून महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाने याची दखल घेतली आहे. अंगणवाडीतील बालकांना उष्माघाताचा धोका टाळण्यासाठी किमान एक महिन्याची सुटी जाहीर करण्यात यावी तसेच पोषण आहारासाठी पर्यायी व्यवस्था करण्याचे निर्देश आयोगाने एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तांना दिले आहेत, अशी माहिती आयोगाचे सदस्य डॉ. संजय लाखे पाटील यांनी दिली. राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये तापमानाने विक्रमी पातळी गाठली असून प्रशासनाकडून नागरिकांना आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. अशा परिस्थितीत अंगणवाडीतील लहान बालकांच्या आरोग्याच्या सुरक्षेचा मुद्दा अधिक गंभीर बनला आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाने २७ एप्रिल २०२६ रोजी पत्राद्वारे महिला व बालविकास विभागाकडे अहवाल मागविला होता. तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार पोषण आहार प्रीमिक्स स्वरूपात देण्याबाबतही विचारणा करण्यात आली होती. मात्र आयोगाच्या वारंवार पत्रव्यवहार आणि स्मरणपत्रांनंतरही संबंधित विभागाकडून अहवाल सादर करण्यात आलेला नाही.

## ज्येष्ठ मनोविकारतज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी यांचे निधन

**ठाणे /प्रतिनिधी-** ज्येष्ठ मनोविकारतज्ज्ञ, लेखक आणि आयपीएच संस्थेचे अध्यक्ष डॉ. आनंद नाडकर्णी यांचे आज शुक्रवारी (१५ मार्च) पहाटे ५ वाजता मुंबईतील एका रु ग्णालयात निधन झाले. त्यांच्या निधनाने ठाणे शहरासह साहित्य, सामाजिक आणि वैद्यकीय क्षेत्रात शोककळा पसरली आहे. ते ठाण्यातील समतानगर परिसरात वास्तव्यास होते. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर मुंबईतील रु ग्णालयात उपचार सुरू होते. गुरु वारी रात्रीपासून त्यांची प्रकृती अधिक खालावली होती. आज सकाळी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या पश्चात पत्नी आणि मुलगा असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर ठाण्यात अन्त्यसंस्कार करण्यात येणार आहेत. डॉ. आनंद नाडकर्णींवर मागील आठवड्यात झालेल्या शस्त्रक्रियेनंतर त्यांच्या प्रकृतीत काही गुंतागुंत निर्माण झाली होती. त्यांच्या निधनाने वैद्यकीय, साहित्य आणि सामाजिक क्षेत्रात हळहळ व्यक्त केली जात आहे.डॉ. आनंद नाडकर्णी यांनी १९८० साली एमबीबीएस आणि १९८४ साली मनोविकारशास्त्र विषयात एम.डी. पदवी संपादन केली. मानसिक आजारांविषयी समाजात असलेल्या गैरसमजुती दूर करण्यासाठी त्यांनी २३ मार्च १९९० रोजी ठाण्यात इन्स्टिट्यूट फार सायकलाजिकल हेल्थ (आयपीएच) या संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी मानसिक आरोग्य जनजागृतीसाठी मोठे योगदान दिले. सोशल मीडियातूनही डॉ. आनंद नाडकर्णी यांनी मानसिक आरोग्याबाबत



लोकांना जागृत करण्याचे काम केले आहे.मनोविकारतज्ज्ञ म्हणून कार्य करताना त्यांनी समुपदेशन, स्व-विकास आणि समाजप्रबोधनासाठी साहित्य, संगीत आणि संवाद यांचा प्रभावी वापर केला. लेखक, व्याख्याते आणि समुपदेशक म्हणून त्यांनी समाजात वेगळी ओळख निर्माण केली होती. ते पुण्यातील मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्राचे संस्थापक सदस्यदेखील होते. त्यांनी साहित्य आणि नाट्य क्षेत्रातही मोठे योगदान दिले. त्यांनी अनेक नाटकंदेखील लिहिली असून मराठीत १७ पुरस्कारप्राप्त पुस्तकेही प्रकाशित केली आहेत. त्यांच्या अनेक पुस्तकांच्या द्वितीय आवृत्त्या प्रकाशित झाल्या असून काही पुस्तकांचे इंग्रजी आणि ब्रेल लिपीतही रु पांतर करण्यात आले आहे. त्यांच्या गद्धेपंचविशी आणि विषादयोग या पुस्तकांना महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला होता. तसेच रंग माझा वेगळा आणि असेच आम्ही सारे ही त्यांची व्यावसायिक नाटकंही विशेष गाजली होती.उपमुख्यमंत्र्यांनी घेतले अन्त्यदर्शन-नाडकर्णी यांचे पार्थिव ठाण्यातील सरस्वती मंदिर ट्रस्टच्या आवारात अन्त्यदर्शनासाठी ठेवण्यात आले होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या पार्थिवाचे अन्त्यदर्शन घेतले, तसेच नाडकर्णी यांच्या कुटुंबातील सदस्यांचे सांत्वन केले.

**आपण अष्टपैलू व्यक्तिमत्त्व गमावले : उपमुख्यमंत्री शिंदे**

शिंदेंनी ट्विट करूनदेखील डॉ. नाडकर्णींना श्रद्धांजली अर्पण केली. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले की, ज्येष्ठ मनोविकारतज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी यांच्या निधनाचे वृत्त अतिशय धक्का देणारे आहे. असीम उर्जा आणि प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचे धनी असलेले डॉ. नाडकर्णी हे ठाण्याचे लाडके सुपुत्र. गेली साडेतीन दशकं मनोविकारशास्त्राच्या क्षेत्रात त्यांनी निरलसपणे काम केले. शिंदे पुढे म्हणतात की, डॉ. नाडकर्णी यांच्या निधनामुळे उत्तम मनोविकारतज्ज्ञ, ललित लेखक, कवी, नाटककार, अभिनेता, संगीतकार, तबलावादक, चित्रकार, सामाजिक कार्यकर्ते, तत्त्वज्ञानाचे कृतिशील अभ्यासक असे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आपण गमावले आहे. त्यांना मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## केरळचा निर्णय

अखेर काँग्रेसला केरळच्या मुख्यमंत्रीपदाचा चेहरा मिळाला. व्ही. डी. सतीशन यांना काँग्रेसने कुठून शोधून आणले असे नाही. गेली पाच वर्षं तेच काँग्रेसचे विधिमंडळ पक्षनेते आणि राज्याचे विरोधी पक्षनेते होते.नुकतीच झालेली विधानसभा निवडणूकही पक्षाने त्यांच्याच नेतृत्वाखाली लढवली होती. तरीही १४० मतदारसंघांपैकी १०२ मतदारसंघात विजय मिळवूनही गेले अकरा दिवस काँग्रेसला आपला मुख्यमंत्री नक्की करता येत नव्हता. काँग्रेसच्या निर्णयाच्या विलंबाने केवळ पक्षातलेच कार्यकर्ते अस्वस्थ झाले होते, असे नाही. काँग्रेसने ज्या संयुक्त लोकशाही आघाडीचं नेतृत्व तिथे केले, त्या आघाडीतले घटक पक्षही वैतागून गेले होते. केरळमध्ये सामान्य जनतेतून 'राहुल आणि प्रियंका गांधी यांनी आता केरळ अन् वायनाड विसरावे' असे फलक फडकवण्यात आले होते.संयुक्त लोकशाही आघाडीतला प्रमुख घटक पक्ष असलेल्या इंडियन युनियन मुस्लीम लीगचे नेते पी. अब्दुल हमीद यांनी तर 'लोक आता अंत्ययात्रेतही काँग्रेसला मुख्यमंत्री ठरवता येणार की नाही? याची चर्चा करू लागले आहेत',असा जाहीर टोला हाणला होता. खुद्द वायनाडमध्ये 'राहुल-प्रियंका'ने वायनाडची 'अमेठी' केली, 'असे फलक झळकले होते. बाहेर दबाव असा वाढत असतानाही काँग्रेसमधली चर्चेची गुऱ्हाळ सुरूच होती. दहा वर्षांनंतर सत्ता येते आहे, असे दिसत असूनही काँग्रेसचं नेतृत्व नेहमीप्रमाणेच गाफील होते. 'वेळ आल्यावर बघू' या मानसिकतेतून अजूनही हे नेतृत्व बाहेर येत नाही, हाच याचा अर्थ. गोवा आणि हिमाचल प्रदेशसारखी हातात आलेली राज्ये गमावूनही हे नेतृत्व काहीच धडा शिकलेले नाही. हाडांमाशी मुरलेली सरंजामशाही या जन्मी तरी त्यांच्यातून जाईल, असे दिसत नाही. केरळच्या मतदारांनी मतंच अशी दिली आणि त्यामुळे त्यांना जागा अशा मिळाल्या, की भारतीय जनता पक्षाला 'जादूची कांडी' फिरवायला संधी मिळाली नाही. अन्यथा, काँग्रेसच्या या गोंधळ आणि घोळात केरळही त्यांच्या नाकाखालून अलगद काढून घेतले गेले असते.देशात केरळची प्रतिमा अगदी वेगळी आहे. १०० टक्के साक्षर, सर्वच बाबतीत पुढाकारलेले राज्य अशी केरळची गणना होते. डाव्या, साम्यवादी पक्षांच्या हातून हे राज्य काढून घेण्यासाठी काँग्रेसचे नेते सतीशन यांनी गेली पाच वर्षं अत्यंत आक्रमक भूमिका निभावली. केरळमध्ये वैचारिक जागृती भरपूर असल्याने साहजिकच राजकीय जागृतीही आहे. तिथे नुसता बोलभांड विरोध करून चालत नाही. प्रत्येक मुद्द्यावर वैचारिक वादविवाद होतात. सैद्धांतिक चर्चाची पार्श्वभूमी त्याला असते. सतीशन यांनी ती केली. तिरुअनंतपुरमचे खासदार शशी थरूर यांच्या विद्वत प्रतिमेची मदतही त्यांना त्यासाठी झाली. पण, थरुर यांचे त्यापुढे संघटनात्मक योगदान शून्य. अगदी ग्रामीण भागापर्यंत संघटना जिवंत ठेवण्याचे काम सतीश यांनीच केले. पण, तरीही जेव्हा मुख्यमंत्री पदासाठी नेता निवडायची वेळ आली, तेव्हा सतीश यांच्याबरोबरच पक्षाचे अखिल भारतीय सरचिटणीस खासदार के. सी. वेणुगोपाल आणि पक्षाच्या केंद्रीय कार्यकारिणीचे कायम निमंत्रित, आमदार रमेश चेन्नीथला यांचीही नांवे स्पर्धेत आली. नांवे फक्त स्पर्धेत आली, असे नाही, तर त्यांच्यातली लढाई रस्त्यावरही आली. प्रत्येकाच्या समर्थकांनी शक्तिप्रदर्शनाला सुरुवात केली. 'वेणुगोपालना इथे कोण विचारतो? राहुल गांधींच्या वेंगा उचलण्यापलीकडे त्यांचे योगदान काय?' अशी भाषाही सुरू झाली. गांधी बंधू-भगिनींचा कल वेणुगोपाल यांच्याकडे आहे, असे वाटल्याने त्या भावा-बहिणींचा हा मूर्खपणा सुरू आहे, इथपर्यंत माध्यमांतून प्रतिक्रिया उमटू लागल्या होत्या. चेन्नि‍थला आणि वेणुगोपाल हे दोघेही सतीशन यांच्यापेक्षा ज्येष्ठ असल्याने आणि दोघांचंही पक्ष संघटनेला दीर्घ योगदान असल्याने त्यांना डावलून निर्णय घ्यायचा, तर त्यासाठी त्यांच्यापेक्षा ज्येष्ठ नेत्यांची मते अजमावावी, संपूर्ण पक्ष संघटनेचा कल लक्षात घ्यावा, अशी भूमिका पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी घेतल्याने पक्षाच्या माजी प्रदेशाध्यक्षांपासून सर्वांशीच स्वतंत्र चर्चा केल्या गेल्या. वेणुगोपाल-चेन्नि‍थला यांना बरोबर घेऊनच राज्यकारभार करेन, असा शब्द सतीशन यांच्याकडून घेतला गेला, तेव्हांच सतीशन यांचे नांव अखेर काल जाहीर झाले, असे दिसते. तहान लागली, की विहीर शोधायला निघायचे, या मानसिकतेने काँग्रेसला एका छोट्या, सर्वार्थाने सुशिक्षित राज्याच्या मुख्यमंत्र्यांची निवड करायला एवढा वेळ लागला. पक्षात कुठल्याच पातळीवर नियमित संवाद नाही; त्यामुळे सहमती नाही, हे विदारक चित्रही यानिमित्ताने पुन्हा एकदा दिसून आले.'काँग्रेस पक्षांतर्गत लोकशाही मानते. त्यामुळे, सर्वांशी चर्चा करून, सर्वांच्या मतांचा आदर करूनच पक्षात निर्णय घेतला जातो. या प्रक्रियेला थोडा वेळ लागतोच आणि तशी केरळ विधानसभेची मुदत २३ मेपर्यंत आहे. त्यामुळे, निर्णयाची घाई करण्याचे काही कारण नव्हते', असा युक्तिवाद काल काँग्रेसकडून केला गेला. हा युक्तिवाद लंगडा आहे, हे कोणीही सांगेलच. कारण, तसे खरेच असते, तर राज्यभर जे फलक लागले, ज्या प्रतिक्रिया पक्षातून दिला गेल्या, मुख्यमंत्रीपदाच्या दावेदारांच्या समर्थकांनी जे दावे केले, ते जाहीरपणे केले गेले नसते. काँग्रेसने कितीही आव आणला, तरी वस्तुस्थिती पक्षाच्या नेत्यांना आणि त्यांच्या मित्रपक्षांना माहीत आहे. काँग्रेसच्या लंगड्या समर्थनाने ना त्यांचे समाधान होणार, ना जनतेचे. नेतृत्वाच्या या बेफिकिरीनेच 'इंडिया आघाडी' नामशेष झाली, हे काँग्रेसजनांना तरी विसरता येईल का?



# जागतिक संकटाची धग आणि आपण

**आजच्या या जागतिक आव्हानातूनही अपारंपरिक ऊर्जेचा वापर वाढवणे, स्थानिक उत्पादनांना बळ देणे आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा विस्तार करणे यांसारखे अनेक सकारात्मक बदल घडत आहेत. हे संकट आपल्याला अधिक स्वावलंबी, शिस्तप्रिय आणि भविष्यातील आव्हानांसाठी सज्ज बनवण्याची एक सुवर्णसंधी आहे. या संपूर्ण प्रवासात गरज आहे ती फक्त आपण प्रत्येक स्तरावर सजग राहण्याची, जागतिक घडामोडींवर बारीक लक्ष ठेवण्याची आणि बदलत्या काळानुसार स्वतःमध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्याची. हाच सजगपणा आपल्याला या जागतिक वादळातून सुखरूप बाहेर काढून एका उज्ज्वल भविष्याकडे घेऊन जाईल.**

आजचे जग एका अत्यंत गुंतागुंतीच्या आणि मोठ्या ऐतिहासिक संक्रमणातून जात आहे. गेल्या काही वर्षांत जागतिक पातळीवर झालेल्या राजकीय आणि आर्थिक घडामोडींनी संपूर्ण मानवजातीला एका अनपेक्षित वळणावर आणून ठेवले आहे. रशिया आणि युक्रेन यांच्यातील दीर्घकाळ चाललेल्या संघर्षामुळे निर्माण झालेले जागतिक पडसाद अद्याप शांत झाले नव्हते, तोच मध्यपूर्वेतील इस्रायल आणि इराण यांच्यातील वाढत्या तणावाने त्यात आणखी तेल ओतण्याचे काम केले आहे. या दोन प्रमुख युद्धजन्य परिस्थितींमुळे संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्थेवर मंदीचे आणि अनिश्चिततेचे काळे सावट पसरले आहे.या जागतिक घडामोडींचा सर्वात मोठा फटका आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील कच्च्या तेलाच्या किमतींना बसला आहे. मध्यपूर्व हा जगातील तेल पुरवठ्याचा मुख्य स्रोत असल्याने, तिथल्या तणावामुळे इंधनाचे दर गगनाला भिडले आहेत. इंधनाचे दर वाढले की वाहतूक खर्च वाढतो आणि त्याचा थेट परिणाम रोजच्या वापरातील भाजीपाला, अन्नधान्य, दुग्धजन्य पदार्थ आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किमतींवर होतो. त्यामुळे एका बाजूला उत्पन्नाची साधने मर्यादित असताना, दुसऱ्या बाजूला जीवघेण्या महागाईला सामोरे जावे लागत आहे.

या संकटाचे दुसरे मोठे कारण म्हणजे विस्कळीत झालेली जागतिक पुरवठा साखळी (Supply Chain). युद्धांमुळे समुद्री व्यापारी मार्ग विस्कळीत झाले आहेत, मालवाहतुकीची जहाजे सुरक्षित मार्गांचा शोध घेण्यासाठी लांबचा पल्ला गाठत आहेत, ज्यामुळे आयात-निर्यात अत्यंत महागडी आणि वेळखाऊ झाली आहे. कारखान्यांना लागणारा कच्चा माल वेळेवर मिळत नसल्याने उत्पादनांचा तुटवडा निर्माण होत आहे.या दुहेरी चक्रव्यूहात सामान्य माणूस मात्र पुरता होरपळून निघाला आहे. महिन्याचे बजेट कोलमडल्यामुळे मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांना आपल्या दैनंदिन गरजांमध्ये कपात करावी लागत आहे.महागाईच्या या प्रचंड लाटेने आणि आर्थिक अनिश्चिततेने सामान्य माणसाचे कंबरडे पुरते मोडून काढले असून, हे संकट कधी संपणार आणि पुन्हा स्थैर्य कधी येणार, या चिंतेत आजचा नागरिक जगताना दिसत आहे.

जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या राजकीय आणि युद्धजन्य परिस्थितीमुळे सध्या संपूर्ण जगाला एका भीषण ऊर्जा आणि अन्नधान्य संकटाचा सामना करावा लागत आहे. या संकटाचे स्वरूप केवळ तात्पुरते नसून ते अत्यंत खोलवर रुजलेले आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाचे (Crude Oil) दर सातत्याने वाढत असून त्यांनी प्रति बॅरल ११५ डॉलर्सचा टप्पा पार केला आहे. तेल उत्पादक देशांमधील अशांतता आणि युद्धाच्या भडक्यामुळे खनिज तेलाचे उत्पादन आणि वितरण या दोन्ही आघाड्यांवर मोठे अडथळे निर्माण झाले आहेत.

यात सर्वात मोठी चिंताजनक बाब म्हणजे होर्मुझ सामुद्रधुनी (Strait of Hormuz) परिसरातील वाढता लष्करी तणाव होय. हा सागरी मार्ग जागतिक ऊर्जा सुरक्षेचा मुख्य कणा मानला जातो. जगाच्या एकूण तेल पुरवठ्यापैकी सुमारे २५ ते ३० टक्के तेलाची वाहतूक याच अरुंद सागरी मार्गावरून होते. या मार्गावर निर्माण झालेल्या संकटामुळे जहाजांची वाहतूक थांबली आहे किंवा विलंबाने होत आहे, ज्यामुळे जागतिक बाजारात तेलाचा तुटवडा निर्माण होण्याची भीती सातत्याने सतावत आहे.ऊर्जेचे हे संकट केवळ पेट्रोल डिझेलपुरते मर्यादित राहत नाही, तर ते थेट अन्नधान्य संकटाशी जोडले गेले आहे. जेव्हा कच्च्या तेलाचे दर वाढतात, तेव्हा वाहतूक व्यवस्था प्रचंड महाग होते. शेतातून अन्नधान्य आणि भाजीपाला शहरांमधील बाजारपेठांपर्यंत आणण्याचा खर्च कमालीचा वाढतो. याशिवाय, आधुनिक शेतीमध्ये वापरली जाणारी रासायनिक खते, कीटकनाशके आणि ट्रॅक्टरसारख्या यंत्रांसाठी लागणारे इंधन महाग झाल्यामुळे थेट शेतीचा उत्पादन खर्च वाढतो.परिणामी, किरकोळ बाजारपेठेत पोहोचताना सर्वसामान्यांच्या ताटातील भाजीपाल्यापासून ते डाळी, तांदूळ आणि गव्हासारख्या जीवनावश्यक वस्तूंपर्यंत प्रत्येक गोष्टीचे भाव गगनाला भिडतात. एका बाजूला इंधनाची टंचाई आणि दुसऱ्या बाजूला अन्नाची महागाई अशा दुहेरी कात्रीत जागतिक अर्थव्यवस्था अडकली असून, हे संकट जगातील गरिबी आणि भूकबळीची समस्या अधिक तीव्र करत आहे.

या अभूतपूर्व जागतिक आर्थिक वादळात भारताची स्थिती अत्यंत संवेदनशील व आव्हानात्मक असली, तरी ती अनेक नव्या संधींची कवाडे उघडणारीही ठरत आहे.कोणत्याही एका विशिष्ट देशावर किंवा गटावर अवलंबून न राहता, भारताने आपल्या राष्ट्रीय हिताला प्राधान्य दिले आहे. रशियाकडून सवलतीच्या दरात मिळालेले तेल असो, अमेरिकेशी मजबूत केलेले व्यापारी संबंध असोत, किंवा आखाती देशांसोबतचे पारंपरिक मैत्रीपूर्ण संबंध असोत; भारताने सर्वच आघाड्यांवरून तेल आयात करून देशांतर्गत बाजारपेठेत समतोल राखण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. भारताच्या या मुत्सद्देगिरीमुळेच जागतिक बाजारात तेलाचे भाव कडाडलेले असतानाही, देशातील परिस्थिती बऱ्याच अंशी नियंत्रणात राहिली आहे.परंतु, या आंतरराष्ट्रीय यशानंतरही भारतासमोरील आव्हाने कमी झालेली नाहीत. आजचे जग हे एकमेकांशी जोडलेले असल्यामुळे जागतिक मंदीची (Recession) लाट जर अधिक तीव्र झाली, तर त्याचे थेट पडसाद भारतीय अर्थव्यवस्थेवर उमटणे अटळ आहे.जगभरात येत्या काळात रोजगाराची मोठी टंचाई निर्माण होऊ शकते, ज्याचा अप्रत्यक्ष ताण भारतातील तरुण मनुष्यबळावर पडू शकतो.असे असले तरी, प्रत्येक संकट आपल्यासोबत एक नवी संधी घेऊन येते, हा नियम येथेही लागू होतो.

चीनमधील राजकीय अनिश्चितता आणि इतर देशांमधील आर्थिक संकटामुळे जगातील मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्या आता 'चीन प्लस वन' (China Plus One) हे धोरण स्वीकारत आहेत. म्हणजेच, उत्पादनासाठी केवळ चीनवर अवलंबून न राहता त्या कंपन्या भारताकडे एक सुरक्षित आणि सक्षम पर्याय म्हणून पाहत आहेत. भारताची अफाट अंतर्गत बाजारपेठ, डिजिटल पायाभूत सुविधांचा झालेला वेगवान विस्तार आणि उत्पादन क्षेत्राला (Manufacturing) प्रोत्साहन देणाऱ्या सरकारी योजना यांमुळे जागतिक कंपन्यांसाठी भारत ही गुंतवणुकीची पहिली पसंती बनत आहे. त्यामुळे, जर भारताने या जागतिक मंदीच्या काळात आपल्या देशांतर्गत बाजारपेठेला बळकट केले, पायाभूत सुविधांचा विकास वेगाने सुरू ठेवला आणि तरुणांच्या कौशल्य विकासावर भर दिला, तर आव्हानांचे हे डोंगर पार करून भारत जागतिक अर्थव्यवस्थेचे एक प्रमुख केंद्र म्हणून उदयाला येऊ शकतो.

जागतिक अर्थव्यवस्थेसमोर सध्या निर्माण झालेल्या संकटांमध्ये सर्वात मोठा आणि चिंताजनक धोका म्हणून 'स्टॅगफ्लेशन' (Stagflation) या स्थितीकडे पाहिले जात आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील आघाडीचे अर्थतज्ज्ञ आणि वित्तीय संस्था सध्या या शब्दाचा वारंवार वापर करून जगाला सावध करत आहेत. स्टॅगफ्लेशन ही कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत क्लिष्ट आणि घातक अशी स्थिती मानली जाते, कारण ती सामान्य आर्थिक नियमांच्या विपरीत काम करते. सर्वसाधारणपणे, जेव्हा बाजारपेठेत मंदी असते किंवा आर्थिक विकास मंदावतो, तेव्हा वस्तूंची मागणी कमी झाल्यामुळे महागाई देखील कमी होते. परंतु, स्टॅगफ्लेशनमध्ये नेमकी याच्या उलट आणि विचित्र परिस्थिती निर्माण होते.

या स्थितीचा साधा आणि सोपा अर्थ असा की, एका बाजूला बाजारातील महागाई (Inflation) सातत्याने वाढत राहते आणि सर्वसामान्य नागरिकांच्या खिशाला कात्री लागते, तर दुसऱ्या बाजूला देशाच्या आर्थिक विकासाचा दर (Economic Growth) कमालीचा मंदावतो. आर्थिक विकास खुंटल्यामुळे बाजारात नवीन नोकऱ्या निर्माण होत नाहीत, उद्योगधंदे अडचणीत येतात आणि बेरोजगारी वाढू लागते. म्हणजेच, एकाच वेळी प्रचंड महागाई, आर्थिक मंदी आणि बेरोजगारी या तीन मोठ्या संकटांचा सामना देशाला करावा लागतो. ही अशी कोंडी असते, जिथून बाहेर पडण्याचा मार्ग शोधणे केंद्रीय बँकांसाठी अत्यंत आव्हानात्मक बनते.अशा बिकट परिस्थितीत महागाईवर नियंत्रण मिळवण्यासाठी रिझर्व्ह बँकेसारख्या केंद्रीय बँकांना आपल्या धोरणात्मक व्याजदरांमध्ये (Repo Rate) सातत्याने वाढ करावी लागते. बँकांनी व्याजदर वाढवले की त्याचा थेट परिणाम सर्वसामान्य नागरिक आणि व्यावसायिक बँकांवर होतो. यामुळे गृहकर्ज (Home Loan), वाहन कर्ज (Car Loan) किंवा वैयक्तिक कर्ज घेणे प्रचंड महाग होते. आधीच महागाईमुळे त्रस्त असलेल्या सर्वसामान्यांच्या डोक्यावर कर्जाच्या मासिक हप्त्यांचा (EMI) मोठा बोजा पडतो.

दुसरीकडे, उद्योगधंद्यांसाठी आणि नवीन व्यवसायांसाठी लागणारे व्यावसायिक कर्ज (Business Loan) महाग झाल्यामुळे उद्योजक नवीन गुंतवणूक करणे टाळतात. कंपन्या आपला विस्तार थांबवतात, ज्यामुळे नवीन रोजगार निर्मिती पूर्णपणे ठप्प होते आणि आहे त्या नोकऱ्यांवरही टांगती तलवार राहते. म्हणूनच, सध्याच्या जागतिक परिस्थितीत या धोक्यापासून स्वतःला वाचवणे हे जगातील प्रत्येक देशासमोरील सर्वात मोठे आर्थिक आव्हान बनले आहे.

जागतिक पातळीवर निर्माण झालेल्या या महाभयंकर आर्थिक आणि ऊर्जा संकटावर थेट नियंत्रण मिळवणे किंवा आंतरराष्ट्रीय घडामोडी बदलणे आपल्या हातात नसले, तरी एक सुजाण नागरिक म्हणून वैयक्तिक स्तरावर आपण आपले नियोजन नक्कीच बदलू शकतो. आपल्या दैनंदिन सवयींमध्ये आणि आर्थिक व्यवहारांमध्ये छोटे पण महत्त्वपूर्ण बदल करून आपण या जागतिक संकटाची धग बऱ्याच अंशी कमी करू शकतो, तसेच स्वतःचे आणि आपल्या कुटुंबाचे भविष्य सुरक्षित करू शकतो.

यासाठी सर्वात पहिली आणि महत्त्वाची पायरी म्हणजे कौटुंबिक बचतीवर कमालीचा भर देणे होय. सध्याच्या अनिश्चित वातावरणात पैशांची उधळपट्टी करणे किंवा निव्वळ हौसेपोटी केले जाणारे अनावश्यक खर्च पूर्णपणे टाळणे गरजेचे आहे. आर्थिक बचतीसोबतच ऊर्जेचा हुशारीने वापर करणे ही देखील काळाची गरज आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात इंधनाचे दर वाढत असताना, आपण आपल्या वाहनांचा मर्यादित आणि सुयोग्य वापर करायला हवा. वैयक्तिक वाहनांऐवजी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा (Public Transport) किंवा 'कार पूलिंग'चा वापर वाढवून आपण इंधनाची आणि पैशांची मोठी बचत करू शकतो. याशिवाय, पारंपरिक विजेचा वापर कमी करून घरांमध्ये किंवा व्यवसायांमध्ये शक्य असेल तिथे सौर ऊर्जेसारख्या (Solar Energy) अपारंपरिक आणि शाश्वत पर्यायांचा स्वीकार करण्यावर भर दिला पाहिजे.

शेवटचा आणि अत्यंत दूरगामी परिणाम करणारा बदल म्हणजे स्वतःचा कौशल्य विकास (Skill Development) करणे. जागतिक नोकरी बाजारात मंदीमुळे जी अनिश्चितता निर्माण झाली आहे, त्यात टिकून राहण्यासाठी केवळ पारंपरिक पदव्यांवर अवलंबून चालणार नाही. बदलत्या काळानुसार आणि उद्योगांच्या गरजेनुसार नवीन तंत्रज्ञान, डिजिटल कौशल्ये आणि व्यावसायिक ज्ञान आत्मसात करणे अनिवार्य झाले आहे. आपण जितके अधिक कुशल आणि बहुआयामी बनू, तितकी जागतिक बाजारातील आपली मागणी टिकून राहील आणि रोजगाराच्या नव्या संधी आपल्यासाठी खुल्या होत राहतील. या सर्व उपायांचा अवलंब करून आपण या संकटाचा सामना अधिक सक्षमपणे करू शकतो.

जागतिक संकटे ही मानवी इतिहासासाठी काही नवीन नाहीत; यापूर्वीही जगाने अनेक महायुद्धे, साथीचे रोग आणि भीषण आर्थिक मंदीचा सामना केला आहे व त्यातून मानवाने यशस्वीपणे मार्गही काढला आहे. मात्र, पूर्वीच्या संकटांच्या तुलनेत सध्याच्या संकटाचे स्वरूप अत्यंत गुंतागुंतीचे आणि एकमेकांवर अवलंबून असणारे आहे. आजचे जग हे तंत्रज्ञान, व्यापार आणि दळणवळणाच्या माध्यमातून इतके जवळ आले आहे की, जगाच्या एका कोपऱ्यात झालेली छोटीशी ठिणगी दुसऱ्या कोपऱ्यातील देशाच्या अर्थव्यवस्थेला क्षणात हादरवून सोडू शकते. डिजिटल युगातील वेगवान माहितीच्या प्रवाहामुळे आर्थिक संकटासोबतच भीती आणि अनिश्चिततेचे वातावरण अधिक वेगाने पसरते. अशा काळात सोशल मीडिया किंवा इतर माध्यमांवरून येणाऱ्या अफवांवर डोळे झाकून विश्वास न ठेवता, परिस्थितीचे वास्तव समजून घेणे गरजेचे आहे. आर्थिक अस्थिरतेच्या या काळात घाबरून न जाता, अत्यंत संयमाने आणि अचूक कौटुंबिक नियोजनाने आपण या परिस्थितीचा सामना करू शकतो.

**- प्रा. पी. आर. एस. राव**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर तक्षशिला महाविद्यालय,
उत्तम नगर, अमरावती.
मोबाईल नंबर: ९८२३४९६९१४

# भाजपच्या विजयात काँग्रेसचा फायदा

पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांच्या निकालांनी भारतीय राजकारणाची दिशा आणि स्वरूप दोन्ही बदलण्यास सुरुवात केली आहे. वरवर पाहता हे निकाल भाजपच्या मोठ्या राजकीय विजयाचे प्रतीक वाटतात. पश्चिम बंगालमध्ये प्रथमच सत्तेपर्यंत पोहोचणे, आसाममध्ये सलग तिसऱ्यांदा सरकार स्थापन करणे, पुद्दुचेरीमध्ये सहयोगी पक्षांसह पुन्हा सत्तेत भागीदारी मिळवणे आणि केरळसारख्या राज्यातही हळूहळू राजकीय पायाभरणी मजबूत करणे या सर्व गोष्टी भाजपच्या विस्तारवादी राजकारणाचे मोठे यश मानल्या जात आहेत. मात्र, राजकीय विश्लेषणाच्या दृष्टीने पाहिले, तर या निवडणुकांमधून सर्वाधिक दीर्घकालीन फायदा काँग्रेसला होण्याची शक्यता दिसून येते.

मंडल आयोगानंतर अनेक राज्यांमध्ये प्रादेशिक पक्ष उभे राहिले, ज्यांनी काँग्रेसचा पारंपरिक राजकीय मतदार हिरावून घेतला. यामुळे राज्याच्या राजकारणात काँग्रेसची जागा प्रादेशिक पक्षांनी घेतली आणि काँग्रेस राष्ट्रीय पक्ष म्हणून टिकून राहिला; पण राज्यांतील प्रभाव गमावत गेला. याच राजकीय पोकळीचा फायदा भाजपने घेतला. भाजपने केवळ काँग्रेसविरोधातच लढाई केली नाही, तर त्या प्रादेशिक पक्षांनाही आव्हान दिले, जे एकेकाळी काँग्रेसच्या पतनाचे प्रतीक मानले जात होते. संघटनशक्ती, आर्थिक साधने, आक्रमक प्रचारयंत्रणा आणि नरेंद्र मोदी-अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली भाजपने अशा राज्यांतही प्रवेश केला, जिथे पूर्वी त्यांची उपस्थिती केवळ प्रतीकात्मक स्वरूपाची होती. पश्चिम बंगालमध्ये कधी भाजपचे दोन-तीन आमदार असत, त्याच राज्यात आज पक्ष सत्तेपर्यंत पोहोचला. ही केवळ निवडणुकीतील विजयाची कथा नसून, दीर्घकालीन राजकीय विस्ताराची कहाणी आहे.

मात्र, याच टप्प्यावर काँग्रेससाठी नव्या राजकीय संधी निर्माण होताना दिसतात. भाजपने जे प्रादेशिक पक्ष कमकुवत केले, ते अनेक वर्षे काँग्रेसच्या पारंपरिक सामाजिक आणि राजकीय आधारावर उभे होते. आता जेव्हा हे पक्ष सत्तेबाहेर जात आहेत, तेव्हा त्यांच्या पारंपरिक मतदारांसमोर आणि कार्यकर्त्यांसमोर राजकीय भविष्याचा प्रश्न उभा राहत आहे. काँग्रेसची सर्वात मोठी अडचण अशी होती की, राष्ट्रीय स्तरावर भाजपविरोधात लढताना राज्यांमध्ये ती प्रादेशिक पक्षांनी वेढलेली होती. भाजपविरोधी राजकारणाचा केंद्रबिंदू ममता बॅनर्जी, अखिलेश यादव, अरविंद केजरीवाल, एम. के. स्टालिन आणि तेजस्वी यादव यांसारख्या प्रादेशिक नेत्यांभोवती फिरत होता. त्यामुळे काँग्रेस हळूहळू विरोधकांची प्रमुख शक्ती न राहता सहयोगी पक्षाच्या भूमिकेत जात होती.

पश्चिम बंगालच्या निकालानंतर हा बदल स्पष्ट दिसतोय. ममता अनेक वर्षांपासून काँग्रेसच्या समांतर राष्ट्रीय विरोधी नेतृत्व उभे करण्याचा प्रयत्न करत होत्या. अनेकदा त्यांनी काँग्रेसला बाजूला ठेवून विरोधी एकतेची स्वतंत्र रेषा आखण्याचाही प्रयत्न केला; परंतु सत्तेबाहेर गेल्यानंतर त्यांची राजकीय ताकद कमी झाली आहे. त्यामुळे ममता आता इंडिया आघाडी मजबूत करण्याची भाषा करताना दिसत आहेत. काँग्रेसच्या अंतर्गत वर्तुळात या बदलामुळे एक प्रकारचे समाधान दिसत आहे. पक्षातील रणनीतिकारांना वाटते की, भाजपविरोधातील खरी राष्ट्रीय लढाई अखेरीस भाजप आणि काँग्रेस यांच्यामध्येच सीमित होऊ शकते. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पश्चिम बंगालमध्ये भविष्यातील लढाई भाजप आणि काँग्रेसमध्ये होईल, असे म्हटले होते. दुसरीकडे राहुल गांधीही अनेकदा सार्वजनिकपणे सांगत आले आहेत की, भाजपला खरे आव्हान फक्त काँग्रेसच देऊ शकते.

या दोन्ही विधानांकडे एकत्रितपणे पाहिले, तर भारतीय राजकारणात हळूहळू द्विध्रुवीय व्यवस्था आकार घेत असल्याचे



स्पष्ट दिसते. भाजपसाठीही ही परिस्थिती पूर्णपणे सोपी नाही. भाजपने प्रादेशिक पक्षांना कमकुवत करून राष्ट्रीय राजकारणाला थेट द्विपक्षीय स्पर्धेकडे ढकलले आहे. जर काँग्रेसने संघटनात्मक कमजोरी दूर केली आणि नेतृत्वाबाबत स्पष्टता निर्माण केली, तर भविष्यात भाजपसमोर अधिक कठीण आव्हान उभे राहू शकते. सध्या भाजपचा सर्वात मोठा फायदा म्हणजे विरोधकांची विखुरलेली अवस्था आहे; पण जर भारतीय राजकारण दोन प्रमुख ध्रुवांमध्ये विभागले गेले, तर भविष्यातील लढती अधिक थेट, अधिक तीव्र आणि अधिक निर्णायक असतील.

**उमेश कुमार**

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

# कुमार चिंता यांची नागपूरला पदोन्नती, नित्यानंद झा यांच्याकडे यवतमाळची धुरा!

## 'ऑपरेशन प्रस्थान'चे शिल्पकार यवतमाळमधून बदली नव्या एसपींकडून मोठ्या अपेक्षा

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : राज्य गृह विभागाने शुक्रवारी संध्याकाळी जाहीर केलेल्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यांमध्ये यवतमाळ जिल्ह्यासाठी महत्त्वाचा फेरबदल करण्यात आला आहे. यवतमाळचे विद्यमान पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांची पदोन्नती होऊन नागपूर शहर पोलीस दलात पोलीस उपआयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर नित्यानंद झा यांची यवतमाळ जिल्ह्याच्या नव्या पोलीस अधीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

कुमार चिंता यांनी आपल्या कार्यकाळात केवळ कायदा व सुव्यवस्था राखण्यापुरते काम मर्यादित ठेवले नाही, तर सामाजिक बांधिलकी जपत अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले. त्यांच्या नेतृत्वाखाली यवतमाळ पोलीस प्रशासनाने गुन्हेगारी नियंत्रणासोबत समाजाभिमुख कामांवरही विशेष भर दिला. विशेषतः "ऑपरेशन प्रस्थान" या मोहिमेमुळे कुमार चिंता यांना राज्यभरात वेगळी ओळख मिळाली. अमली पदार्थांच्या आहारी गेलेल्या किंवा गुन्हेगारीकडे वळणाऱ्या तरुणांना मुख्य प्रवाहात आणणे, समुपदेशनाद्वारे त्यांचे पुनर्वसन करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश होता. या उपक्रमाचे राज्यभर कौतुक झाले असून, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही





सार्वजनिक मंचावर या उपक्रमाची प्रशंसा केली होती. त्यांच्या कार्यकाळात अवैध धंद्यांवर कारवाया, अमली पदार्थविरोधी मोहिमा, संघटित गुन्हेगारीवर नियंत्रण, महिला सुरक्षा, सायबर गुन्हेगारीविरोधी जनजागृती आणि ग्रामीण भागात पोलीस संपर्क वाढवण्यावर विशेष लक्ष देण्यात आले. त्यामुळे पोलीस प्रशासनाची प्रतिमा अधिक संवेदनशील आणि जनतेशी जोडलेली बनली. दरम्यान, नव्याने नियुक्त झालेले नित्यानंद झा हे शिस्तप्रिय आणि अनुभवी अधिकारी म्हणून ओळखले जातात. त्यांनी नागपूर झोन-२ मध्ये पोलीस उपआयुक्त म्हणून महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. यवतमाळसारख्या संवेदनशील जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, ग्रामीण गुन्हेगारी, अवैध कारवाया आणि सामाजिक सलोखा टिकवणे ही मोठी आव्हाने त्यांच्यासमोर असणार आहेत. जिल्ह्यातील नागरिकांना अपेक्षा आहे की, पूर्वाधिकारी कुमार चिंता यांनी सुरू केलेली जनसंपर्काधारित आणि प्रभावी पोलीस प्रशासनाची परंपरा नित्यानंद झा पुढे अधिक सक्षमपणे नेतील.

# छत्तीसगढमधून प्रमोद शिंदे गजाआड?

## तेजस्विनी घोटाळ्याला नवे वळण, नागपूर मनी लॉन्ड्रिंगच्या तपासाचीही चर्चा

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - तेजस्विनी को-ऑपरेटिव्ह वुमन सोसायटी पतसंस्थेतील कथित कोट्यवधी रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणाला आता नवे आणि धक्कादायक वळण मिळाल्याची चर्चा सुरू झाली आहे. ठेवीदारांनी १४ मे रोजी पत्रकार परिषद घेत पतसंस्थेत १० कोटींहून अधिक आर्थिक घोटाळा झाल्याचा गंभीर आरोप केला होता. त्याच पार्श्वभूमीवर नागपूर क्राईम ब्रँचने संस्थेचे अध्यक्ष प्रमोद शिंदे यांना छत्तीसगड येथून ताब्यात घेतल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून समोर येत असल्याने शहरात चर्चांना उधाण आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रमोद शिंदे यांच्याविरोधात आर्थिक गैरव्यवहार, निधी हस्तांतरण तसेच मनी लॉन्ड्रिंगच्या अनुषंगानेही तपास नागपूर येथे सुरू असल्याची चर्चा आहे. या प्रकरणात राजस्थान,उदयपुर बेंगळुरू आणि इतर काही राज्यांशी संबंधित व्यवहारांची चौकशी होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. तसेच त्यांच्या खात्यातून सुमारे ३५ कोटी रुपयांचे संशयास्पद व्यवहार झाल्याची चर्चा रंगू लागली आहे. यामध्ये क्राईम ब्रँच आणि आयकर विभागाची संयुक्त कारवाई झाली का, याबाबतही विविध तर्कवितर्क सुरू झाले आहेत. दरम्यान, तेजस्विनी पतसंस्थेचे संचालक मंडळ अद्याप फरार असल्याचा आरोप ठेवीदारांकडून करण्यात येत असून, प्रशासनाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. ठेवीदारांच्या मते, संस्थेचे नियमित लेखापरीक्षण, वार्षिक सर्वसाधारण सभा आणि संचालक नियुक्ती प्रक्रियेत गंभीर अनियमितता झाल्या आहेत. या प्रकरणात सहकारी विभागाच्याही भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. ६ एप्रिल रोजी संस्थेवर प्रशासक म्हणून ओंकार पहुरकर यांची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, प्रशासक नेमूनही तपासात अपेक्षित गती दिसून आली नसल्याचा आरोप होत आहे. सॉफ्टवेअर बंद, वायफाय सुविधा नसणे आणि व्यवहारांची माहिती उपलब्ध न होणे अशी कारणे पुढे केली जात असल्याने ठेवीदारांमध्ये संताप वाढत आहे. विशेष म्हणजे प्रमोद शिंदे यांच्या बेपत्ता असल्याची तक्रार यापूर्वी त्यांच्या भावाने अवधूतवाडी पोलीस ठाण्यात दाखल केली होती. मात्र आता अटकेच्या चर्चेमुळे मोठे बंधू बाळासाहेब शिंदे हे सुद्धा देवदर्शनाचा बहाना करीत सोलापूर कडे रवाना झाले असल्याची विश्वसनीय सूत्रांकडून माहिती मिळाली आहे.त्यामुळे या प्रकरणाला वेगळेच वळण मिळाले आहे. एक जूनपासून साखळी उपोषणाचा इशारा देणारे ठेवीदार आता पुढील तपासातून आणखी कोणते धक्कादायक खुलासे होतात याकडे लक्ष ठेवून आहेत. मात्र अटकेसंदर्भातील माहितीबाबत अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नाही.

# २० मे रोजीच्या देशव्यापी औषध विक्रेता बंदच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासन सज्ज

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - नागरिकांना औषध पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी उपाययोजना अखिल भारतीय औषधी विक्रेता संघटनेच्या वतीने बुधवार, दि. २० मे २०२६ रोजी देशव्यापी एक दिवसीय बंदची घोषणा करण्यात आली असून या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाने नागरिकांना औषधांचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना सुरू केल्या आहेत

प्रलंबित मागण्यांच्या निषेधार्थ देशातील ठोक व किरकोळ औषध विक्रेत्यांनी व्यवहार बंद ठेवण्याचे आवाहन केले आहे. मात्र, नागरिकांना आवश्यक औषधे वेळेत उपलब्ध व्हावीत यासाठी अन्न व औषध प्रशासन, सहाय्यक आयुक्त (औषधे) यवतमाळ डॉ. अ. मा. माणिकराव यांनी याबाबत माहिती दिली. सह आयुक्त (औषधे) तथा नियंत्रण प्राधिकारी, अन्न व औषध प्रशासन, यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील सर्व औषध विक्रेते, रुग्णालयांशी संलग्न औषध दुकाने तसेच २४ तास सुरू असणाऱ्या औषध दुकानांशी समन्वय साधण्यात येत असून. अत्यावश्यक औषधांचा पुरवठा खंडित होऊ नये यासाठी आवश्यक सूचना देण्यात आल्या असून औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवण्याचे निर्देशही संबंधितांना देण्यात आले आहेत. तसेच जिल्हाधिकारी, पोलीस प्रशासन, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, इंडियन मेडिकल असोसिएशन, खाजगी व निमसरकारी रुग्णालये यांच्याशी सातत्याने संपर्क ठेवून आवश्यक खबरदारी घेण्यात येत आहे. प्रत्येक तालुका व गाव पातळीवर आवश्यक औषध दुकाने सुरू राहतील यासाठी प्रशासन प्रयत्नशील असल्याचेही सांगण्यात आले. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन अन्न व औषध प्रशासन केले आहे. औषध पुरवठ्याबाबत कोणतीही अडचण उद्भवल्यास नागरिकांनी अन्न व औषध प्रशासन, यवतमाळ कार्यालयात स्थापन करण्यात आलेल्या नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी भ्रमणध्वनी क्रमांक ९८५०१५०६८७ वर संपर्क साधावा किंवा fda.ytl@gmail.com या ई-मेलवर माहिती द्यावी, असे आवाहन सहाय्यक आयुक्त (औषधे) यवतमाळ यांनी केले आहे.

# वेचक



## दीप खंडागळे चे 93% गुणांसह दैदिप्यमान यश : संघभूमी बुद्ध विहार समितीकडून सत्कार!

पुसद - येथील ज्योतिर्गमय इंग्लिश मीडियम स्कूलचा दीप प्रकाश खंडागळे यांनी एसएससी परीक्षेत 93% गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्याच्या या उज्ज्वल कामगिरी बद्दल संघभूमी बुद्ध विहार काकडदाती समितीच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन त्याचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. या सत्कार सोहळ्यात समितीचे अध्यक्ष विनोद इंगोले, उपाध्यक्ष बबन खंदारे, सचिव मनोज गवई, सहसचिव पांडुरंग मनवर, सदस्य विशाल पाटील, प्रकाश खंडागळे, मिलिंद कांबळे, संदेश रणवीर, धीरज कांबळे, ज्ञानेश्वर कोल्हे, संतोष कांबळे, प्रवीण भवरे, खंदारे काका यांच्या हस्ते दीप ला मानचिन्ह प्रदान करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी दीप याचे कौतुक करत त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्याच्या यशामुळे परिसरातील विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळणार असून, पालक व परिसरामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. संघभूमी बुद्ध विहार समितीच्या वतीने अशा गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना प्रोत्साहन देण्याचा उपक्रम पुढेही सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

## युवकाची ऑनलाईन फसवणूक, २४ हजार ८०० रुपये खात्यातून उडविले

उमरखेड - मोबाईलमधील यूपीआय कोडचा वापर करून अज्ञात इसमाने 24 हजार 800 रुपये आपल्या खात्यात वळवून फसवणूक केल्याची तक्रार दि 13 मे रोजी आशिष शशीकांत शेवाळकर रा. उमरखेड यांनी उमरखेड पोलीस स्टेशनला दिली आहे. याबाबत उमरखेड पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारीनुसार फिर्यादीच्या मोबाईल मधून यूपीआयचा कोडचा वापर करून अज्ञात इसमाने 24 हजार आठशे रुपये दुसऱ्या खात्यामध्ये वळविल्याचे आशिष शेवाळकर यांच्या लक्षात आले. आपल्या अकाउंट मधून रक्कम वजा झाली ही बाब लक्षात येताच बँकेशी संपर्क साधून वजा झालेल्या रकमेची शहानिशा केली असता अज्ञात इसमाने त्यांच्या यूपीआय कोडचा वापर करून रक्कम पळविल्याचे स्पष्ट दिसून येत असल्याने अज्ञात आरोपीने अकाउंट हॅक करून 24 हजार 800 रुपये पैसे उडविले असल्याने आपली आर्थिक फसवणूक झाल्याने अज्ञात आरोपीचा शोध घेऊन त्याचे विरुद्ध कठोर कार्यवाही करावी व मला न्याय मिळवून द्यावा अशी तक्रार आशिष शेवाळकर यांनी उमरखेड पोलीस स्टेशनला दिली त्यावरून पोलीसांनी पुढील तपास सुरु केला आहे.

# मुख्याधिकारी यांना प्रभाग क्रं.५ व६ मधील नागरिकांचे घरकुल अंतिम मागणीसाठी निवेदन

## अन्यथा कायदेशीर तथा न्यायालयात बाजू मांडू.!



**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - येथील नगर परिषद अंतर्गत प्रभाग क्रमांक ५ व ६ सुभाष वार्ड,गणेश वार्ड व भोईपुरा परिसरातील राहुल हिरामण पडघणे सह इतर ६० ते ७० महिला व नागरिकांनी नमुना (ड.)तयार करून तात्काळ घरकुल निधी मंजूर करण्यासंदर्भात नगराध्यक्षा व मुख्याधिकारी यांना आज १५ मे २०२६ रोजी निवेदन देऊन अंतिम मागणी केली आहे.

सदर निवेदनात म्हटले आहे की दहा वर्षापासुन प्रलंबीत घरकुल मंजुरी व निधी न मिळाल्या बाबत अंतीम मागणी अर्जदार राहुल हिरामण पडघणे व इतर नागरिक रा.सुभाष वार्ड यांनी मागील १० वर्षापासुन शासनाच्या घरकुल योजने अंतर्गत लाभासाठी अनेकवेळा ऑनलाईन व ऑफलाईन अर्ज सादर केलेले आहेत. या सर्व अर्जाच्या प्रती नगर परिषद पुसद यांनी नागरिकांकडून जमा करून घेतल्या आहेत. तसेच घराची मोजणी करून रक्कम रू.३५०/- भरल्यानंतर इतक्या रकमेची पावती सुध्दा देण्यात आलेली आहे. तसेच दिंनाक २७ मार्च २०२६ रोजी लेखी स्वरूपात अर्ज देवून घरकुलाची व निधीची मागणी केलेली असूनही त्याच बरोबर त्यामध्ये सविस्तर नमुद केले असतानाही ३ दिवसाचे आत घराचा नमुना (ड) व घरकुलाचा निधी अदयापही मिळालेला नाही. उलट नगर परिषद कडून वारंवार फाईल पुणे, मुंबई, यवतमाळ येथे आहे असे सांगुन विलंब केला जात आहे. परंतु प्रत्यक्षात कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही त्यामुळे आम्हाला जागेचा तात्काळ नमुना तयार करून घरकुल निधी मंजूर करण्यात यावा अशा विषयाचे आज शेकडो नागरिकांनी नगराध्यक्ष तथा मुख्याधिकारी नगरपरिषद यांना मागणी केली आहे.

### नागरिकांच्या खालील मागण्या

संपुर्ण नागरिकांना तात्काळ घरकुल मंजुरी दयावी. २. मंजुर निधी बँक खात्यात जमा करावा. ३. तात्काळ काम सुरू करण्यासाठी आदेश दयावेत. ४.सदर अर्जाची सद्यस्थिती लेखी स्वरूपात दयावी. ५. सर्वांना रमाबाई आवास योजनेचा लाभ मिळावा. अन्यथा सुभाष वार्ड ,गणेश वार्ड व भोईपुरा परिसरातील संपूर्ण महिला व नागरिक न्यायालयीन प्रक्रिया तथा कायदेशिर पावले उचणार असा निवेदनातून इशारा देण्यात आला आहे.

# "पांढरकवडा–केळापूर औद्योगिक क्लस्टर" मागणीची मुख्यमंत्री–उपमुख्यमंत्री कार्यालयाकडून दखल

## आदिवासी औद्योगिक विकासाच्या मागणीला मंत्रालयातून प्रतिसाद; संबंधित विभागाकडे चौकशीसाठी पत्र

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा : यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी बहुल पांढरकवडा-केळापूर परिसरासाठी ₹१०० कोटींचा "आदिवासी औद्योगिक क्लस्टर" उभारण्याच्या मागणीची अखेर राज्य शासनाने गंभीर दखल घेतली आहे. युवा टायगर फोर्सने सातत्याने उचलून धरलेल्या या प्रश्नानंतर मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री कार्यालयातून संबंधित विभागाला अधिकृतरीत्या पत्र पाठविण्यात आल्याने प्रशासनात खळबळ उडाली आहे.

युवा टायगर फोर्सचे संयोजक अंकित नैताम यांनी पांढरकवडा-केळापूर परिसरातील बेरोजगारी, युवकांचे वाढते स्थलांतर, उद्योगांचा अभाव आणि आदिवासी भागातील आर्थिक मागासलेपण यासंदर्भात राज्य शासनाकडे सविस्तर निवेदन व ई-मेलद्वारे पाठपुरावा केला होता. त्यानंतर मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय मुंबई येथून संबंधित मागणीची अधिकृत नोंद घेण्यात आली आहे. मुख्यमंत्री कार्यालयाकडून प्राप्त ई-मेलमध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, "आपला ई-मेल प्राप्त झाला असून, सदर ई-मेल योग्य त्या कार्यवाहीसाठी कौशल्य विकास व उद्योजकता विभागाकडे पाठविण्यात आला आहे. याबाबत पुढील चौकशी संबंधित विभागात करावी." विशेष म्हणजे, उपमुख्यमंत्री कार्यालयातूनही या मागणीची दखल घेत संबंधित विभागांकडे विषय पाठविण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे पांढरकवडा-केळापूर औद्योगिक क्लस्टरची मागणी आता थेट मंत्रालयीन स्तरावर पोहोचल्याचे स्पष्ट झाले आहे. युवा टायगर फोर्सने मांडलेल्या प्रस्तावानुसार, या क्लस्टरमुळे वनधन प्रक्रिया उद्योग, बांबू आधारित उद्योग, फूड प्रोसेसिंग, लघुउद्योग व ग्रामीण उद्योजकता क्षेत्राला मोठी चालना मिळू शकते. यामुळे स्थानिक स्तरावर शेकडो युवकांना रोजगार उपलब्ध होऊन आदिवासी भागातील स्थलांतर मोठ्या प्रमाणात कमी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, २२ मार्च २०२६ रोजी जंगोदाई पेनठाणा येथे आयोजित "आदिवासी उद्योग जत्रे"तूनही या भागात उद्योग उभारणीची मागणी जोरदारपणे समोर आली होती. स्थानिक आदिवासी समाज, युवक आणि विविध सामाजिक संघटनांनी "रोजगार हवा तर उद्योग हवेत" असा एकमुखी आवाज उठवला होता. यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री तसेच राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी स्वतः पुढाकार घेऊन पांढरकवडा-केळापूर परिसरासाठी विशेष औद्योगिक धोरण जाहीर करावे, अशी मागणी आता अधिक तीव्र झाली आहे. कारण हा संपूर्ण भाग आदिवासी बहुल असून, रोजगार व उद्योगांच्या बाबतीत अत्यंत मागासलेला मानला जातो. "शासनाने केवळ पत्रव्यवहार न करता प्रत्यक्ष निधी मंजूर करून उद्योग उभारणीची प्रक्रिया सुरू करावी. अन्यथा आदिवासी युवकांचे स्थलांतर, बेरोजगारी आणि आर्थिक संकट अधिक गंभीर होईल," असा इशारा युवा टायगर फोर्सचे संयोजक अंकित नैताम यांनी दिला आहे.

# १० वी १२ गुणवंतांचा नगर परिषदेत भव्य सत्कार

## "आजचे गुणवंत विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे उज्ज्वल भविष्य"

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - नगर परिषद, यवतमाळच्या वतीने दि. १४ मे २०२६ रोजी दहावी व बारावी परीक्षेत ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवून उज्ज्वल यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थिनींचा भव्य सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात आणि अभिमानाच्या वातावरणात पार पडला. नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शनी अशोक उईके यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



विद्यार्थ्यांनी आपल्या मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर मिळवलेल्या उल्लेखनीय यशाचा गौरव करत त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत आजचे गुणवंत विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे उज्ज्वल भविष्य आहेत. असे मत व्यक्त केले. सोहळ्यात विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि पालकांच्या डोळ्यांतील अभिमान पाहण्यासारखा होता. हा कार्यक्रम केवळ विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव नव्हता, तर त्यांच्या पालकांच्या त्यागाचा, शिक्षकांच्या मेहनतीचा आणि विद्यार्थ्यांच्या अथक परिश्रमांचाही सन्मान होता.या कार्यक्रमाला उपविभागीय अधिकारी (एसडीओ) गोपाल देशपांडे, नगर परिषद उपाध्यक्ष, मुख्याधिकारी (सीईओ), सभापती, गटनेते, नगरसेवक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी विद्यार्थ्यांना पुढील आयुष्यासाठी प्रेरणादायी मार्गदर्शनही केले. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करून शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्टतेला प्रोत्साहन देण्याची नगर परिषद यवतमाळची परंपरा यंदाही कायम राहिली. "शिक्षणातून घडते प्रगती, गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान हीच खरी प्रेरणा," हा संदेश या कार्यक्रमातून प्रभावीपणे देण्यात आला.

# प्राचीन ज्ञानवारसा आता डिजिटल स्वरूपात ; 'ज्ञानभारतम्' मोहिमेचा शुभारंभ !

## हस्तलिखितांची माहिती 'ज्ञानभारतम्' मोबाईल ॲपवर समाविष्ट करावी : जिल्हाधिकारी विकास मीना यांचे आवाहन

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : भारताचा समृद्ध आणि मौल्यवान हस्तलिखितांचा वारसा जतन करण्यासाठी केंद्र शासनाच्या संस्कृती मंत्रालयाच्या वतीने 'ज्ञानभारतम्' ही राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत देशभरातून एक कोटीहून अधिक हस्तलिखितांचा शोध व नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून या महत्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत देशव्यापी हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला १६ मार्च पासून सुरुवात झाली आहे. या मोहिमेत यवतमाळ जिल्ह्यातील नागरिकांनी सहभाग नोंदवून आपल्याकडील हस्तलिखितांची माहिती 'ज्ञानभारतम्' मोबाईल ॲपवर समाविष्ट करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी विकास मीना यांनी केले आहे.

भारताला हस्तलिखितांचा मोठा वारसा लाभलेला आहे. ही हस्तलिखिते विविध ठिकाणी विखुरलेल्या स्वरूपात आहेत. हे सर्व ज्ञानभंडार एकत्र करून एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या अंतर्गत हस्तलिखितांचे सर्वेक्षण, दस्तऐवजीकरण, संवर्धन, डिजिटायझेशन व प्रसार केला जाणार आहे. यात हस्तलिखितांचा 'राष्ट्रीय डिजिटल संग्रह' तयार करण्यात येणार असून तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध करुन दिला जाणार आहे. या प्रक्रियेत हस्तलिखितांची मालकी ही मूळ संस्था, ग्रंथालय किंवा खासगी संग्राहक यांच्याकडेच राहणार आहे. मात्र, स्वखुशीने ही हस्तलिखिते शासनाकडे सुपूर्द करायची असल्यास शासन स्विकारणार आहे. या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यातील विविध सांस्कृतिक संस्था, विद्यापीठे, संशोधन संस्था, हस्तलिखित संग्रहालये तसेच विद्वान आदींच्या सहकार्याने ही मोहीम राबवली जाणार आहे. प्रकल्पासाठी राज्याची नोडल संस्था म्हणून पुराभिलेख संचालनालयाची नियुक्ती करण्यात आली असून कवि कालिदास संस्कृत विद्यापीठ नागपूरला क्लस्टर केंद्र म्हणून कार्यरत राहणार आहे. तसेच नोडल अधिकारी म्हणून संचालक पुराभिलेख संचालनालय, उपसंचालक मराठी भाषा हे कार्य पार पाडणार आहे.

# ३० मेपर्यंत पेट्रोल पंप हटवा; अन्यथा १ जूनला शिवप्रेमींचा जनआक्रोश !

## प्रशासन व लोकप्रतिनिधींवर गंभीर आरोप

**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड - छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या सौंदर्यकरणाला अडथळा ठरत असलेला भारत पेट्रोल पंप ३० मे पूर्वी हटवावा, अन्यथा १ जून रोजी हजारोंच्या संख्येने शिवभक्त रस्त्यावर उतरून जनआक्रोश आंदोलन करतील, असा इशारा जिजाऊ ब्रिगेडच्या सरोज ताई देशमुख यांच्यासह छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा कृती समिती व विविध सामाजिक संघटनांच्या वतीने येथील शासकीय विश्रामगृहात शुक्रवारी (दि.१५) आयोजित पत्रकार परिषदेत हा इशारा देण्यात आला.

गेल्या दहा वर्षांपासून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या प्रश्नावर केवळ राजकारण सुरू असून प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. आंदोलन, उपोषण, मोर्चे, निवेदने आणि तुरुंगवास भोगूनही प्रशासनाने पेट्रोल पंप हटविण्याबाबत कोणतीही ठोस भूमिका घेतली नाही. उलट जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित पेट्रोल पंपाला आणखी पाच वर्षांची लीज वाढवून दिल्याने शिवप्रेमींमध्ये संतापाची लाट निर्माण झाली आहे. यावेळी आयोजीत पत्रकार परिषदेला सरोजताई देशमुख, चक्रधर देवसरकर, स्वप्निल कनवाळे, गुलाब सूर्यवंशी, भैय्या पवार, यशोदा सोनटक्के, विद्वान केवटे, प्रवीण गादेकर, गोपाल झाडे, विजय चौधरी, शुभम माने, बसवेश्वर शिरसागर, प्रवीण देशपांडे, दिनेश रावते, चांदराव सुरोशे, अरुण ठाकरे, निखिल थोरात आदी उपस्थित होते. सरोजताई देशमुख यांनी प्रशासन व लोकप्रतिनिधींवर जोरदार टीका करताना म्हटले की, "मोठमोठी आंदोलने, उपोषणे, मोर्चे होऊनही जिल्हाधिकाऱ्यांनी पेट्रोल पंपाची लीज वाढविलीच कशी? हा पेट्रोल पंप मालक सर्व राजकीय नेते आणि प्रशासनापेक्षा मोठा आहे का?" त्यांनी



आमदार, खासदार आणि पालकमंत्र्यांवरही निष्क्रियतेचा आरोप करत "सर्वपक्षीय मोर्चा हा केवळ दिखावा होता का?" असा सवाल उपस्थित केला. त्या पुढे म्हणाल्या, "महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासाठी दहा वर्षांपासून संघर्ष करावा लागणे ही महाराष्ट्रासाठी शोकांतिका आहे. प्रशासकीय अधिकारी कुठेतरी विकले गेले आहेत का, अशी शंका जनतेच्या मनात निर्माण होत आहे." ुतळा कृती समितीचे अध्यक्ष भैय्या पवार यांनीही संतप्त भूमिका मांडत, "महाराष्ट्रात कदाचित कुठेही महाराजांच्या पुतळ्यासाठी एवढे आंदोलन झाले नसेल, तेवढे आंदोलन उमरखेडमध्ये झाले आहे. तरीही प्रशासन हलत नाही. पेट्रोल पंपाची लीज वाढविताना आर्थिक व्यवहार झाला आहे का, याची चौकशी व्हावी," अशी मागणी केली. त्यांनी नगर परिषद सत्ताधाऱ्यांवरही निशाणा साधत म्हटले की, "महाराजांच्या नावावर सत्ता स्थापन करणारे आज आंदोलनात दिसत नाहीत. शिवप्रेमींना वापरून त्यांनी केवळ राजकारण केले." विद्वान केवटे यांनी यावेळी बोलताना प्रशासनावर कठोर शब्दांत टीका केली. "छत्रपती शिवाजी महाराजांच्या अभिषेकाला विरोध करणारे जसे होते, तसेच लोक आज महाराजांच्या पुतळ्यालाच अडथळा निर्माण करत आहेत का?" असा सवाल त्यांनी केला. तसेच "महापुरुषांचा अवमान करणाऱ्या संबंधित प्रशासकीय आणि राजकीय व्यक्तींवर भारतीय दंड संहितेतील कलम १५३-अ व २९५ अंतर्गत गुन्हे दाखल करावेत," अशी मागणीही त्यांनी केली. केवटे पुढे म्हणाले, "हा अवमान केवळ महाराजांचा नाही, तर १८ पगड जातींचा आणि बहुजन समाजाच्या स्वाभिमानाचा आहे." पत्रकार परिषदेत प्रशासनावर सत्ताधाऱ्यांचा दबाव आहे की प्रशासनच मुजोर झाले आहे, असा सवाल उपस्थित करण्यात आला.

# गुरुकुल कॉन्व्हेंट अँड ज्यु. कॉलेज,श्रीरामपूर चा घवघवीत यश ;गुणवंत विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - स्व.शंकरराव चापके बहुउद्देशीय संस्थेच्या अंतर्गत संचालित गुरुकुल कॉन्व्हेंट अँड ज्यु. कॉलेज (सायन्स अँड आर्ट्स), पुसद येथील विद्यार्थ्यांनी एसएससी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून शाळेच्या यशाची परंपरा कायम राखली आहे. संस्था चालवत असताना आलेले बिकट प्रसंग, विद्यार्थ्यांच्या पालकांनी संस्थेवर दाखवलेला विश्वास व विद्यार्थ्यांनी केलेली मेहनत शाळेने सार्थ ठरवत आपली उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली.

विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट निकालामुळे संस्थेचे, शिक्षकांचे व पालकांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

यामध्ये श्रावणी बी. शिंगणे हिने ९१.८० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. तर गार्गी व्ही. मास्के हिने ८९.२० टक्के, प्राप्ती आर. राठोड व यश के. राठोड याने ८८.८० टक्के, प्रगती बी. जाधव हिने ८८ टक्के गुण प्राप्त केले. तसेच साहील आर. धेंगले याने ८६.४० टक्के, कृष्णा व्ही. वानखेडे याने ८५.२० टक्के, निर्मिती आर. राठोड हिने ८२.४० टक्के , नैतिक पी. राठोड याने ८०.६० टक्के व उर्वरित सर्व विद्यार्थ्यांनी घवघवीत गुण मिळवत यश संपादन केले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, शिक्षकवृंद यांनी अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यास शुभेच्छा दिल्या. "Dream Big... Study Hard... Shine Bright" हा संदेश विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारा ठरत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# महिला लोकशाही दिन 18 मे रोजी

यवतमाळ - महिलांच्या तक्रार निवारणासाठी जिल्हा महिला लोकशाही दिन दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी आयोजित केला जातो. या महिन्याचा महिला लोकशाही दिन सोमवार दि.18 मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील बचत भवन येथे आयोजित करण्यात आला आहे. तालुकास्तरावर प्रत्येक महिन्याच्या चौथ्या सोमवारी तालुकास्तरीय महिला लोकशाही दिन आयोजित केला जातो. महिलांनी प्रथम या लोकशाही दिनात तक्रार दाखल करावी. सदर तक्रारीवर योग्य कारवाई झाली नसल्यास जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनात तालुकास्तरीय लोकशाही दिनात केलेले अर्ज व टोकन क्रमांकासह तक्रार सादर करावे. न्यायप्रविष्ठ प्रकरणे, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती न जोडलेले अर्ज, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी आणि वैयक्तिक तक्रार किंवा निवेदने स्विकारले जाणार नाहीत, याची महिलांनी नोंद घेण्याचे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी केले आहे.

# जिल्ह्यासह ग्रामीण भागातही एमडी ड्रग्जचे जाळे

## मोर्शीत ४.८० लाखांचा मुद्देमाल जप्त

**मोर्शी/वार्ताहर**

अमरावती पाठोपाठ आता जिल्ह्याच्या ग्रामीण भागातही एमडी ड्रग्जचे जाळे पसरल्याचे स्पष्ट झाले आहे. मोर्शी पोलिसांनी चांदूरबाजार रोडवर असलेल्या स्मशानभूमीसमोर रेल्वे गेटजवळ केलेल्या कारवाईतून या घटनेला दुजोरा मिळाला आहे. पोलिसांनी त्याठिकाणी अवैधरित्या एम.डी (मेफेड्रोन) बाळगणाऱ्या दोघांच्या ताब्यातून चारचाकी वाहनासह ४ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. बुधवारी मध्यरात्रीच्या सुमारास ही घटना घडली. अटक करण्यात आलेले दोघेही अमरावतीचे रहिवासी आहेत.



अमरावती ग्रामीणचे नव्याने रूजू झालेले पोलिस अधिक्षक निकेतन कदम यांनी अवैध धंदे करणाऱ्या इसमांविरुद्ध प्रभावी कार्यवाही करून सर्व प्रकारचे अवैध धंदे बंद करण्याबाबत निर्देशित केले आहे. त्या अनुषंगाने मोर्शीचे ठाणेदार राहुल आठवले यांनी त्यांचे अधिनस्त गुन्हे प्रकटीकरण पथके व अंमलदार यांच्यासह ही कारवाई केली. अधिकारी व अंमलदार यांना चांदुरबाजार ते मोर्शी रोडने एका पांढऱ्या रंगाच्या झेस्ट कंपनीच्या चारचाकी गाडीमध्ये दोन इमस सोबत एम.डी. (मेफेड्रोन) अंमली पदार्थ बाळगून गोवंश तस्करी करण्याकरीता जाणार आहे, अशी गोपनीय माहिती त्यांना मिळाली होती.

दरम्यान मिळालेल्या माहितीनुसार मध्यरात्रीनंतर सापळा रचण्यात आला. चांदुरबाजार रोडने मोर्शीकडे येणाऱ्या एका पांढऱ्या रंगाच्या गाडीची पाहणी केली असता सदर गाडीमधील दोन इसम नामे अब्दुल हफिज अब्दुल मजीद (वय ३९ वर्षे रा. विसमिल्लाह नगर लालखडी, अमरावती) व अकिल अहेमद जमील अहेमद (वय ३२ वर्षे रा. रेहमतनगर लालखड़ी अमरावती) हे त्यांचे ताब्यात एम.डि. (मेफेड्रोन) अमली पदार्थ बाळगताना आढळून आले. सदर एम.डी. (मेफेड्रोन) कोणाकडून आणि कुठे आणला होता, गावाचत आरोपींना विचारपुस केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. सदर आरोपीतांचे ताब्यातुन एम. डी. (मेफेड्रोन) ५ ग्रॅम किंमत अंदाजे ५० हजार रुपये व दोन अ‍ॅडरॉईड मोबाइल किंमत अंदाजे ३० हजार रुपये व पांढऱ्या रंगाची गाडी क्रमांक (एमएच ०६ बी. पी. ०५१६) किंमत अंदाजे ४ लाख रुपये असा एकूण ४ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.करण्यात आली आहे. मोर्शी पोलीस पुढील तपास करीत आहे. सदरची कार्यवाही पोलिस गा अधीक्षक निकेतन कदम, अप्पर तल पोलिस अधीक्षक दत्ता तोटेवाड, गंग उपविभागीय पोलिस अधिकारी संतोष खांडेकर यांचे मार्गदर्शनात के पोलिस निरीक्षक राहुल आठवले दो यांचे नेतृत्वात पोलिस उपनिरीक्षक न आकाश शिवणकर, तुषार चव्हाण, पोलिस अंमलदार छत्रपती करपते, स्वप्नील चायस्कर, अथर्व कोहळे, कुणाल कवडीसाव यांनी केली आहे.

# राज्यव्यापी विद्यापीठीय कर्मचारी आंदोलन अधिक आक्रमक

## 'नूटा'च्या पाठिंब्यामुळे बळ वाढले



**अमरावती/का.प्र.**

विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समितीच्या वतीने पुकारण्यात आलेल्या राज्यव्यापी आंदोलनाने आता तीव्र स्वरूप धारण केले आहे. १४ मे २०२६ पासून सुरू झालेल्या या आंदोलनाला राज्यातील सर्व सार्वजनिक विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालयांमधून अभूतपूर्व प्रतिसाद मिळत असून, आंदोलनाची प्रखरता दिवसेंदिवस वाढत आहे.

आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात राज्यभरातील सार्वजनिक विद्यापीठे आणि महाविद्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून शासनाचा निषेध केला. हे प्रतीकात्मक आंदोलन अत्यंत यशस्वी ठरत असून, सर्व कर्मचारी यामध्ये स्वयंस्फूर्तीने सहभागी झाले आहेत. कामकाजाच्या ठिकाणी काळ्या फिती लावून कर्मचाऱ्यांनी आपली एकजूट आणि संताप व्यक्त केला आहे.

या लढ्याला आता शैक्षणिक वर्तुळातूनही मोठे बळ मिळाले आहे. नागपूर युनिव्हर्सिटी टीचर्स असोसिएशन (नूटा) चे अध्यक्ष डॉ. प्रवीण रघुवंशी यांनी या राज्यव्यापी आंदोलनाला जाहीर पाठिंबा घोषित केला आहे. डॉ. रघुवंशी यांनी आज सेवक संयुक्त कृती समितीच्या अध्यक्षांना पाठिंब्याचे अधिकृत लेखी पत्र सुपुर्द केले. शिक्षक संघटनेच्या या पाठिंब्यामुळे कर्मचाऱ्यांचे मनोबल उंचावले आहे.

आंदोलनाची धग आता थेट मंत्रालयापर्यंत पोहोचली आहे. राज्यभरातून मिळणारा वाढता पाठिंबा आणि कर्मचाऱ्यांचा आक्रमक पवित्रा पाहता, शासन दरबारी या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर हालचाली वाढल्याचे चित्र आहे. प्रलंबित मागण्यांबाबत तोडगा काढण्यासाठी प्रशासकीय स्तरावर तातडीने बैठकांचे सत्र सुरू झाले असून, सरकारवर दबाव वाढल्याचे स्पष्ट दिसत आहे.

येणाऱ्या दिवसांत जर शासनाकडून सकारात्मक निर्णय झाला नाही, तर हे आंदोलन अधिक उग्र करण्याचा इशारा कृती समितीने दिला असून १७ ते १९ मे या कलावधीत मध्यावकाशात धरने, निषेध सभा व घोषणाबाजीच्या स्वरूपात आंदोलन अधिक तीव्र होणार असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

# बोगस डॉक्टरला तीन वर्षे सश्रम कारावास व दंड

## फ्रेजरपुरा ठाण्याच्या हद्दीतील प्रकरण

**अमरावती/का.प्र.**

कोणतीही वैद्यकीय पदवी नसताना डॉक्टर असल्याची पाटी लावून क्लिनिक थाटणाऱ्या आणि नागरिकांच्या जिवाशी खेळणाऱ्या एका बोगस डॉक्टरला सह दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) तथा अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी राजेंद्र घोगले यांच्या न्यायालयाने गुरुवार, १४ मे रोजी दोषी ठरवून तीन वर्षे सश्रम कारावास व तीन हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

अविनाश वसंतराव डबले (३८) रा. योगीराज नगर, अमरावती असे शिक्षा सुनावण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. अविनाश डबले याने शहरातील उत्तमनगर भागात 'सर्वज्ञ हेल्थकेअर फाउंडेशन' या नावाने क्लिनिक सुरू केले होते. या क्लिनिकमध्ये तो डॉक्टर असल्याचे भासवून रुग्णांवर उपचार करत असे. याच परिसरात राहणारे डॉ. नितीन रमेश गोंडाणे यांच्या वडिलांवरही उच्च रक्तदाबाबत अविनाश डबले याच्याकडे उपचार सुरू होता.

५ मे २०२० रोजी डॉ. नितीन गोंडाणे हे घरी आल्यावर त्यांच्या वडिलांनी त्यांना अविनाश डबले याला भेटण्यास सांगितले. त्यानुसार डॉ. नितीन गोंडाणे यांनी अविनाश डबले याची भेट घेतली. त्यावेळी त्यांना त्याच्या वैद्यकीय ज्ञानाबद्दल संशय आला. त्यांनी सखोल विचारपूस केल्यावर अविनाश डबले याचे वैद्यकीय क्षेत्रातील कोणतेही शिक्षण झाले नसल्याचे आणि त्याच्याकडे कोणतेही अधिकृत प्रमाणपत्र नसल्याचे उघड झाले. या प्रकरणी डॉ. नितीन गोंडाणे यांनी फ्रेजरपुरा ठाण्यात तक्रार दाखल केली होती. तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक बालाजी लालपालवाले यांनी या प्रकरणाचा तपास करून दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले. सदर प्रकरणात साहाय्यक सरकारी अभियोक्ता ज्वाला पांडुरंग जामनेकर यांनी सरकारी पक्षातर्फे एकूण सात साक्षीदार तपासले. साक्षीदारांची साक्ष आणि सरकारी पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने अविनाश डबले याला तीन वर्षे सश्रम कारावास व तीन हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. कोर्ट पैरवी म्हणून अरुण हटवार आणि रुपेश खुरकटे यांनी सरकारी पक्षाला सहकार्य केले.

## हस्तलिखितांची माहिती नोंदविण्यासाठी 'ज्ञानभारतम्' मोबाईल ॲप

**अमरावती-** भारताचा समृद्ध आणि मौल्यवान हस्तलिखितांचा वारसा जतन करण्यासाठी केंद्र शासनाच्या संस्कृती मंत्रालयाच्या वतीने 'ज्ञानभारतम्' ही महत्त्वाकांक्षी मोहिम राबविण्यात येत आहे. अमरावती व अकोला जिल्ह्याकरीता श्री. दीपक पाटील (मो.९४२३१०२०५१) व डॉ. प्रशांत सोनवणे (मो.८६००७५१८९७), वाशिम जिल्ह्यासाठी श्री. गजानन शेळके (मो.७७६७८०२२६३) व श्याम बोरकर (मो.९४०५५००८१२), बुलडाणाकरीता गजानन शेळके व डॉ. प्रशांत सोनवणे तर यवतमाळ जिल्ह्यासाठी गीता सानागरवार (मो.९३७०१५०९११) व श्याम बोरकर आदी अधिकारी समन्वयक म्हणून काम पाहतील.

# जिल्ह्यात लोकसहभागातून शेत पांदण रस्ते व जलपुनर्भरणाची कामे

## अशासकीय संस्थांकडून अर्ज आमंत्रित

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या सोयीसाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेत पांदण रस्ते व जलपुनर्भरण योजना' राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत लोकसहभागातून शेत पांदण रस्ते आणि जलपुनर्भरणाची कामे करण्यासाठी इच्छुक अशासकीय संस्थांकडून अर्ज सादर करण्याचे आवाहन आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

या योजनेमध्ये शेतकरी लोकसहभाग, ग्रामपंचायत स्वनिधी आणि जिल्हा नियोजन समिती निधी यांच्या अभिसरणातून ही कामे केली जाणार आहेत. ही योजना कोणत्याही एजन्सीच्या नफ्यासाठी नसून, ती पूर्णपणे लोकसहभाग आणि सेवाभावावर आधारित आहे, जेणेकरून कमी खर्चात शेतकरी हिताचे रस्ते निर्माण होतील.जिल्हास्तरावरून या योजनेसाठी प्रति १ किलोमीटर पांदण रस्त्यासाठी कमाल ९ लाख रुपयांची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. यामध्ये लोकसहभागाची किमान मर्यादा १.५ लाख रुपये असून, उर्वरित रक्कम जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून दिली जाईल. या निधीवर सर्व शासकीय कपाती लागू राहतील. तसेच, पांदण रस्त्यांचे काम पूर्ण झाल्यानंतर (लोकसहभागातून होणारे मातीकाम वगळून) मोजमापानुसार जिल्हा नियोजन समितीचा निधी वितरित केला जाईल. जे अर्जदार जास्तीत जास्त लोकसहभाग आणि कमीत कमी शासकीय निधीमध्ये काम करण्यास तयार असतील, अशा संस्थांना प्राधान्य दिले जाईल. याशिवाय, यापूर्वी 'जलयुक्त शिवार' किंवा तलावातील गाळ काढण्याच्या योजनांमध्ये काम करण्याचा अनुभव असलेल्या संस्थांना विशेष प्राधान्य मिळेल.

इच्छुक अशासकीय संस्थांनी आपल्या अर्जासोबत संस्थेचे मान्यता व नोंदणी प्रमाणपत्र, अध्यक्ष व सदस्यांची नावे, अनुभव प्रमाणपत्र आणि यापूर्वी केलेल्या कामांची कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. हे अर्ज उपजिल्हाधिकारी (रोहयो) कार्यालय, अमरावती येथे सादर करायचे आहेत. अर्ज सादर करण्याचा कालावधी शुक्रवार, दि. १५ मे ते २२ मे २०२६ पर्यंत (सुटीचे दिवस वगळून) सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत राहील. प्राप्त अर्जांची छाननी जिल्हास्तरीय समितीमार्फत २५ मे २०२६ रोजी केली जाईल. त्यानंतर छाननीमध्ये पात्र ठरलेल्या संस्थांची बैठक व चर्चासत्र २६ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आले आहे. या योजनेबाबत काही अडचणी किंवा अधिक माहिती हवी असल्यास उपजिल्हाधिकारी (रोहयो) ज्ञानेश्वर घ्यार (९५२७९६६०६४), कार्यक्रम व्यवस्थापक रामेश्वर परळकर (९८९०१४४१७०) यांच्याशी संपर्क साधावा.

## मंगळवारी रोजगार मेळावा

**अमरावती-**नोकरीच्या शोधात असलेल्या सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करियर सेंटर, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या १९मे २०२६ रोजी 'पं. दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे' आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात महिंद्र ॲन्ड महिंद्र, पुणे कंपनीमध्ये शासन मान्यताप्राप्त 'प्रधानमंत्री इंटर्नशिप' करण्याची संधी जिल्ह्यातील उमेदवारांना मिळणार आहे.मेळाव्याच्या माध्यमातून कंपनीतील हजारहून अधिक रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया राबवली जाईल. यासाठी १० वी, १२वी आणि आय.टी.आय. उत्तीर्ण असलेले तसेच १८ ते २५ वर्षे वयोगटातील उमेदवार पात्र असणार आहेत. निवड झालेल्या उमेदवारांना प्रति महिना एकूण १८ हजार ५५ रुपये विद्यावेतन दिले जाईल. यामध्ये ९ हजार ५५ रुपयांसह प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेच्या अंतर्गत मिळणाऱ्या भत्त्याचा समावेश आहे.मुलाखतीसाठी उमेदवारांनी १९ मे रोजी शासकीय तांत्रिक विद्यालय परिसर, डेपो रोड, अमरावती येथील कार्यालयात स्वखर्चाने बायोडाटा, पासपोर्ट फोटो, आधारकार्ड, शैक्षणिक कागदपत्रे, वयाचा व पत्त्याचा पुरावा घेऊन प्रत्यक्ष उपस्थित राहावे. मेळाव्यासाठी कोणताही प्रवास भत्ता दिला जाणार नाही. अधिक माहितीसाठी नागरिकांनी ०७२१-२५६६०६६ किंवा ८९८३४१९७९९या क्रमांकावर संपर्क साधावा.

# देवस्थानांच्या भूमीवर सरकारचा डोळा?

**लेहेगाव/वार्ताहर**

महाराष्ट्र शासनाने प्रस्तावित केलेला 'देवस्थान इनाम जमीन उन्मूलन कायदा २०२६' हा मसुदा सध्या राज्यभर चर्चेचा विषय ठरत आहे. या मसुद्यानुसार देवस्थानांच्या मालकीच्या हजारो एकर जमिनींवर कब्जा करून बसलेल्या धारकांना मालकी हक्क देण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. शासनाचा दावा आहे की यामुळे जुने वाद मिटतील; परंतु अनेक



हिंदुत्ववादी संघटना, मंदिर ट्रस्ट आणि धर्मप्रेमी नागरिक याला मंदिरांच्या अस्तित्वावर मोठा घाला मानत आहेत.

राष्ट्रीय संघटक मंदिर महासंघाचे सुनिल घनवट व मंदिर महासंघचे अनुप जयस्वाल यांनी या संदर्भात तीव्र संताप व्यक्त करत सांगितले की, 'मंदिरांच्या जमिनी या हिंदू समाजाच्या श्रद्धेचे आणि धर्मकार्याचे आधार आहेत. जर त्या खासगी मालकीत गेल्या, तर भविष्यात अनेक मंदिरे आर्थिकदृष्ट्या उद्ध्वस्त होतील.'

राज्यातील अनेक प्राचीन देवस्थाने शेकडो वर्षांपासून त्यांच्या इनाम जमिनीवर अवलंबून आहेत. या जमिनींमधून मिळणाऱ्या उत्पन्नावर पूजा-अर्चा, उत्सव, अन्नदान, धर्मशाळा, गोशाळा आणि सामाजिक उपक्रम चालतात. आता जर सरकारने त्या जमिनी कायमस्वरूपी इतरांच्या नावे केल्या, तर मंदिरांकडे उत्पन्नाचे साधन उरणार नाही, अशी भीती व्यक्त होत आहे.

विशेष म्हणजे शासनाने या मसुद्यात काही अतिक्रमणधारकांनाही संरक्षण देण्याचा विचार मांडला आहे. यामुळे 'जमीन बळकावणाऱ्यांनाच बक्षीस' मिळणार का ? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.एका बाजूला सरकार मंदिर विकास, पर्यटन आणि धार्मिक वारसा जतन करण्याच्या घोषणा करत आहे; तर दुसऱ्या बाजूला मंदिरांच्या जमिनीच कमी करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप होत आहे. अलीकडेच राज्य सरकारने काही मंदिर विकास प्रकल्पांना मंजुरी दिली असली, तरी देवस्थान जमिनींच्या प्रश्नामुळे भाविकांमध्ये अस्वस्थता वाढली आहे.सरकारने कोणताही निर्णय घेण्यापूर्वी मंदिर ट्रस्ट, धर्माचार्य, भाविक आणि हिंदू संघटनांशी सविस्तर चर्चा करावी, अशी मागणी पिंगाळादेवी संस्थानचे अध्यक्ष विनीत पाखोडे. सचिव आशिष मारुडकर केली आहे.

---

## संक्षिप्त

### विभागीय आयुक्तालयात संभाजी महाराजांना अभिवादन

**अमरावती-**स्वराज्यरक्षक, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात आज विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.यावेळी अपर आयुक्त संजय जाधव, अजय लहाने, उपायुक्त संतोष कवडे, राजीव फडके, सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे, गिता वंजारी यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनीही छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प वाहुन विन्रम अभिवादन केले.



### छत्रपती संभाजी महाराज यांना अभिवादन



**अमरावती-**छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंद दानेज, उपजिल्हाधिकारी शिवाजी शिंदे, विधी अधिकारी नरेंद्र बोहरा, नाझर विजय सांगळे उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनीही छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

### सोमवारी जिल्हा महिला लोकशाही दिन

**अमरावती-** जिल्हा महिला लोकशाही दिन सोमवार १८ मे, २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. तरी संबंधितांनी अहवालासह व्यक्तिश: उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

### मनपात छत्रपती संभाजी महाराज जयंती



**अमरावती-**छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्य हारार्पण कार्यक्रम अमरावती महानगरपालिकेत संपन्न झाला. छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती निमित्य मा.महापौर श्रीचंद तेजवानी यांचे हस्ते छत्रपती संभाजी महाराज यांचे प्रतिमेस हारार्पण विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे करण्यात आले. यावेळी महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा, सभागृह नेता चेतन गावंडे, विरोधी पक्षनेता विलास इंगोले, झोन सभापती स्वाती कुलकर्णी, नगरसेवक बबलु शेखावत, भोजराज काळे, सचिन वैद्य, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त नरेंद्र वानखडे, उपायुक्त योगेश पिठे, मुख्यलेखापरिक्षक तथा मुख्यलेखाधिकारी श्यामसुंदर देव, शहर अभियंता रविंद्र पवार, सहाय्यक आयुक्त श्रीकांतसिंह चौव्हान, भुषण पुसतकर, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.विशाल काळे, कार्यकारी अभियंता सुहास चव्हाण, नगरसचिव संदिप वडुरकर, सहाय्यक निवडणूक अधिकारी अक्षय निलंगे, हरीष संतोसिया, प्रमोद मोहोड, कैलास कुलट, भुषण खडेकार, गणेश काकडे, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### धर्मवीर संभाजी महाराज जन्मोत्सव सोहळा

**ब्राह्मणवाडा थडी/वार्ताहर**



कमांडर धीरजराजे सातपुते यांनी व शाखाप्रमुख मंगेश सापधारे यांच्या नेतृत्वात स्वराज्यरक्षक धर्मवीर संभाजी महाराज आणि बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दी वर्ष निमित्याने त्याच्या फोटोचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली सातपुते यांच्या मोबाईल वरून मुंबईचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे खासदार मा. अरविंद सावंत यांनी मोबाईलवरून बोलून संभाजी महाराज यांच्या जीवनावर आपल्या बोलण्यातून प्रकाश टाकला व सर्व शिवसैनिक व ग्रामस्थांना शुभेच्छा दिल्या.काहींनी यावेळी शिवसेना पक्षात प्रवेश केला.पहिला मुस्लिम प्रभारी शाखाप्रमुख म्हणून शकील शाह जलाल शाह यांना नियुक्ती देण्यात आली.ठाणेदार प्रशांत जाधव, सुभेदार मेजर विनोद खुळे,पत्रकार राजेश खडसे,शहर प्रमुख परतवाडा सागर वाटाणे, शहर प्रमुख अचलपूर गजानन फिसके,प्रकाश सायंदे यांचा सत्कार करण्यात आला. स्वर्गीय निलेश बदुकले यांना श्रद्धांजली देण्यात आली.कार्यक्रमाला प्रशांत सातपुते, अमोल निमकर,आशिष औतकर,पंकज भगत,सतीश वसुले, आशिष दाभाडे, जलाल शहा यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता परिश्रम घेतले तसेच गावातील अनेक नागरिक कार्यक्रमाला उपस्थित होते.

### गर्भवती मातांना मार्गदर्शन


**अमरावती-**गर्भ धारणेदरम्यान काही महिलांमध्ये रक्तातील साखरेचे प्रमाण वाढते, यालाच गर्भावस्थेतील मधुमेह म्हणतात. ज्यामध्ये आईमध्ये उच्च रक्तदाब, थकवा, बाळाचे वजन जास्त होण्याची शक्यता प्रसवावेळी गुंतागुंत परिस्थिती निर्माण होते. प्रसूतीसाठीची तयारी या अंतर्गत योग्य आहार, व्यायाम, श्वसन तंत्र, मानसिक तयारी व प्रसूती दरम्यान घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर माहिती तज्ञ डॉक्टरांनी गर्भसंस्कार शिबिराच्या माध्यमातून गर्भवती मातांना दिला. स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ डॉ. उर्वशी हातगांवकर यांच्या मार्गदर्शनाखाली, गर्भ संस्कार मार्गदर्शक डॉ. मृणाल पाटकर, समुपदेशक मनिषा कान्हव फिजिओथेरेपिस्ट डॉ. शिखा चावला, ओलावा तेजस्विता पटेरिया व अन्य तज्ञ डॉक्टर यांनी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले.

# भारतासाठी २०२६-२७ वर्ष कसे असेल ?

शके १९४८ पराभूत नाम संवत्सरे (२०२६-२७)
तिथी प्रवेश (फाल्गुन कृष्ण ३० वा सह) चैत्र शु.१
गुरुवार सकाळी ६ वा ५३ मि. होत आहे. (प्रतीपदा क्षय तिथी आहे.) गुढी पाडवा १९/३/२०२६ रोजीच आहे. या दिवशीची भारताची कुंडली प्रमाणे भारतासाठी हे वर्ष कसे असेल या बाबत पाहु.


१५/८/१९४७ @०.००.०१ भारत    १९/३/२०२६@६.५३ वाजता, भारत

डीआय नवी दिल्ली




पुष्य चंद्र नक्षत्र चरण १

डीआय




चंद्र नक्षत्र उत्तरा भाद्रपद १

दि. १९/३/२०२६ च्या कोट चक्राप्रमाणे -

१) स्तंभी मं, राहु (कोटपाल) व वक्री बुध आहे.


जे अनुक्रमे भाग्येश, कोटपाल व चतुर्थेश व मारकेश तसेच मुळ पत्रिकेत आरुढ लग्नाचा स्वामी आहे. तसेच केतु पण स्तंभी आहे.

मुळ कुंडली प्रमाणे में सप्तमेश, राहु कोटपाल, बुध पंचमेश व धनेश आहे त्यामुळे कोट सुरक्षित आहे.

२) परंतु केतु हा **षष्ठात A8 सह सिंहत आहे**. त्यामुळे साथीचे रोग (फ्लु, व्हायरस) ह्या सारखी रोगराई होईल.

३) गोचरीने मंगळ, राहु व बुध (वक्री) हे स्तंभी आहे व ते व्ययामध्ये आहे. त्यामुळे भारताला आंतरदेशीय स्तरावर आर्थीक नुकसान सोसावे लागेल. (मंगळ भाग्येश व धनेश आहे) राहुमुळे अचानक मोठे आर्थीक संकटे तसेच अपघात होईल. प्रसिद्ध व्यक्तीचे मृत्यु, तसेच जागतीक युद्धामध्ये भाग घेतल्यास नामुष्की होईल. इस्त्राईल इराण युद्धामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होईल व त्याचा परिणाम, आर्थिक सामाजिक, भारताला भोगावा लागेल. सप्तमातील A10 (दशम सत्तापार्टी) त्यामुळे व सप्तमेश बुच हा AL. चा स्वामी आहे. त्यामुळे भारताच्या अधांतरी धोरणामुळे भारताला त्रास होण्याची शक्यता आहे व आंतर्देशिय राजकारणात त्याची पत कमी होईल. अमेरिकेचा अंमल भारतावर राहील कारण बुध कुंभेत असुन त्याचा स्वामी शनी (dispositor) मिनेत लग्नात आहे. त्यामुळे **'तळ्यात न मळ्यात आमचे हात कोण्याच्याही गळ्यात'** अशी स्थिती ठेवल्यास त्याचे भयंकर परिणाम होईल.

१९/३/२०२६ @ ६.५३ तास. चे कोटचक्र.
कोतस्वामी चंद्र, कोतपाल राहू



४) पंजाब सिमेवर (पश्चिम) युद्धजन्य स्थिती होईल कारण सिंहत केतु A8 सह षष्टात आहे. त्यामुळे अचानक हल्ले होण्याची शक्यता आहे. (पंजाबची रास सिंह आहे.)

५) जनतेमध्ये मोठ्या प्रमाणात विरोधाभास व असंतोष होईल. महागाई वाढेल. सत्तापक्ष अडचणीमध्ये येईल. (लग्नावर व्ययातुन अर्गला आहे.) रोगराई वाढेल. विरोधीपक्ष वरचढ होईल. जनता त्रस्त होईल. मिनेतला शुक शनीसह लग्नी असल्यामुळे **लैंगीक अत्याचार वाढेल. यामध्ये काही मोठ्या व्यक्तीवर आळ येईल व अपकिर्ती होईल** (मं/राहू दशा सुरु). त्यामुळे फेब्रुवारी २०२७ पर्यंत बऱ्याच ठिकाणी अराजकता माजेल. परिस्थिती कायदा व सुरक्षेच्या बाहेर जाईल. पश्चिमबंगाल मध्ये मोठा उद्रेक होईल. यावेळी राशीदशा (नारायण दशा) कुंभ मकर व कुंभ/यनु आहे. जी व्यय, लाभ व दशम स्थानाशी संबंधित आहे. त्यामुळे उत्पादकता, नफा व सत्ताधारी पक्ष यांना त्याचा तोटा सोसावा लागेल.

६) सर्वसाधारणपणे हे वर्ष जनतेला फारसे सुखी राहणार नाही. **महागाई, आवश्यक वस्तुचा पुरवठा नसणे यांचा** सामना करावा लागेल. तसेच देश/विदेशामधील युद्धाचा असर त्यांना भोगावा लागेल.

.. ओम तत् सत्।

**-इंजिनिअर विनय कुऱ्हेकर**
अध्यक्ष, त्रिस्कंध ज्योतिष फलादर्श
अभ्यास मंडळ, नागपूर
दिनांक: १८/३/२०२६

# युनायटेड स्टेट ऑफ अमेरिकाच्या प्रत्यक्ष भूमीवरून


युनायटेड स्टेट ऑफ अमेरिका चा सर्वोत्तम राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन.अब्राहम लिंकन यांचा जन्म १२फेब्रु.१८०९ ला केंटूकी येथे अत्यंत गरीब घराण्यात झाला. वडील थॉमस आई नॅन्सी.लिंकन लहान असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले. वडिलांनी सारा नावाच्या महिलेशी दुसरे लग्न केले जीला पूर्वीच्या पतीपासून तीन मुले होती.तरीही दुसरी आई हिने लिंकन वर खूप प्रेम केले.लिंकनलहानपणापासूनच अत्यंत ईमानदार ते लहान असताना दुकानात काम करायचे एकदा एका ग्राहकाकडून चुकून जास्त पैसे घेतल्या गेले .तो इसम निघून गेल्यानंतर लिंकन यांच्या लक्ष्यात आले तेव्हाच लिंकन अनेक मैल पायी चालून संबंधित इसमाचा शोध घेतला व पैसे परत केले.एकदा लिंकन शेजाऱ्याकडून वॉशिंग्टन यांचे चरित्र वाचण्यासाठी पुस्तक घेऊन आला रात्रीला पाऊस



आल्याने पुस्तक खराब झाले ही बाब त्यांनी शेजाऱ्याला सांगितली व मजुरी करून पुस्तकाची रक्कम शेजाऱ्याला नेऊन दिली.तसेच एकदा लिंकन एका व्यापाऱ्याचे साहित्य वाहतूक करीत असताना चोरांनी ते लुटले तेव्हा लिंकन यांनी साहित्याच्या किमतीची परतफेड व्यापाऱ्यांकडे मजुरी करून केली.

**भाग ३**

लिंकन वकील झाल्यानंतर वकिलीचा व्यवसाय करू लागले.लिंकन यांनी बऱ्याच निवडनुकीत भाग घेतला व १८६०मध्ये राष्ट्राध्यक्ष बनले.१८६० च्या निवडनुकीत प्रचार चालू असताना ग्रेस नावाच्या मुलीने लिंकन यांना एक पत्र लिहून विनंती केली की;त्यांनी जर दाढी ठेवली तर महिलाना ते आवडतील व महिला त्यांच्या पतींना मते द्यायला सांगतील.(१८ऑगस्ट१९२० पासून महिलाना वोटिंग चां अधिकार प्राप्त) तेव्हापासून लिंकन दाढी ठेवायला लागले.लिंकन



यांनी राष्ट्राध्यक्ष होताच गुलामगिरी कायदा रद्द केला तसेच देशांतर्गत गृहयुध्द् अत्यंत शिताफीने संपवल. त्यामुळेच अमेरिका अबाधित राहिला. याचा राग म्हणून एका माथेफिरूने १४एप्रिल १८६५ला वॉशिंग्टन येथील डी.सी.फोर्ड थिएटर मध्ये लिंकन ची गोळी मारून हत्या केली. लिंकन यांनी लोकशाही बाबत एक विचार मांडला. GOVT.OF THE PEOPLE;BY THE PEOPLE;FOR THE PEOPLE जो विचार संपूर्ण जगाने आत्मसात केला.अमेरिकेचेच नाही तर जगातील एक उत्तम राष्ट्राध्यक्ष म्हणून ते परिचित आहे.

**अशोक कविटकर**
वनाधिकारी (निवृत्त)
मु.पो.अमरावती.ह.मु.ऑस्टिन टेक्सास

# कालगणना

कालगणना हे अति प्राचीन असलेल्या हिंदु संस्कृतीचे महत्त्वाचे अंग आहे.कालगणनेला कालचक्र असेही म्हणतात 'युग 'हे कालगणनेचे सर्वात मोठे परिमाण आहे.सत्ययुग, त्रेतायुग, द्वापार युग आणि कलियुग अशी चार युगे आहेत. कालगणनेच्या सौर कालगणना आणि चांद्र कालगणना अशा दोन पद्धती आहेत. सौर पंचांगानुसार वर्षाचे ३६५ दिवस आहेत, तर चंद्रमासप्रमाणे वर्षाचे ३५४ दिवस आहेत या दोघांमधील अंतर अकरा दिवसांचे आहे. हा फरक भरून काढण्यासाठी दर तीन वर्षांनी एकदा अधिक मासाचे प्रयोजन केले आहे.

दर तीन वर्षांनी अधिक मास येतो.'अधिकस्य अधिकम् फलम्' असे मानले जाते.म्हणजे अधिक मासात केलेल्या दान,तप,यज्ञ, साधना यांचे फळ अधिक असते.अधिकमासाला 'पुरुषोत्तम'मास असेही म्हणतात. एका वर्षात तीन मुख्य ऋतू आणि सहा उप ऋतू असतात. सौर आणि चांद्र कालगणना या दोन्ही पद्धतीच्या कालगणनेचा उपयोग हिंदूंना होतो.


आपले सण उत्सव आपण सौरगणनेनुसार साजरे करतो.भाद्रपदात गणपती , अश्विन मासात नवरात्र ,अश्विन- कार्तिक मासात दिवाळी आणि चैत्रात गुढीपाडवा ठरलेले असते. इस्लामी पद्धतीत तसे नसते.त्यांचे रोजे कधी उन्हाळ्यात तर कधी थंडीत येतात. व्यापाऱ्यांना हिंदु पंचांगाचा व्यावसायिक द्रुष्टीने लाभ होतो.

अधिकमासात तीर्थाटन, तीर्थक्षेत्री,पवित्र नद्या,सरोवर,नद्यांचे संगम येथे स्नान, तप,दान याला विशेष महत्त्व असते. दान म्हणून शोभेच्या किंवा प्लास्टिकच्या किंवा स्टील अथवा लोखंडी वस्तू देवू नयेत. दान नेहमीच सात्विक वस्तूंचे द्यावे. ज्ञानदान हे महत्त्वाचे मानले जाते. ईश्वरी ज्ञान माणसाचा उद्धार करते म्हणून अध्यात्मविषयक ग्रंथ भेट देणे दान देणे अधिक इष्ट ठरते.अधिकमासात विवाह विधी,उपनयन संस्कार अशी मंगलकार्ये तसेच नवीन गृहप्रवेश असे विधी केले जात नाहीत.'ओम नमो भगवते वासुदेवाय ' हा जप अधिक मासात अधिकाधिक करावा असे शास्त्र सांगते.

१७ मे पासून अधिक मास सुरु होत आहे. त्याचा उपयोग आपले अध्यात्मिक बळ वाढवण्यासाठी करूया. दिवसेंदिवस कठीण होत असलेल्या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी आपल्याकडे अध्यात्मिक बळ असणे आवश्यक आहे.म्हणून विना खर्चिक आणि कुठेही कधीही करू शकतो असा जपयज्ञ जास्तीत जास्त करूया, आणि आपले अध्यात्मिक बळ वाढवूयात. कठीण प्रसंगात त्याचाच आधार मोठा असतो.

**संध्या काटदरे**

# 'पुरुषोत्तम मास'



पुरुषोत्तमास नित्य
नवनीत आवडे जे

प्राशना प्रेम हस्ते
यशोदेचे धरीतो पाय

रुसतो उगा उल्हास
चाळा हा खेळ भास

कां रडे बाळ तान्हा
द्वारिकाराज राणा

षो-डषा दागिणे जे
सजुनी त्या गोप बाला

आल्या यशोदा द्वारी
गार्हाणी सांगे माय

त्या-कृष्ण सावळ्याला
घेऊनी ये यशोदे

चोरतो नित्य लोणी
गृहे आमुचे साजरा

तन-मना जादू करितो
हा सत्य की आभास

क्षणी दिसतो लुप्त होतो
तव कृष्ण धावताना

'मनवा'स भुरळ घाली
हा कृष्ण बोलताना

भुलवी क्षणैक लीला
नंदना कां गे मन रमो

मानसी कृष्ण नमला
पुसले हो नयन अपुले

यशोदेचा पदर धरूनी
बासुरी बोले तान

सतरंग सप्तसूर
भूलल्या त्या सप्तबाला

कृष्णास घेत कडेवरी,
गेल्या गृहास हरी-ॐ

**'स्वरचैतन्य'**
**डॉ.मिलिंद इंदूरकर**
(मनवा)
नागपूर
.९५५२६०७६४६

# मेळघाट:जंगलाच्या कुशीतला शाश्वत जीवनाचा धडा

## निसर्ग,आदिवासी संस्कृती आणि बदलत्या वास्तवाचा वेध




२२ मे रोजी साजरा होणारा आंतरराष्ट्रीय जैवविविधता दिन हा दिवस निसर्गातील विविध सजीव, वनस्पती, प्राणी आणि परिसंस्थांचे महत्त्व अधोरेखित करतो. जैवविविधता म्हणजे केवळ जंगलातील वन्यजीव नव्हे; तर माणूस, निसर्ग आणि स्थानिक संस्कृती यांच्यातील परस्परावलंबी नाते आहे. या संदर्भात मेळघाट हा परिसर केवळ अमरावती जिल्ह्याचाच नव्हे, तर संपूर्ण राज्याचा मौल्यवान नैसर्गिक ठेवा आहे.

१९७४ मध्ये मेळघाट ला व्याघ्र प्रकल्प म्हणून घोषित करण्यात आले सध्या या प्रकल्पाचे एकूण क्षेत्रफळ सुमारे २७६८.५२ चौ.किलोमीटर असून उष्ण कटिबंधीय शुष्क पानझडी स्वरूपाचे आहे. प्रामुख्याने सागवान वृक्षांचे वर्चस्व दिसून येते. खंडू, खापरा, सिपना, डोलार, गडगा ह्या मेळघाट च्या जीवनवाहिन्या आहेत.मेळघाट मधील दाट अरण्ये, डोंगररांगा, नद्या, ओढे आणि वन्यजीव जैवविविधतेचे जिवंत उदाहरण आहेत. मेळघाट हा केवळ व्याघ्र प्रकल्प नाही, तर अनेक दुर्मिळ वनस्पती, पक्षी आणि प्राण्यांचे आश्रयस्थान आहे. येथे असलेली वनसंपदा पावसाचे चक्र, भूजल पातळी आणि पर्यावरणीय संतुलन टिकवून ठेवण्यास महत्त्वाची भूमिका बजावते. जिल्ह्याच्या हवामान संतुलनात आणि जलस्रोतांच्या जतनात मेळघाटचा वाटा अनन्यसाधारण आहे.

मेळघाटची खरी ओळख मात्र फक्त जंगलात नाही; ती तेथील आदिवासी संस्कृतीत आहे. येथे राहणाऱ्या समाजाने पिढ्यान् पिढ्या निसर्गाशी नाते जपले आहे. जंगल त्यांच्यासाठी संसाधन असले, तरी ते उपभोगाची वस्तू नाही. निसर्गाशी संवाद, सन्मान आणि मर्यादित वापर हा त्यांच्या जीवनाचा पाया आहे. अनेक सण, परंपरा आणि लोकविश्वास निसर्गाशी जोडलेले आहेत. येथे झाडे, डोंगर, पाणवठे आणि वन्यजीव यांना देवत्वाचे स्थान दिले जाते.मेळघाटात नोकरीच्या निमित्ताने सुमारे सहा वर्षे राहण्याची संधी मिळाली. त्या काळात प्रकर्षाने जाणवलेली गोष्ट म्हणजे येथील अनेक लोक निसर्गाकडून आवश्यक तेवढेच घेतात. जंगलातून फळे, वनौषधी, लाकूड किंवा इतर संसाधने घेताना गरजेपुरतेच घेतात आणि उरलेले निसर्गासाठी तसेच ठेवतात. अर्थात, बदलत्या काळात या जीवनपद्धतीला काही अपवादही दिसतात; मात्र परंपरेतला निसर्गाशी जिव्हाळा अजूनही अनेक कुटुंबांत टिकून आहे.

आजच्या स्पर्धात्मक आणि उपभोगप्रधान जगात 'अधिक मिळवणे' ही प्रवृत्ती वाढत असताना, मेळघाट मधील हा साधा विचार खूप काही शिकवून जातो. निसर्ग हा संपवण्याची वस्तू नसून, पुढच्या पिढ्यांसाठी जपण्याचा ठेवा आहे ही भावना त्यांच्या दैनंदिन जीवनात दिसते. संसाधनांचा संयमी वापर आणि निसर्गाला परत देण्याची वृत्ती हीच त्या समाजाची खरी समृद्धी आहे. ही जीवनदृष्टी आजच्या शाश्वत विकासाच्या संकल्पनेशी पूर्णपणे सुसंगत आहे.येथील आदिवासी समाज वाघा ला 'कुला मामा' म्हणून मानतो. वाघ हा जंगलाचा रक्षक आणि कुळाचा संरक्षक मानला जातो. अनेक गावांमध्ये कुला मामाची मंदिरे आहेत. पारंपरिक पूजा आणि श्रद्धेमुळे वन्यजीवांविषयी आदराची भावना टिकून राहिली आहे. ही संस्कृती माणूस आणि जंगल यांच्यातील सहअस्तित्वाची शिकवण देते. वनसंवर्धनासाठी कायदे लागू होण्यापूर्वीच मेळघाटमध्ये श्रद्धा आणि परंपरेतून वनसंवर्धन जपले जात होते.

मेळघाट हा पावसाळ्यात समृद्ध प्रदेश मानला जातो. अनेक भागांत भरपूर पाऊस पडतो; जो ९५० मिमी ते १४०० मिमी पर्यन्त असतो. डोंगर आणि जंगलामुळे जलस्रोतही मुबलक असतात. तरीही आज उन्हाळ्यात अनेक गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागतो. हा विरोधाभास गंभीर आहे. पावसाचे अनियमित वितरण, जलसंधारणाचा अभाव, भूजल घट आणि वनक्षेत्रावरील दबाव यामुळे ही परिस्थिती निर्माण होत आहे. जलसमृद्ध प्रदेशातही पाणीटंचाई भासणे हे बदलत्या पर्यावरणाचे स्पष्ट संकेत आहेत.यासोबतच वन्यजीव आणि मानवी संघर्षाचे स्वरूपही वाढताना दिसते. वाघ, बिबट्या, रानडुक्कर यांसारखे वन्यप्राणी गावांच्या सीमेपर्यंत येण्याच्या घटना वाढल्या आहेत. शेतीचे



नुकसान, जनावरांवर हल्ले आणि भीतीचे वातावरण निर्माण होते. जैवविविधतेचे संरक्षण करताना स्थानिक ग्रामस्थांच्या सुरक्षिततेचाही विचार तितकाच महत्त्वाचा ठरतो. सहअस्तित्वाचा प्रश्न आज नव्या स्वरूपात उभा आहे. वन विभाग आणि स्थानिक आदिवासी समाज यांच्यातही काही मुद्द्यांवर मतभेद दिसून येतात. जंगल संवर्धनासाठी लागू असलेले नियम आणि स्थानिकांच्या पारंपरिक हक्कांमध्ये संघर्ष निर्माण होतो. वनउपज, चराई, लाकूड वापर किंवा संसाधनांवरील प्रवेश या बाबींवरून वाद उद्भवतात. एका बाजूला वनसंवर्धन आवश्यक आहे, तर दुसऱ्या बाजूला स्थानिकांच्या उपजीविकेचे प्रश्न आहेत. दोन्ही बाजूंमध्ये समन्वय साधणे आवश्यक आहे.

वातावरण बदल च्या पार्श्वभूमीवर मेळघाटचा अनुभव आपल्याला महत्त्वाचा धडा देतो. पावसाचा अनियमितपणा, वाढते तापमान आणि जलटंचाई यावर उपाय शोधताना स्थानिक संस्कृतीतील निसर्गपूरक जीवनशैली मार्गदर्शक ठरू शकते. वृक्षलागवड, जलसंधारण, सेंद्रिय शेती आणि स्थानिक प्रजातींचे जतन ही आजची गरज आहे; पण त्यामागील मूलभूत विचार मेळघाटाने आधीपासून जगला आहे.पर्यावरण संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नाही. प्रत्येकाने निसर्गाशी नाते जपणे आवश्यक आहे. घराजवळ झाड लावणे, पाण्याचा अपव्यय टाळणे, जलस्रोत स्वच्छ ठेवणे आणि स्थानिक वृक्षांचे संवर्धन करणे या छोट्या कृती मोठा बदल घडवू शकतात. मेळघाट मधील समाजाने दाखवून दिले आहे की निसर्गाचा सन्मान केल्यास विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखता येतो.आज शाश्वत विकासाची चर्चा जगभर सुरू आहे. पण त्याची खरी दिशा मेळघाट सारख्या भागांत दिसते. जंगलाचा आदर, संसाधनांचा संयमी वापर, निसर्गाशी जोडलेली संस्कृती आणि पुढील पिढीसाठी पर्यावरण जपण्याची वृत्ती हीच खरी समृद्धी आहे. विकासाचा मार्ग भलेही शहरात आखला जाऊ शकतो; पण त्याला जीवन देणारी शिकवण मात्र गावाच्या मातीत आणि मेळघाटच्या जंगलात दडलेली आहे.



**दिनेश गाडगे**
जनसंपर्क अधिकारी,
जिल्हा परिषद, अमरावती
संपर्क क्र.
९८५०३३६५९२

# रौप्य महोत्सवातही पाणीटंचाई; जिगावच्या नावावर स्वप्नांचीच विक्री

## भाजपवर वंचित बहुजन आघाडीचे गटनेते निलेश देव यांचा हल्लाबोल

■ प्रतिनिधी | अकोला ■

*शहरात तापमानाने ४७ अंशांचा टप्पा ओलांडला असताना दुसरीकडे भीषण पाणीटंचाईमुळे अकोलेकरांचे हाल होत आहेत. अशा परिस्थितीत महापालिकेने १३ मेपासून शहरात पाचव्या दिवशी, तर हद्दवाढ भागात सहाव्या दिवशी पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेतल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे गटनेते निलेश देव यांनी भाजपवर जोरदार टीका करत '२५ वर्षे सत्ता उपभोगूनही अकोलेकरांना रोज पाणी देता आले नाही, तर ही सत्ता जनतेच्या कोणत्या उपयोगाची?' असा सवाल उपस्थित केला.*

निलेश देव म्हणाले, अकोला महानगरपालिकेच्या स्थापनेला यंदा २५ वर्षे पूर्ण होत असून रौप्य महोत्सव साजरा करण्याच्या घोषणा केल्या जात आहेत. मात्र नागरिकांच्या घरात पाणीच पोहोचत नसल्याने हा महोत्सव जनतेच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखा असल्याची टीका त्यांनी केली. भाजपने महापालिकेत सर्वाधिक काळ सत्ता भोगली, अनेक महापौर बदलले, विकासाच्या घोषणा झाल्या; मात्र शहरासाठी कायमस्वरूपी जलव्यवस्थापन उभे राहिले नाही, असेही त्यांनी म्हटले.



महान प्रकल्पातील जलसाठा कमी झाल्याचे कारण प्रशासनाकडून पुढे केले जात असले तरी, १९८४ पासून कार्यान्वित असलेल्या या प्रकल्पाची साठवण क्षमता वाढवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गाळ काढण्याचे काम का झाले नाही, पंपिंग यंत्रणेचे आधुनिकीकरण का करण्यात आले नाही, वाढत्या लोकसंख्येनुसार पर्यायी जलस्त्रोत का निर्माण करण्यात आले नाहीत, असे प्रश्नही त्यांनी उपस्थित केले.

जिगाव प्रकल्पावरूनही त्यांनी सत्ताधाऱ्यांना लक्ष्य केले. 'गेल्या अनेक वर्षांपासून जिगाव प्रकल्पाच्या नावावर अकोलेकरांना फक्त स्वप्ने दाखवली जात आहेत. प्रत्येक निवडणुकीत या प्रकल्पाचा गाजावाजा केला जातो; मात्र प्रत्यक्षात शहरात पाणी कधी येणार याची ठोस तारीख दिली जात नाही,' असा आरोप त्यांनी केला.

जिगाव प्रकल्पाचे काम किती टक्के पूर्ण झाले, निधी किती मिळाला, पाइपलाइनचे काम कुठपर्यंत आले, अकोल्यात पाणीपुरवठा नेमका कधी सुरू होणार, याबाबत सत्ताधाऱ्यांनी पारदर्शक माहिती द्यावी, अशी मागणीही त्यांनी केली.

दरम्यान, महाजनी, मोठी उमरी, गुडधी, नेहरू पार्क, तोष्णीवाल, आदर्श कॉलनी, केशव नगर, रेल्वे स्थानक परिसर, गंगा नगर, अकोट फैल, जोगळेकर प्लॉट, लोकमान्य नगर आदी भागांमध्ये पाचव्या दिवशी पाणीपुरवठा होणार आहे. तर मलकापूर, शिवापूर, खडकी, शिवर, न्यू तापडिया नगर, हिंगणा, सोमठाणा, गीता नगर, अयोध्या नगर, गजानन नगर, आश्रय नगर, डाबकीसह अनेक हद्दवाढ भागांत सहाव्या दिवशी पाणी मिळणार असल्याने नागरिकांना टँकर आणि खासगी पाण्यावर अवलंबून राहावे लागत आहे.

वादळ, पाऊस किंवा वीजपुरवठा खंडित झाल्यास महान जलशुद्धीकरण केंद्र बंद पडते आणि संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत होतो. एखादा व्हॉल्व्ह बंद पडल्यास दुरुस्तीपर्यंत नागरिकांना अतिरिक्त दिवस पाण्याविना राहावे लागते. त्यामुळे आपण महानगरपालिकेच्या हद्दीत राहतो की एखाद्या दुर्लक्षित गावात, असा प्रश्न नागरिक उपस्थित करू लागल्याचेही देव यांनी नमूद केले.

अकोलेकरांना भाषण नको, तर रोज नळाला पाणी हवे आहे. पाणी हा नागरिकांचा अधिकार आहे, उपकार नाहीत. प्रशासन आणि सत्ताधारी अपयशी ठरत असतील तर वंचित बहुजन आघाडी नागरिकांच्या हक्कासाठी तीव्र जनआंदोलन उभारेल, असा इशाराही निलेश देव यांनी दिला.

# आकोट बाजार समितीच्या सभापतीपदी धिरज हिंगणकर बिनविरोध

## ▶▶ सहकार परिवाराच्या निर्णयावर शिक्कामोर्तब
## ▶▶ शेतकरी हिताला प्राधान्य देण्याची ग्वाही

■ प्रतिनिधी | अकोट ■



आकोट कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी सहकार परिवाराचे युवा नेते धिरज रमेशराव हिंगणकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीमुळे तालुक्यातील सहकार व शेतकरी वर्तुळात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

तीन वर्षांपूर्वी झालेल्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत सहकार परिवाराच्या पॅनेलने सर्व जागांवर मोठ्या मताधिक्याने विजय मिळवून आपले वर्चस्व कायम राखले होते. त्यावेळी सहकार परिवाराच्या कोअर कमिटीने अडीच-अडीच वर्षांच्या कालावधीसाठी प्रशांत पाचडे व धिरज हिंगणकर यांची सभापतीपदासाठी निवड निश्चित केली होती. त्यानुसार माजी सभापती प्रशांत पाचडे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या पदासाठी १४ मे रोजी बाजार समिती कार्यालयात निवड प्रक्रिया पार पडली. या निवड प्रक्रियेत धिरज हिंगणकर यांच्या नावावर सर्व संचालकांचे एकमत झाल्याने त्यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहाय्यक निबंधक रोहिणी विटणकर यांनी काम पाहिले, तर बाजार समितीचे सचिव राजकुमार माळवे यांनी सहकार्य केले. या बैठकीला माजी सभापती प्रशांत पाचडे, उपसभापती अतुल खोटरे, विजय राहाणे, रमेश वानखडे, गजाननराव डाफे, रितेश अग्रवाल, कुलदीप वसू, बाबाराव इंगळे, अविनाश जायले, श्रीकांत सपकाळ, सुनिल गावंडे, शंकरराव लोखंडे, श्याम पाटील तरोडे, प्रमोद खंडारे, सौ. अंजलीताई सोनोने, अजमल खान, सौ. अरुणाताई आतकड आदी उपस्थित होते.

### नवनिर्वाचित सभापतींचा सत्कार

निवडीनंतर सहकार परिवाराच्या वतीने धिरज हिंगणकर यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहकार परिवाराचे अध्यक्ष नानासाहेब हिंगणकर होते. जिल्हा सहकारी बँकेचे संचालक ललित बहाळे, जावेद पटेल, खरेदी-विक्री संघाचे प्रभारी अध्यक्ष शेषराव पाटील वसू, आकोट सहकारी जिनिंगचे अध्यक्ष सुभाषराव वानखडे यांच्यासह विविध संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी शाल व श्रीफळ देऊन त्यांचा गौरव केला. यावेळी माजी नगराध्यक्ष पुरुषोत्तम चौखंडे, रामविलास अग्रवाल, दयाराम पाटील धुमाळे आदींनी सहकार परिवाराच्या कार्याचा गौरव करत नवनिर्वाचित सभापतींना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे संचालन शंकरराव लोखंडे यांनी केले. विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी, संचालक, ग्रामपंचायत प्रतिनिधी, सहकार कार्यकर्ते व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**'शेतकरी हितसंवर्धनाला सर्वोच्च प्राधान्य'**

*'कृषी उत्पन्न बाजार समिती ही शेतकरी आणि सर्वसामान्यांची संस्था आहे. या संस्थेला अनेक दिग्गज सहकार नेत्यांचे नेतृत्व लाभले असून त्यांचा वारसा पुढे नेण्याची जबाबदारी माझ्यावर आली आहे. बाजार समितीच्या कारभारात अधिक पारदर्शकता आणून शेतकरी हिताला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल. शेतमाल खरेदी-विक्रीसाठी आवश्यक आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणार,' अशी ग्वाही नवनिर्वाचित सभापती धिरज हिंगणकर यांनी दिली.*

# विद्यार्थ्यांनी संभाजी महाराजांचा आदर्श समोर ठेवून कार्य करावे : डॉ. प्रविण लोखंडे

## छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहात साजरी



■ प्रतिनिधी | अकोला ■

स्नेहनगर परिसरातील आनंद आश्रमजवळील गुडधी रोड येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य, पराक्रम व साहित्यिक कार्याची प्रेरणादायी माहिती देण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रादेशिक उपसंचालक सहकारी संस्था डॉ. प्रविण लोखंडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी बोलताना त्यांनी छत्रपती संभाजी महाराजांचा गौरवशाली इतिहास, स्वराज्य रक्षणासाठी दिलेले योगदान तसेच त्यांची साहित्य निर्मिती याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी संभाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून शिक्षणासोबतच समाजासाठीही कार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी मुख्याध्यापक पंढरी सुरळकर व मुख्याध्यापक दिलीपराव बंगाळे यांनीही मनोगत व्यक्त केले. संभाजी महाराजांनी स्वराज्याच्या रक्षणासाठी दिलेला लढा आणि इतिहास वाचनाचे महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले.कार्यक्रमाला राखोंडे, आनंद आश्रमाच्या संचालिका आ. दिदी, गणेशराव तायडे यांच्यासह परिसरातील मार्गदर्शक मंडळी, युवा वर्ग आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. संपूर्ण परिसर देशभक्तीपर वातावरणाने भारावून गेला होता.

# हरित लोक चळवळ घडवत आहे पर्यावरणात सकारात्मक बदल

■ प्रतिनिधी | अकोला ■

एका आगळ्यावेगळ्या प्रकारच्या लष्करी शिस्तीचा हरित उठाव सुरु आहे या अनोख्या उपक्रमाचा गवगवा पाहायला मिळतोय. जिल्ह्यातील तरुण आमदार सुहास बाबर यांच्या पुढाकारातून या हरित क्रांतीचं नेतृत्त्व पाहायला मिळत आहे. आडनिड्या ठिकाणी वाढलेलं पिंपळाचं झाड, तोडू नये त्याऐवजी त्याची पुनर्स्थापना करावी म्हणून सुरु झालेला प्रवास आता हजारो सांगलीकरांचा सहभाग असलेल्या ट्री आर्मीपर्यंत येऊन ठेपला आहे असं आमदार सुहास बाबर यांनी सांगितलं.दिवंगत आमदार अनिलभाऊ बाबर हे मातीशी घट्ट नाळ जोडलेले पश्चिम महाराष्ट्रातील नेते होते. सांगली ग्रामीण भागातील टेंभू योजनेचे जनक असा त्यांचा सार्थ उल्लेख केला जातो. त्यांच्या पश्चात त्यांचा राजकीय वारसा मिळालेल्या सुहास बाबर यांनी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत ७८१७८ इतके मताधिक्य घेतले तेव्हाच त्यांनी ठरवले की आमदारकीच्या काळात मताधिक्या एवढे वृक्ष मतदारसंघात लावावेत.

# १०० टक्के घरकुल पूर्णत्वाची राज्यात दखल

## बेलुराच्या सरपंच दिपीका मंगळे यांचा मुख्यमंत्रींच्या हस्ते गौरव

■ प्रतिनिधी | अकोट ■



अकोट तालुक्यातील आदर्श बेलुरा गावाच्या विकासासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सरपंच सौ. दिपीका राम मंगळे यांचा राज्यस्तरावर गौरव करण्यात आला. सातारा येथे आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते त्यांना सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले.

गावामध्ये १०० टक्के घरकुल मंजुरी मिळवून देणे आणि सर्व घरकुलांचे बांधकाम पूर्णत्वास नेण्याची उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल सरपंच दिपीका मंगळे व त्यांच्या पतींचा 'प्रथम पुरस्कार' देऊन गौरव करण्यात आला. या यशामुळे बेलुरा गावाचे नाव राज्यभरात अभिमानाने उज्ज्वल झाले आहे.

सरपंच दिपीका मंगळे यांच्या नेतृत्वाखाली बेलुरा गावात विकासकामांना गती मिळाली असून, विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्यांच्या कार्यपद्धतीमुळे ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण असून, गावाच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळाल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. या राज्यस्तरीय सन्मानामुळे बेलुरा गावासह अकोट तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, विविध स्तरांतून सरपंच दिपीका मंगळे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# जिल्ह्यात कापूस बियाणे विक्रीचा शुभारंभ

**अकोला :** खरीप हंगामासाठी जिल्ह्यात कापूस बियाणे विक्रीचा शुभारंभ खासदार अनुप धोत्रे, जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या उपस्थितीत आज झाला. येथील ॲग्रो असोशिएटस् येथे शासकीय नियमानुसार कापूस बियाणे विक्रीचा शुभारंभ झाला. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी मुरली इंगळे, कृषी विकास अधिकारी तुषार जाधव, डॉ. जाधव, प्रविण भोर, सतिश दांडगे, सुधाकर खंदारे, संजय गाढे यांच्यासह अधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

# आजपासून तीन दिवस विदर्भस्तरीय खंजेरी भजन- पोवाडा महोत्सव

■ प्रतिनिधी | अकोला ■

**उद्धवसेनेचे घुसरमध्ये आयोजन; संतपरंपरा आणि शिवचरित्राचा संगम अनुभवण्याची संधी**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने अकोला तालुक्यातील घुसर येथे १६ मेपासून तीन दिवसीय विदर्भस्तरीय खंजेरी भजन व पोवाडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा जागर आणि शिवकालीन इतिहासाचे स्मरण घडविणारा हा सांस्कृतिक महोत्सव भजनप्रेमींसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार आहे. सायंकाळी ५ ते रात्री ११ वाजेदरम्यान पार पडणाऱ्या या स्पर्धेत विदर्भातील विविध जिल्ह्यांतील भजन मंडळांचा सहभाग राहणार आहे. ग्रामीण संस्कृती, संतपरंपरा आणि शिवचरित्राचा संगम अनुभवण्याची संधी या निमित्ताने नागरिकांना मिळणार आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक मंडळाला पाच भजने सादर करणे बंधनकारक ठेवण्यात आले आहे. त्यामध्ये संत तुकडोजी महाराजांची चार भजने आणि छत्रपती शिवाजी महाराजांवरील एक गीत अथवा पोवाडा सादर करावा लागणार आहे.

महिला गटासाठी स्वतंत्र व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले असून, बालगट आणि वैयक्तिक गटांनाही प्रोत्साहनपर बक्षिसे दिली जाणार आहेत. त्यामुळे विविध वयोगटांतील कलाकारांना आपल्या कलेचे सादरीकरण करण्याची संधी मिळणार आहे.स्पर्धेतील उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या मंडळांना तब्बल १३ क्रमांकांपर्यंत आकर्षक रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत. या महोत्सवाचे उद्घाटन उद्धवसेनेचे नेते, खासदार तथा माजी केंद्रीय मंत्री अरविंद सावंत यांच्या हस्ते १६ मे रोजी सायंकाळी होणार आहे. या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन पक्षाचे उपनेते तथा आमदार नितीन देशमुख, जिल्हाप्रमुख गोपाल दातकर आणि मुकेश मुरूमकार यांनी केले आहे.


## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

जावक क्रमांक/१३६९/२०२६/ दि. १५/०५/२०२६

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम सन १९५० यांचे कलम - २२/ सन २०२५ चा अर्ज क्र.३४६/२०२५ कलम- २२

**सार्वजनिक न्यास :** श्री. दिगंबर जैन सैतवाल सेवा संघ, अकोला. ता. जि. अकोला. एफ ३९६६

**अर्जदार :-** १. श्री. अरविंद भाष्करराव आगरकर रा. कलेक्टर कॉलनी, अकोला, यांनी कलम - २२ अन्वये केलेला अर्ज याने यांच्या संबंधात कलम २२/अन्वये भरलेला नमुना श्री /सौ----- कलम अन्वये केलेला अर्ज

ज्याअर्थी खाली सही करणार याजकडून वरी सार्वजनिक विश्वस्तव्यावस्थे संबंधात कलम २२ अन्वये नोंद दाखल करण्यासाठी चौकशी करण्यांत येणार आहे.

ज्याअर्थी तुम्हास ही नोटिस देण्यांत येत आहे आणि फर्मविण्यात येत आहे की, तुम्ही प्रत्यक्ष किंवा मान्यता दिलेल्या प्रतिनिधी मार्फत किंवा योग्य रीतीने सूचना दिलेल्या वकिलामार्फत खाली सही करणार यांचेसमोर वर दिलेल्या पत्त्यावर तारीख १९ माहे ०५ सन २०२६ रोजी सकाळी/दुमारि ११ वाजता वरील बाबींचा अखेरचा निकाल करण्यासाठी ठरविलेल्या सुनावणीस हजर रहावे आणि चौकशी संबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रशनांची उत्तरे द्यावीत आणि त्या संबंधीचा तोंडी व दस्तऐवजाच्या रुपातील सर्व पुरावा सादर करावा.

वर निर्दिष्ट केलेल्या जागी व वेळी हजर राहण्यात तुम्ही कसूर केल्यास तुमच्या गैरहजेरीत सदरहु चौकशी होईल. तिचे कामकाज चालविण्यात येईल आणि तिचा निकाल करण्यात येईल अशी तुम्हास नोटिस देण्यात येत आहे.

आज दिनांक १५ माहे ०५ सन २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व मा.धर्मादाय उप आयुक्त अकोला यांच्या शिक्कयानिशी दिली.

शिक्का

**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला

१. श्री. रविंद्र शांतारामजी उन्होने रा.उदय नगर, जैन मंदीरा जवळ, अकोला.
२.श्री.पदमाकर हिराचंदजी फुलंबरकर, रा. खेडकर नगर, अकोला.
३. श्री. मोतीलालजी विठठलराव डोळसकर, रा. जैन मंदीराजवळ, बाळापुर, ता. बाळापुर, जि. अकोला.
४. श्री. देविदास नारायणराव महाजन रा. हिवरखेड ता. तेल्हारा, जि. अकोला.
५. सौ. प्रेमलताबाई जिनेंद्र मसाळकर.रा.रॉयल रेसीडेन्सी, सातव चौक,अकोला.
६. सौ. संध्याताई किरणराव टोपरे.रा.रॉयल रेसीडेन्सी, सातव चौक, अकोला.
७. श्री. चंद्रकांत पंडितराव बुलनकर.रा.भारत विदयालय जवळ,अकोला.
८.श्री.विश्वासराव मोतीरामजी पोहरे.रा.रेल्वे क्वार्टर जवळ. अकोला.
९. श्री. अरुणकुमार मोहनलालजी बारस्कर.रा.रामदास पेठ.अकोला.
१०. श्री. केशवराव देकवदासजी इंदाने. रा.न्यु. भागवत प्लॉट. अकोला.
११. सौ.सुनिता प्रदिपकुमार फुरसुले.रा.प्रसाद कॉलनी, जठारपेठ, अकोला.
१२. व्रत्तपत्राकरीता



जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १६०**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com



## Change In Name

I Have Change My Name before Marriage From
**JAMUNA ONKARDAS RATHI**
-- TO --
After Marriage
**SONAL SARVESH KELA**
My Residential Address - Block B Tirumala Hights Vijay Housing society Akola Maharashtra 444001.

## Change In Name

I have changed my name from
**Samihan Dhiraj Deshmukh**
-To-
**Sammihan Dhiraj Deshmukh**
Passport No-AA071521
Address : F-1 Radha Govind Apt.Chaitanya Soc.Gorakshan Road Akola 444004 Maharashtra ,India.

## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :- ४३/२०२६ कलम १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक-** सुन्नी फैजाने गरीब नवाज अरबी मदरसा चॅरिटेबल ट्रस्ट, शिवणी, अकोला, ता. जि. अकोला

**अर्जदार :-** जावेद अली खान मोहसीन अली खान रा. एकता चौक, शिवणी, अकोला ता.जि. अकोला

संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहायक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकाला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ / १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

(१ )वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ? (अ) जंगम मिळकत (वर्णन) :- रोख रक्कम रु. ११००/- रसूल ख्वा दाउद ख्वा यांचे ताब्यात आहे. (आ) स्थावर मिळकत (वर्णन) :- निरंक

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकाला. १ यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक-०८/०५/२०२६ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला

## जाहीर नोटीस

**वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७३८/२०२६ — प्रोसेस नं.६३५४/२०२६
चौ.ता. १९/०६/२०२६ — दिनांक : ०५/०५/२०२६

**अर्जदार :** १. विजय पांडुरंग भगत रा. नांदुरा रोड, बालाजी कॉटन मिल्स, खामगाव, जि. बुलढाणा. २. गणेश पांडुरंग भगत रा. देशमुखपुरा, वार्ड नं. ११, जुने शहर, तेल्हारा, ता. तेल्हारा, जि. अकोला. ३. दिलीप पांडुरंग भगत रा. अकोली जहांगिर, ता. जि. अकोला. ४. सौ. मंगला गणेश गवारे रा. मारोती मंदिराजवळ, व्दारका चौक, अंजनगाव सुर्जी, ता. अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : पांडुरंग नारायण भगत
**पत्ता :-** रा. खडकी बु, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत पांडुरंग नारायण भगत यांचे दि.२०/०८/२००४ रोजी खडकी बु, अकोला. ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १९/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/०५/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :- ५३/२०२६ कलम १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :** तथागत सद् धम चॅरिटेबल ट्रस्ट, भरतपूर ता. बाळापुर जि. अकोला

**अर्जदार :-** श्री. शत्रुघ्न सीताराम खंडारे मु. भरतपूर पो. माझोड ता. बाळापुर जि. अकोला

संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहायक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

(१ )वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

(अ) जंगम मिळकत (वर्णन) :- रोख रक्कम रु.५००/- श्री. शत्रुघ्न सीताराम खंडारे यांचे ताब्यात आहे. (आ) स्थावर मिळकत (वर्णन) : निरंक

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकाला. १ यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक-०८/०५/२०२६ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला

## अकोला महानगरपालिका, अकोला
## पाणी पुरवठा विभाग

**निविदा सुचना क्र. ०६ सन २०२६-२७**

अकोला महानगरपालिका, पाणी पुरवठा विभाग, अकोला मनपा निधी अंतर्गत दि. १६/५/२६ रोजी निविदा महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असुन या कामासंबंधीत सविस्तर तपशिल खालील नमुद संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(संपर्क- ७७०९०४९३५१)
संकेतस्थळ : www.amcakola.in

**कार्यकारी अभियंता**
पाणी पुरवठा विभाग
अकोला महानगर पालिका, अकोला

जा.क्र./ अमनपा/पापू/८५/२०२६,
पाणी पुरवठा विभाग
अकोला महानगरपालिका, अकोला दिनांक : १५/०५/२०२६

# कावळ्यांच्या घरट्यांत दडायचा पावसाचा अंदाज

## निसर्गाची भाषा ओळखणारा शेतकरी आता हवामान खात्याच्या 'अलर्ट'वर

**मोझरी (शेकापूर)/जनमाध्यम**



एकेकाळी गावाकडच्या शेतकऱ्याला पावसाचा अंदाज सांगण्यासाठी ना मोबाईल लागत होता, ना हवामान खात्याचे ॲप! झाडावर घरटे बांधणारा कावळा, आकाशातील ढग, वाऱ्याची दिशा आणि पक्ष्यांची हालचाल हेच त्याचे 'हवामान खाते' होते. कावळ्यांच्या घरट्यांवरून पावसाचा वेध घेणारी ती पारंपरिक संस्कृती आता विज्ञान आणि यांत्रिकीकरणाच्या युगात मागे पडत असली, तरी ग्रामीण भागातील वयोवृद्धांच्या आठवणीत आजही ती जिवंत आहे.

पूर्वी चैत्र महिना संपला की गावातील ज्येष्ठ नागरिक आणि पिढीजात शेती करणारे शेतकरी झाडांवरील कावळ्यांच्या घरट्यांचे निरीक्षण करायला सुरुवात करायचे. रोहिणी नक्षत्र सुरू होताच कावळे घरटी बांधण्याच्या तयारीला लागत. त्या घरट्यांच्या जागेवरूनच येणाऱ्या पावसाचा अंदाज बांधला जायचा.कावळ्याने झाडाच्या अगदी उंच टोकावर घरटे बांधले, तर कमी पाऊस पडणार, असा समज होता. कारण वादळी वारे आणि मुसळधार पावसापासून बचावासाठी कावळे उंचावर घरटे बांधतात, असे म्हटले जायचे. उलट झाडाच्या खालच्या बाजूला किंवा पसरट फांद्यांवर घरटे दिसले, तर त्या वर्षी चांगला आणि भरपूर पाऊस पडेल, असा अंदाज गावोगावी व्यक्त केला जायचा.फक्त घरट्यांवरूनच नव्हे, तर कावळ्यांच्या वर्तनावरूनही पावसाचे संकेत ओळखले जात. कावळे धुळीत किंवा मातीत पंख पसरून लोळत असतील, तर पाऊस जवळ आलाय, असे समजले जाई. तर सतत विशिष्ट आवाजात ओरडत असतील, तर पाऊस लांबणीवर पडण्याची शक्यता वर्तवली जात असे.ग्रामीण भागातील वयोवृद्ध सांगतात की, कावळ्यांचे घरटे जर खूप मजबूत आणि घट्ट बांधलेले असेल, तर मुसळधार पावसाचा अंदाज मानला जायचा. कारण पक्षांना निसर्गातील बदल आधीच जाणवतात, असा पिढ्यान?पिढ्यांचा अनुभव आहे. अनेकदा हे अंदाज खरेही ठरले असल्याचा दावा शेतकरी आजही करतात.

### मात्र काळ बदलला... विज्ञान पुढे गेले...

आणि निसर्गाच्या भाषेची जागा आता मोबाईलवरील 'हवामान अपडेट'ने घेतली!
आज हवामान विभाग उपग्रह, रडार आणि आधुनिक यंत्रणांच्या सहाय्याने पावसाचा अचूक अंदाज वर्तवत आहे. पेरणी, फवारणी, खत व्यवस्थापन यासाठी शेतकरी आता हवामान खात्याच्या सूचनांवर अवलंबून राहत आहे. विशेष म्हणजे अनेक वेळा हवामान खात्याचे अंदाज खरे ठरत असल्याने शेतकऱ्यांचा त्यावरील विश्वास वाढला आहे. तरीही गावातील जुनी पिढी आजही म्हणते निसर्ग कधी खोटं बोलत नाही, कावळ्यांच्या घरट्यांतून, पक्ष्यांच्या किलबिलाटातून आणि वाऱ्याच्या झुळुकीतून पावसाचा वेध घेणारी ती संस्कृती आज हरवत चालली असली, तरी त्या आठवणी अजूनही शेतकऱ्यांच्या मनात जिवंत आहेत. कारण... एकेकाळी शेतकऱ्याचा खरा हवामान तज्ज्ञ हा निसर्गच होता.

---

विदर्भातील ५५० कि.मी.च्या चार महामार्गांना पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मंजुरी

# द्रुतगती महामार्ग प्रकल्पांची कामे वेळेत पूर्ण करा-मुख्यमंत्री

**मुंबई/जनमाध्यम**

महाराष्ट्राची पूर्व व पश्चिम सीमा शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गाने जोडण्यासाठी विदर्भातील ५४७ कि.मी.च्या चार प्रवेश द्रुतगती महामार्ग प्रकल्पांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत प्रशासकीय मंजुरी देण्यात आली. हे प्रकल्प जलदगतीने व वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात पायाभूत सुविधा समितीची बैठक झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड, सचिव (बांधकामे) आबासाहेब नागरगोजे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. अपर मुख्य सचिव म्हैसकर यांनी यावेळी सादरीकरणाद्वारे प्रकल्पांची माहिती दिली.

महाराष्ट्राचे पूर्व व पश्चिम क्षेत्र जोडणारे आणि विदर्भातील विकासात महत्त्वाचे पाऊल ठरणाऱ्या या प्रकल्पांची पुढील कार्यवाही जलदगतीने करून प्रकल्प वेळेत होईल यावर भर द्यावा. नवेगाव मोर ते सुरजागड हा मार्ग खनिज वाहतुकीसाठी महत्त्वाचा ठरणार आहे. हा मार्ग समृद्धी महामार्गाला जोडण्यात यावा, अशी सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केली. तसेच पश्चिम महाराष्ट्र ते कोकणाला जोडणाऱ्या टनेल रस्त्यासंदर्भात अभ्यास करून सादरीकरण करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले. नागपूर – गोंदिया प्रवेश नियंत्रित द्रुतगती मार्ग, भंडारा गडचिरोली द्रुतगती मार्ग, नागपूर-चंद्रपूर द्रुतगती मार्ग आणि नवेगाव मोरे- कोनसारी ते सुरजागड ग्रीन फिल्ड रस्ता या प्रवेश नियंत्रित शिघ्रसंचार द्रुतगती महामार्ग प्रकल्पांना यावेळी मान्यता देण्यात आली. या चारही प्रकल्पांची स्थापत्य किंमत ३२४७८ कोटी व एकूण बांधकाम किंमत ५१९०६.३५ कोटी रुपये एवढी आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत या महामार्गांचे काम केले जाणार आहे. हे सर्व प्रकल्प सप्टेंबर २०२८ ते डिसेंबर २०२८ या कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजन आहे, असे म्हैसकर यांनी सांगितले.



**प्रकल्पांची वैशिष्ट्ये**

**नागपूर – गोंदिया द्रुतगती मार्ग –**
एकूण लांबी - 162.377 कि.मी.
प्रारंभ व शेवटचा बिंदू – गवसी मानपूर, नागपूर ते सावरी, गोंदिया
लेनची संख्या – 3+3
इंटर चेंज - 9
आवश्यक भूसंपादन – 1634.27 हे.
हा महामार्ग नागपूर, भंडारा व गोंदिया या तीन जिल्ह्यांना जोडला जाणार

**भंडारा- गडचिरोली द्रुतगती मार्ग**
एकूण लांबी - 94.241 कि.मी.
प्रारंभ व शेवटचा बिंदू – बोरगाव, जि. भंडारा ते ऋणमोचन, जि. चंद्रपूर
लेनची संख्या – 3+3
इंटर चेंज - 6
आवश्यक भूसंपादन – 1185.73 हे.
हा महामार्ग भंडारा, गोंदिया, गडचिरोली या तीन जिल्ह्यांना जोडला जाणार

**नागपूर-चंद्रपूर द्रुतगती मार्ग**
एकूण लांबी – 204.799 कि.मी.
प्रारंभ व शेवटचा बिंदू – सेलडोह, जि. वर्धा ते नवेगाव मोरे (घाटकुळ),जि. चंद्रपूर
लेनची संख्या – 2+2
इंटर चेंज - 7
आवश्यक भूसंपादन – 2159.087 हे.
हा महामार्ग नागपूर व चंद्रपूर जिल्ह्यातील ९ तालुक्यांना जोडला जाणार आहे.

**नवेगाव मोरे- कोनसारी ते सुरजागड ग्रीन फिल्ड रस्ता**
एकूण लांबी – 85.765 कि.मी
प्रारंभ व शेवटचा बिंदू – नवेगाव मोरे (घाटकुळ), जि. चंद्रपूर ते मंगेर, जि. गडचिरोली
लेनची संख्या – 2+2
आवश्यक भूसंपादन – 289.02 हे.
हा महामार्ग चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील ४ तालुक्यांना जोडला जाणार आहे.

---

# लोकसहभागाची रक्कम भरूनही पांदन रस्ते रखडले

## शेतकऱ्यांच्या संयमाचा अंत; खा.अमर काळेंनी प्रशासनाला धारेवर धरले

**वर्धा/जनमाध्यम**

जिल्ह्यातील रखडलेल्या पालकमंत्री पांदन रस्ता योजनेच्या कामांबाबत प्रशासनाला जाब विचारत तात्काळ कामे पूर्ण करण्याची मागणी केली आहे. शेतकऱ्यांनी लोकसहभागातून रक्कम जमा करूनही अनेक पांदन रस्त्यांची कामे वर्षानुवर्षे अपूर्ण असल्याने ग्रामीण भागात तीव्र नाराजी पसरली आहे.

महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांच्या शेतवहीवाटीचा प्रश्न सोडवण्यासाठी पालकमंत्री पांदन रस्ता योजना सुरू केली होती. या योजनेत अतिक्रमित पांदन रस्ते मोकळे करून त्यावर मातीकाम करण्यासाठी लोकसहभागाची अट ठेवण्यात आली होती. त्यानुसार वर्धा जिल्ह्यातील अनेक गावांतील शेतकऱ्यांनी वर्गणी गोळा करून प्रशासनाकडे आवश्यक रक्कम जमा केली. मात्र, निधी भरूनही अनेक रस्त्यांची कामे आजतागायत रखडलेली असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी खासदार अमर काळे यांच्याकडे केली.या तक्रारींची गंभीर दखल



घेत खासदार काळे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाला पत्र पाठवत प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. लोकसहभागाची रक्कम जमा झाल्यानंतरही कामे होत नसतील, तर शेतकऱ्यांनी शासनावर विश्वास ठेवायचा तरी कसा असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.पूर्वी महसूल विभागाकडून प्रत्येक शेताला ३० ते ३५ फूट रुंदीचे पांदन रस्ते उपलब्ध करून देण्यात आले होते. मात्र, कालांतराने अनेकांनी या रस्त्यांवर अतिक्रमण करून ते आपल्या शेतात समाविष्ट केले. परिणामी, शेतात जाण्यासाठीचे मार्ग अरुंद झाले. पिकांची वाहतूक करणे, बैलबंडी किंवा ट्रॅक्टर नेणे कठीण झाले. अनेक गावांत शेतवहीवाटीवरून वाद वाढले आणि महसूल विभागाकडे तक्रारींचा अक्षरशः पाऊस पडू लागला.

याच पार्श्वभूमीवर शासनाने मातोश्री पांदन योजना आणि त्यानंतर पालकमंत्री पांदन रस्ता योजना आणली. अतिक्रमण हटवून रस्ते मोकळे करण्याची जबाबदारी प्रशासनावर, तर जेसीबीसाठी लागणाऱ्या डिझेलचा खर्च शेतकऱ्यांनी उचलायचा, असा या योजनेचा उद्देश होता. २०१७ पासून अनेक प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयात सादर झाले. मात्र, काही गावांत आजही कामांचा थांगपत्ता नसल्याने शेतकऱ्यांचा संताप वाढत आहे.खा.अमर काळे यांच्या हस्तक्षेपानंतर आता प्रशासन खडबडून जागे होईल आणि रखडलेली कामे मार्गी लागतील, अशी अपेक्षा जिल्ह्यातील शेतकरी व्यक्त करीत आहेत. ग्रामीण भागातील शेतवहीवाटीचा प्रश्न सोडवण्यासाठी शासनाने केवळ घोषणा न करता प्रत्यक्षात कामे पूर्ण करावीत, अशी मागणीही यानिमित्ताने जोर धरू लागली आहे.

---

# आरोग्य विभागाच्या बदल्या समुपदेशनाद्वारे, वेळापत्रक जाहीर

**वर्धा/जनमाध्यम**

सार्वजनिक आरोग्य विभागातील गट-ब, गट-क आणि गट-ड कर्मचाऱ्याच्या सर्वसाधारण बदल्यांसाठी समुपदेशन प्रक्रियेला गती देत स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करून वेळापत्रक जाहीर केले आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णय १५ एप्रिल २०२६ नुसार समुपदेशताद्वारे सर्वसाधारण बदल्या करण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली असून, त्याअनुषंगाने संचालक, आरोग्य सेवा यांनी ८ परिमंडळातील सर्व कार्यक्रम प्रमुख यांच्या बदल्यांचे टप्प्याटप्प्याने वेळापत्रक जाहीर केले आहे. जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार रिक्त पदांची यादी ६ मे २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानंतर बदलीपात्र कर्मचाऱ्यांची सेवा ज्येष्ठता यादी ८ मे २०२६ रोजी प्रसिद्ध केली गेली. तसेच, प्रपत्र १ ते ५ तयार करून नागरी सेवा मंडळासमोर १० मे २०२६ रोजी सादर करण्यात आली. नागरी सेवा मंडळाकडून समुपदेशनाने बदलीचे अंतिम प्रस्ताव १५ मे २०२६ पर्यंत पाठविण्यात येणार आहेत. समुपदेशनाद्वारे करण्यात आलेल्या अंतिम बदल्यांचे आदेश ३१ मे रोजी वेबसाईटवर निर्गमित करण्यात येणार आहेत.या नव्या धोरणानुसार बदल्या करताना सेवा कालावधीर प्राधान्यक्रम, पसंतीक्रम, प्रशासकीय गरज तसेच दुर्गम भागातील सेवेला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. अपंग कर्मचारी, गंभीर आजारांनी ग्रस्त कर्मचारी, विधवा महिला, पती-पत्नी एकत्रीकरण आणि शैक्षणिक कारणे यांसारख्या मानवी बाबींनाही प्राधान्य देण्यात आले आहे. या बदली धोरणामुळे आरोग्य विभागातील मनुष्यबळ व्यवस्थापन अधिक पारदर्शक, गतिमान आणि परिणामकारक होण्यास मदत होणार असून आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याच्या दिशेने महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी कळविले आहे.

---

## संक्षिप्त

### सावळापूर येथे शेळ्यांसह बोकड चोरी

**आर्वी-**तालुक्यातील सावळापूर येथे अज्ञात चोरट्याने गोठ्यातील शेळ्या, बोकड व पिल्ले चोरून नेल्याची घटना उघडकीस आली. या चोरीत शेतकऱ्याचे तब्बल ५३ हजार रुपयांचे नुकसान झाले. लक्ष्मी गौतम गोंडाणे (वय ४८) यांनी सकाळी गोठ्यात पाहणी केली असता पाच शेळ्या, पाच बोकड आणि पाच पिल्ले आढळून आली नाहीत. परिसरात शोध घेतला असता जनावरे मिळून आली नाहीत. अज्ञात चोरट्याने रात्रीच्या सुमारास गोठ्यातून जनावरे लंपास केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. याप्रकरणी आर्वी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. ग्रामीण भागात वाढत्या चोरीच्या घटनांमुळे शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

### जयपूर शेतशिवारातून पाण्याची मोटार चोरी

**सेलू-**तालुक्यातील जयपूर शेतशिवारातून अज्ञात चोरट्याने पाण्याची मोटार व विद्युत वायर चोरी करून नेल्याची घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे शेतकऱ्याचे सुमारे २० हजार रुपयांचे नुकसान झाले. कान्हापूर येथील एका शेतकऱ्याच्या शेतातील विहिरीवर बसविण्यात आलेली मोटार आणि वायर रात्रीच्या सुमारास चोरीस गेली. सकाळी शेतात गेल्यानंतर मोटार व वायर दिसून न आल्याने परिसरात शोध घेण्यात आला. मात्र कोणताही मागमूस लागला नाही. याप्रकरणी सेलू पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. वाढत्या चोरीच्या घटनांमुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी होत आहे.

### कर्जाच्या विवंचनेतून शेतकऱ्याची आत्महत्या



**वर्धा-**अंतोरा येथील शेतशिवारात एका शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना उघडकीस आली. नरेश विक्रमराव माथनकर (वय ४०) रा. माणिकनगर, अंतोरा असे मृताचे नाव आहे. नापिकी आणि वाढत्या कर्जबाजारीपणामुळे ते गेल्या काही दिवसांपासून मानसिक तणावात होते. कर्जाची परतफेड कशी करावी, या विवंचनेतून त्यांनी टोकाचे पाऊल उचलल्याचे सांगितले जात आहे. शेतशिवारात त्यांचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. या घटनेमुळे गावात शोककळा पसरली असून शेतकरी वर्गात हळहळ व्यक्त होत आहे. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे. वाढत्या आर्थिक संकटामुळे शेतकरी आत्महत्यांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

---

### मोबाईल टॉवरमधील कार्ड लंपास

आर्वी - तालुक्यातील तरोडा शिवारातील मोबाईल टॉवरमधून अज्ञात चोरट्याने महत्त्वाचे इलेक्ट्रॉनिक कार्ड चोरी केल्याची घटना उघडकीस आली. या चोरीमुळे सुमारे सात हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. मोबाईल टॉवरची पाहणी करताना संबंधित कर्मचाऱ्यांना कार्ड गायब असल्याचे आढळून आले. परिसरात शोध घेऊनही साहित्य मिळून न आल्याने चोरी झाल्याचे स्पष्ट झाले. या प्रकारामुळे काही काळ नेटवर्क सेवाही विस्कळीत झाल्याची माहिती आहे. याप्रकरणी खरांगणा (मोरांगणा) पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविला असून तपास सुरू केला आहे. ग्रामीण भागातील मोबाईल टॉवरवर सुरक्षा नसल्याने अशा घटनांत वाढ होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

---

# महाज्योती'च्या गुणवंतांचे यूपीएससी निकालात 'शतक'

## ग्रामीण भागातील गुणवंत आता होणार 'आयएफएस' अधिकारी

**वर्धा/जनमाध्यम**

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्यावतीने जाहीर झालेल्या भारतीय वन सेवा परीक्षा २०२५ च्या अंतिम निकालात 'महाज्योती'कडून प्रशिक्षण व आर्थिक सहाय्य योजनेचा लाभ घेतलेल्या ८ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे, या निकालासह 'महाज्योती'ने यूपीएससीच्या विविध परीक्षांमध्ये यश मिळवणाऱ्या आपल्या विद्यार्थ्यांचा 'शंभरी'चा आकडा पार केला असून, प्रशासकीय अधिकारी घडवणारी अग्रगण्य संस्था म्हणून आपला ठसा उमटवला आहे.

राज्यातील बहुजन समाजातील, विशेषतः ग्रामीण आणि सर्वसामान्य कष्टकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना आयएएस आणि आयएफएस सारख्या सर्वोच्च पदांपर्यंत पोहोचवण्यासाठी 'महाज्योती' केंद्रबिंदू ठरत आहे. वन सेवेच्या अंतिम निवड यादीत मोहिनी अशोक जगताप (४६ रँक), रोहित तुकाराम मालावेकर (६२ रँक), रोहित संजय पवार (६९ रँक), सोहम नामदेव शेंडे (७५ रँक), अक्षय हरिभाऊ पवार (८१ रँक), प्रतिक चंद्रशेखर कुशारे (१०० रँक), दर्शन राजेंद्र सूर्यवंशी (१०२ रँक) आणि अभिषेक योगीराज कट्टे (१०७ रँक) या ८ गुणवंतांनी स्थान मिळवले आहे. हे सर्व विद्यार्थी आता भारतीय वन सेवेमध्ये (आयएफएस) अधिकारी म्हणून रुजू होणार आहेत, अशी माहिती 'महाज्योती'चे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद नारिंगे यांनी प्रसिद्धी पत्रकातून दिली. 'महाज्योती'चे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद नारिंगे यांनी या यशाचे श्रेय विद्यार्थ्यांचे कठोर परिश्रम आणि संस्थेच्या पारदर्शक प्रशिक्षण प्रणालीला दिले आहे. संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेसाठी आणि मुलाखतीच्या तयारीसाठी आर्थिक सहाय्य देण्यात आले होते.

याशिवाय अनुभवी तज्ज्ञांचे मार्गदर्शन, सराव मुलाखती आणि अद्ययावत अभ्यास साहित्यामुळे या विद्यार्थ्यांनी हे यश मिळवले आहे. 'महाज्योती'साठी यूपीएससी निकालात १०० यशस्वी बहुजन विद्यार्थ्यांची कामगिरी ही सामाजिक परिवर्तनाच्या वाटचालीतील एक मोठी क्रांती असल्याचे मिलिंद नारिंगे यांनी सांगितले आहे.

**महाज्योती' आता यशाचा 'ब्रँड' : मंत्री अतुल सावे**

यूपीएससी वन सेवा परीक्षेत 'महाज्योती'च्या ८ विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश आणि संस्थेने ओलांडलेला यशाचा ऐतिहासिक 'शतकीय' टप्पा, ही महाराष्ट्रासाठी अत्यंत अभिमानाची बाब असल्याचे मत राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण विभागाचे मंत्री तसेच 'महाज्योती'चे अध्यक्ष अतुल सावे यांनी व्यक्त केले आहे. 'महाज्योती' आता केवळ एक प्रशिक्षण संस्था उरली नसून, ती ग्रामीण भागातील गुणवंतांना प्रशासनात हक्काचे स्थान मिळवून देणारा एक सक्षम 'ब्रँड' बनली आहे, असे त्यांनी सांगितले.

---

### पिंपळा येथे पैशाच्या वादातून मारहाण

**आर्वी-**तालुक्यातील पिंपळा पुनर्वसन येथे ट्रकच्या ट्रिपच्या पैशाच्या वादातून एका इसमाला मारहाण करण्यात आल्याची घटना घडली. रामेश्वर किसनराव पाटील यांना आरोपी बाबाराव लांजेवार यांनी मारहाण केल्याची तक्रार आहे. ट्रिपचे पैसे कमी दिल्याचा आरोप करत आरोपीने शिवीगाळ केली तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. या मारहाणीत रामेश्वर पाटील जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार करण्यात आले. घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. याप्रकरणी आर्वी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. तक्रारीवरून बाबाराव लांजेवार यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिस पुढील तपास करीत आहेत. पैशाच्या व्यवहारातून वाढणाऱ्या वादांमुळे ग्रामीण भागात चिंता व्यक्त होत आहे.

---

# काळाच्या ट्रकने चिरडले पूर्वाचें बालपण

## डोळ्यांसमोर आई-बाबांचा मृत्यू; चार वर्षांची चिमुरडी झाली पोरकी

**हिंगणघाट/जनमाध्यम**

आई उठ ना... बाबा मला घरी जायचेंय...रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या आई-वडिलांकडे पाहत चार वर्षांची पूर्वा आक्रोश करत होती. पण तिच्या हाका ऐकण्यासाठी तिचे आई-बाबा आता या जगात उरले नव्हते. हिंगणघाटमध्ये घडलेल्या भीषण अपघाताने एका निष्पाप चिमुरडीचे संपूर्ण बालपण काळाने निर्दयीपणे हिरावून नेले.

११ मेच्या रात्री वरोरा येथील नातेवाईकांच्या लग्नाहून यादवराव सलाम (वय ३५), पत्नी विद्या सलाम (वय २७) आणि चार वर्षांची मुलगी पूर्वा हे स्कुटीने हिंगणघाटकडे परत येत होते. कुटीर रुग्णालयाजवळील पुलावर वळत असतानाच नागपूरहून हैदराबादकडे जाणाऱ्या भरधाव ट्रकने त्यांच्या दुचाकीला जबर धडक दिली. या भीषण धडकेत यादवराव आणि विद्या ट्रकच्या मागील चाकाखाली आल्याने जागीच ठार झाले, तर चिमुकली पूर्वा दूर फेकल्या गेली.रक्तबंबाळ अवस्थेत रस्त्यावर पडलेल्या आई-वडिलांना पाहून पूर्वा भीतीने थरथरत होती. अपघातानंतर परिसरात एकच आक्रोश उसळला. नागरिकांनी धाव घेत जखमी पूर्वाला तातडीने सेवाग्राम रुग्णालयात दाखल केले. उपचारानंतर तिला सुट्टी मिळाली असली तरी तिच्या आयुष्यातील सर्वात मोठी जखम मात्र कधीही भरून निघणार नाही.पूर्वाला जेव्हा आई-वडिलांच्या अंत्यसंस्कारासाठी घरी आणण्यात आले, तेव्हा तिच्या चेहऱ्यावर केवळ भीती, गोंधळ आणि हरवल्याची भावना होती. स्वतःच्या आई-वडिलांचे पार्थिव समोर ठेवून होणारे अंतिम संस्कार ती मुकपणे पाहत होती. काय घडलंय हे समजण्याचंही तिचे वय नाही, पण आई आता बोलत नाही आणि बाबा आता जवळ घेत नाहीत हे वास्तव तिच्या निरागस मनाला अस्वस्थ करत होतें.

इंदिरा गांधी वॉर्डातील सलाम कुटुंबावर या घटनेने दुःखाचा डोंगर कोसळला आहे. वृद्ध आईसमोर तरुण मुलगा आणि सून काळाने हिरावून नेली. आता त्यांच्या पदरात उरली आहे ती फक्त चार वर्षांची पूर्वा आणि तिचं उद्धवस्त झालेलें बालपण.घरात अजूनही पूर्वाची नजर दाराकडे लागलेली असते. प्रत्येक आवाजाला ती दचकून विचारते, बाबा आले का पण त्या प्रश्नाचं उत्तर देताना कुटुंबीयांचे डोळे पाणावतात.एका भरधाव ट्रकने



त्या रात्री फक्त दोन जीव घेतले नाहीत. तर एका निष्पाप चिमुरडीच्या आयुष्यातील आई आणि बाबा हे दोन आधार कायमचे हिरावून नेले.

---

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १६८**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

## संक्षिप्त

### पोदारच्या मनीषा संगार यांना सर्वोत्कृष्ट मुख्याध्यापिका पुरस्कार



**अमरावती-**पोदार इंटरनॅशनल स्कूल, कथोरा, अमरावती, ही एक नामांकित शैक्षणिक संस्था असून, ती नाविन्यपूर्ण उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी असलेल्या आपल्या वचनबद्धतेमुळे या परिसरात सुप्रसिद्ध आहे. परिणामी, ही शाळा सातत्याने नवनवीन टप्पे गाठत आहे. याच संदर्भात, पोदारच्या प्राचार्या, मनीषा संगार यांना मुंबईच्या होमी भाभा फाऊंडेशनतर्फे 'सर्वोत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार त्यांच्या नाविन्यपूर्ण उपक्रमांसाठी आणि विद्यार्थी-स्नेही कार्यांसाठी देण्यात आला. विशेष म्हणजे, मनीषा संगार यांना यापूर्वीही राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. या यशाबद्दल प्राचार्या संगार यांच्यावर शहरातील प्रतिष्ठित नागरिकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पोदार एज्युकेशन नेटवर्कचे महाव्यवस्थापक अमन तामार्डे, भूषण पाथे, डॉ. आशिष भेटलू, अपर्णा शेळके, डॉ. आशिष खुळे, शक्तीस्वरूप गुप्ता, सोनाली गवई, विजेता वानखेडे, रोशनी लोणकर, सारिका साळपे आणि पोदारच्या शिक्षकवृंदाचे त्यांच्या या यशाबद्दल अभिनंदन करण्यात आले.

### सई मोकलकर हिचे यश

**अमरावती-**नुकत्याच जाहीर झालेल्या माध्यमिक शालांत परीक्षेच्या निकालात नवसारी प्रभागातील विलास कॉलनी येथे राहणारी व होली क्रॉस इंग्रजी कॉन्व्हेंट ची विद्यार्थिनी सई रीता सतीश मोकलकर हिने ९९.६० टक्के गुण मिळवत प्रथम येण्याचा मान पटकावला आहे. तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरातून तिचे अभिनंदन करण्यात येत आहे.या यशानिमित्त अमरावती महानगरपालिकेचे महापौर श्रीचंद तेजवानी यांच्या हस्ते सईचा सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांनी सईला पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देत उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरणादायी संदेश दिला.सई ही भारतीय जनता पार्टीच्या उपाध्यक्षा तसेच माजी नगरसेविका रिता मोकलकर यांची कन्या आहे. सईला दहावीच्या अभ्यासासाठी तिचे वडील व एस. बी. कोचिंग क्लासेसचे संचालक सतिश मोकलकर तसेच काका भरत मोकलकर यांचे मार्गदर्शन लाभले.सईला भविष्यात आयआयटी इंजिनिअर बनून देशसेवा करण्याची इच्छा आहे. तिला पुस्तके वाचनाची विशेष आवड आहे. यावेळी नगरसेवक संजय तिरथकर, मंगेश खोंडे तसेच माजी नगरसेविका रिता मोकलकर उपस्थित होते.




### गुणवंत विद्यार्थी बिलाल अदिबचा सत्कार

**वलगाव-**येथील हाजी अब्दुल रजाक यांचा नातू तथा इम्तियाज अहमद यांचा पुत्र बिलाल अदीब ने ब्रिजलाल बियानी विज्ञान महाविद्यालय अमरावती मधून बारावी विज्ञान शाखेतून उत्तीर्ण होऊन ९५.१७ टक्के गुण प्राप्त करून घवघवीत यश संपादन केले. या गुणवंत विद्यार्थ्यांचा सामाजिक एकता व विकास परिषदेचे सचिव तथा सचिव महाराष्ट्र शासन पुरस्कृत समाज भूषण कय्यूम शाह आयुब शाह यांनी बिलाल याच्या हबीबनगर निवासस्थानी जाऊन परिषदेच्या वतीने सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



### अरविंद देशमुख यांच्या जयंतीनिमित्त ग्राहकांचा सत्कार

**तिवसा-**अरविंदबाबू देशमुख यांच्या जयंतीनिमित्ताने त्यांना अभिवादन करण्यासाठी अरविंद सहकारी बँकेच्या अमरावती शाखेत सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी बँकेचे पालक संचालक प्रकाश मक्रमपुरे हे होते. या कार्यक्रमाला अमरावती वकील संघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष ॲड. प्रशांत देशमुख, महानगरपालिकेचे नवनिर्वाचित नगरसेवक अनिल अग्रवाल, भोजराज काळे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे निमित्त साधून बँकेच्या दोन उत्कृष्ट ग्राहकांचा सत्कार करण्यात आला. यात अनिल अग्रवाल, डॉ.विक्रम वसु व कल्याणी वसु व सुरेंद्र चोरडिया यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. मिलिंद पाटील यांनी दिली. कार्यक्रमाचे संचालन अश्विनी देशमुख, आभार प्रदर्शन अक्षय जुनघरे यांनी केले. यवस्थापक सागर बोपले व सर्व कर्मचाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.



### शेतकऱ्याची लेक युक्ती भोगे जिल्ह्यातून प्रथम

**वलगाव-**प्रतिभेला परिस्थितीची मर्यादा नसते हे पुन्हा एकदा सिद्ध करत वलगाव येथील शेतकरी अविनाश भोगे यांची कन्या युक्ती वंदना अविनाश भोगे हिने इयत्ता १०वी च्या परिक्षेत अमरावती जिल्ह्यातून प्रथम येण्याचा मान पटकावल्या बद्दल शारदा नारायण कृषी विज्ञान मंडळाचे राजेंद्र जोशी, गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंजचे जीवन प्रचारक गजानन कडू, महाराष्ट्र शासन पुरस्कृत समाज भूषण शाह कय्युम शाह,नंबर वन न्यूज चैनलचे संचालक,नितीन पाटील मुळे यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन युक्ति हिचा पुष्पगुच्छ देऊन तिला पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या, तर आई वडिलांचा शाल,श्रीफळ देऊन सन्मान केला. वलगावच्या शैक्षणिक क्षेत्रात नावलौकिकाला भर टाकणाऱ्या ह्या कृषी कन्येवर सर्वत्र स्तरावरून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# ओपन स्पेसवर बांधलेली जनावरे जप्त

## आयुक्त वर्षा लढ्ढा यांचे अतिक्रमणधारकांना कडक निर्देश

**अमरावती/का.प्र.**

मनपा आयुक्त वर्षा लड्ढा यांनी नागपुरी गेट परिसर, ट्रान्सपोर्ट मार्केट परिसर, अग्निशमन केंद्र तसेच हबीब नगर येथील महानगरपालिकेच्या अधिकृत ओपन स्पेसची पाहणी करून अतिक्रमणाबाबत संबंधित विभागांना कडक निर्देश दिले.



पाहणीदरम्यान हबीब नगर येथील महानगरपालिकेच्या मालकीच्या ओपन स्पेसवर बांधण्यात आलेल्या वॉल कंपाऊंडच्या आत ११ जनावरे व ६ बोकड बांधून ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आले. संबंधित जनावरे तात्काळ जप्त करून महानगरपालिकेच्या गौरक्षण केंद्रावर जमा करण्यात आली. तसेच सदर जागेवरील अतिक्रमण त्वरित हटविण्याचे आदेश देण्यात आले.यावेळी आयुक्त वर्षा लड्ढा यांनी अतिक्रमणधारकांना स्पष्ट इशारा देत सांगितले की, महानगरपालिकेच्या जागेवरील अतिक्रमणे स्वतःहून त्वरित हटवावीत, अन्यथा महानगरपालिकेमार्फत जप्तीची कारवाई करून पुढील कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.

पाहणीदरम्यान अग्निशमन केंद्रावरील कर्मचाऱ्यांची उपस्थितीही तपासण्यात आली. कर्मचाऱ्यांनी त्यांना सोपविण्यात आलेली कामे वेळेत व पूर्ण जबाबदारीने पार पाडणे अपेक्षित असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले. कामात कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा सहन केला जाणार नसल्याचेही त्यांनी सांगितले.स्वच्छता विभागालाही त्यांनी कडक शब्दांत सूचना देत साफसफाईच्या कामात हलगर्जीपणा करू नये, प्रत्येक परिसर स्वच्छ व नीटनेटका ठेवावा, असे निर्देश दिले. रस्त्यावर कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश देत सर्व स्वास्थ्य निरीक्षकांनी जबाबदारीने काम करावे, असेही त्यांनी नमूद केले.

'सध्या ज्या पद्धतीने काम सुरू आहे ते समाधानकारक नाही. प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे व प्रभावीपणे पार पाडावी,' अशा शब्दांत आयुक्तांनी नाराजी व्यक्त केली.यावेळी अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, वैद्यकीय स्वच्छता अधिकारी डॉ. अजय जाधव, सहायक आयुक्त मनोज शहाळे, बाजार परवाना सहाय्यक आयुक्त मंगेश कडू, उपअभियंता विवेक देशमुख, उद्यान अधीक्षक अजय विंचुरकर, अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे, जनसंपर्क अधिकारी भूषण पुसदकर, ज्येष्ठ स्वास्थ्य निरीक्षक राजेश राठोड तसेच स्वास्थ्य निरीक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

## पेरणीच्या तोंडावर शेतकऱ्यांची कोंडी!

### खतांसह शेतीसाहित्य महाग शेतीपयोगी वस्तूंची कमतरता कारणीभूत

**दर्यापूर -** शेतीच्या मशागतची कामे सुरू असून लगेच खरीप हंगामाच्या पेरणीची तयारी सुरू असतानाच शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे ठाकले आहे. रासायनिक खतांच्या वाढलेल्या किमती, डिझेल दरवाढ तसेच शेतीपयोगी साहित्याच्या कमतरतेमुळे शेतकरी मोठ्या चिंतेत सापडला आहे. बियाणे, औषधे, पाईप, फवारणी यंत्रे व इतर साहित्य महाग झाल्याने पेरणीचे संपूर्ण गणितच बिघडले आहे. अनेक ठिकाणी खतांचा पुरेसा साठा उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना दुकानदारांकडे वारंवार चकरा माराव्या लागत आहेत. काही ठिकाणी कृत्रिम टंचाई निर्माण होत असल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत. दुसरीकडे डिझेलच्या वाढत्या किमतीमुळे ट्रॅक्टर मशागत, पेरणी व फवारणीचा खर्चही मोठ्या प्रमाणात वाढला आहे.आधीच निसर्गाच्या लहरीपणामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसमोर



आता महागाईचे नवे आव्हान उभे राहिले आहे. शासनाने खतांचा पुरेसा पुरवठा करावा, डिझेल दर कमी करावेत, तसेच शेतीपयोगी साहित्यावर अनुदान द्यावे, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. यंदाच्या हंगामात पेरणीपूर्वीच शेतकऱ्यांची सर्व बाजूंनी आर्थिक कोंडी होत असल्याचे चित्र ग्रामीण भागात पाहायला मिळत आहे.शेतकरी सर्व स्तरातून अहवाल दिन झाला असून केवळ निवडणुकीच्या काळात फसव्या आश्वासनांची खैरात ही नित्याची बाब झाली लोकप्रतिनिधींसह संबंधित विभाग हा आपल्या तोर्यात नेहमीसारखा असून शेतकरी हितार्थ कुठलाही ठोस निर्णय नसून पेरणीपूर्वी पुन्हा शेतकऱ्यांची निराशा दिसत आहे.

## श्री संत गजानन महाराज औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात रोजगार मेळावा

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभाग, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटर बुलढाणा आणि व्दारका बहुउद्देशीय ग्रामीण विकास संस्था संचालित श्री संत गजानन महाराज फार्मसी महाविद्यालय, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने श्री संत गजानन महाराज फार्मसी महाविद्यालय, बुलढाणा येथे आयोजित पडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



रोजगार मेळाव्याकरिता वैभव एन्टरप्राईझेस नागपूर, यशस्वी ग्रुप चिंचवड आणि फुलंब्री टेक्स्ट प्रा. लि. जालना यांच्या माध्यमातून ९ विविध आस्थापनामधील २४० पेक्षा अधिक रिक्त पदासाठी भरती प्रक्रिया राबविण्यात आली. यामध्ये २५० हून अधिक उमदवारांनी नोंदणी करुन मुलाखती दिल्या. त्यामधून ८२ यशस्वी उमेदवारांना ऑफर लेटर प्रदान करण्यात आले. मेळाव्याचे उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय बोरकर, उद्घाटक म्हणून डॉ. राजीव बोरकर, प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र बुलढाणाचे सहाय्यक आयुक्त गणेश बिटोडे, बावस्कर तसेच रोजगार कक्ष प्रमुख डॉ. शितल सिरसाठ उपस्थित होते. विशेष म्हणजे मुख्यमंत्री युवाकार्य प्रशिक्षण योजना आणि प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना याबाबत मेळाव्याच्या ठिकाणी स्वतंत्र स्टॉल उपलब्ध करुन देण्यात आला आणि उपस्थित उमेदवारांना योजनांविषयी सविस्तर माहिती देऊन त्यांची नोंदणी करुन घेण्यात आली. रोजगार मेळाव्याच्या यशस्वी आयोजनाबद्दल कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी समाधान व्यक्त करुन नियुक्तीपात्र विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्यात.

## आयआयएमसीत पत्रकारिता अभ्यासक्रमासाठी ३० मे पर्यंत करा अर्ज

**अमरावती/का.प्र.**

भारतीय जन संचार संस्थान (आयआयएमसी) मध्ये मराठी पत्रकारिता डिप्लोमा अभ्यासक्रमासाठी अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख ३० मे २०२६ पर्यंत वाढविण्यात आली असून प्रवेश परीक्षा ५ जून रोजी होणार आहे. प्रवेश अर्ज गूगल फॉर्म द्वारे किंवा आयआयएमसीच्या अमरावती कार्यालयात प्रत्यक्ष येऊन भरता येईल.

मराठी पत्रकारितेत पी. जी. डिप्लोमा एक वर्षाचा अभ्यासक्रम असून तो पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना पत्रकारिता आणि मीडियाच्या क्षेत्रातील रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होणार आहे. प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षा (एँं) घेण्यात येणार आहे. ही परीक्षा दिनांक ५ जून रोजी भारतीय जन संचार संस्थानच्या संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिसरातील पश्चिम क्षेत्रीय केंद्रावर आयोजित करण्यात येणार आहे.त्याचबरोबर पुणे आणि मुंबई येथे देखील परीक्षा केंद्र असेल. आयआयएमसीत प्लेसमेंट सुविधा उपलब्ध असून त्याचा लाभ अनेक विद्यार्थ्यांना झाला आहे. या माध्यमातून बरेच विद्यार्थी प्रसार भारती, आकाशवाणी, दूरदर्शन, भारतीय सूचना सेवा सह वृतपत्रे, खाजगी टीव्ही चॅनल, जनसंपर्क कंपनी तथा सरकारी आणि खाजगी क्षेत्रातील जनसंपर्क विभागात आज कार्यरत आहेत. मान्यताप्राप्त विद्यापीठातून कोणत्याही शाखेतील पदवी प्राप्त विद्यार्थी मराठी पत्रकारिता अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी अर्ज करू शकतात.जे विद्यार्थी त्यांच्या बॅचलर पदवीच्या अंतिम वर्षात किंवा सेमिस्टर परीक्षेत बसले आहेत किंवा जे विद्यार्थी परीक्षा देणार आहेत ते देखील अर्ज करण्यास पात्र आहेत. प्रवेश करीता वयोमर्यादेची अट असून अनारक्षित प्रवार्गासाठी २५ वर्ष, ओबीसी करीता २८ वर्ष तर अनुसूचित जाती / जमाती आणि दिव्यांग उमेदवारा करीता ३० वर्ष आहे. उमेदवारांनी प्रवेश अर्ज व गूगल फॉर्म लिंक करीता आयआयएमसीच्या अधिकृत वेबसाइट https://iimc.gov.in/language-courses-26-27 वर संपर्क करावा. प्रवेश प्रक्रिया संबंधी अधिक माहितीसाठी किंवा अडचणी संदर्भात डॉ. राजेश सिंह कुशवाहा (९४१५८६२३७७), डॉ. विनोद निताळे (९८६००४६७०६), यांच्याशी दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधावा. विद्यार्थ्यांना व्हॉट्सॲपद्वारे माहिती मिळवायची असल्यास सदर मोबाईल क्रमांकावर संदेश पाठवू शकतात, अशी माहिती संस्थानचे क्षेत्रीय संचालक डॉ. राजेश सिंह कुशवाहा यांनी दिली आहे.

# मणीबाई गुजराती हायस्कूलच्या कुमकुम मोहोडची सुवर्ण झेप

**अमरावती/का.प्र.**

चीनमधील Shanghai येथे नुकत्याच पार पडलेल्या Archery World Cup Stage २ स्पर्धेत भारतीय महिला रिकर्व्ह संघाने शानदार कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. या सुवर्ण विजेत्या महिला संघात अमरावती येथील कुमकुम अनिल मोहोड सोबत ऑलम्पिक चॅम्पियन दिपिका कुमारीचा समावेश असून, कुमकुमच्या या उल्लेखनीय यशामुळे अमरावती शहरासह शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. कुमकुम मोहोड ही मणीबाई गुजराती हायस्कूल आणि जुनियर कॉलेज अंबापेठ, अमरावती येथील इयत्ता ११ वी विज्ञान शाखेची विद्यार्थिनी आहे. कठोर परिश्रम, जिद्द आणि सातत्यपूर्ण उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर तिने आंतरराष्ट्रीय स्तरावर सुवर्ण पदक संपादन करून शाळेचे, अमरावतीचे आणि देशाचे नाव उज्ज्वल केले आहे. कुमकुमच्या या सुवर्ण यशामागे तिचे आई-वडीलांचे सातत्यपूर्ण प्रोत्साहन व पाठबळ महत्वाचे ठरले आहे. शाळेतील आर्चरी प्रशिक्षिका स्वाती बाळापुरे यांनी कुमकुमच्या मेहनतीचे व समर्पणाचे कौतुक केले. कुमकुम मोहोड हिच्या या ऐतिहासिक कामगिरीमुळे शाळेसह अमरावती विभागात आनंदोत्सवाचे वातावरण निर्माण झाले. गुजराती एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सुरेश राजा यांनी समस्त कार्यकारिणीच्यावतीने तिच्या या सुवर्ण झेपेसाठी अभिनंदनाचा वर्षाव करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. भारतीय महिला रिकर्व्ह संघाच्या या सुवर्ण यशामुळे देशाच्या क्रीडा क्षेत्रात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून,कुमकुम मोहोड हिने अमरावतीच्या शिरपेचात मानाचा सुवर्णमुकुट खोवल्यामुळे तिचे अभिनंदन करण्यासाठी शिक्षणमंत्री दादा भूसे यांनी शिक्षण विभागाच्यावतीने शाळेच्या मुख्याध्यापिका अंजली देव यांचे अभिनंदन केले व कुमकुमच्या भावी आयुष्याकरीता शुभेच्छा दिल्या.



## विद्यापीठाचा पॉवर लिफ्टगचा संघ घोषित

**अमरावती-** हिंदुस्तान युनिर्व्हसिटी, चेन्नई येथे ०३ ते ०८ जून, दरम्यान होणा-या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ पॉवर लिफ्टग (महिला व पुरूष) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.

महिला संघ-चमूंमध्ये सिताबाई कला महाविद्यालय, अकोलाची अश्विनी सोनवणे, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीची प्रियंका कुंडू, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीची इश्वरी नागापुरे व बाबाजी दाते महाविद्यालय, यवतमाळची आचल मेश्राम हिचा समावेश आहे. पुरूष संघ-चमूंमध्ये सिताबाई कला महाविद्यालय, अकोलाचा वैष्णव शिरसाळे व लोकेश माळी, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा स्वयम पवार स्व.ए.सी.ॲन्ड एम.एन. महाविद्यालय, कोंडाळाचा कार्तिक गभणे आणि विद्याभारती महाविद्यालय, अमरावतीचा प्रथमेश बोबडे याचा समावेश आहे. निवड झालेल्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण वर्ग सिताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथे २२ ते ३१ मे, दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे.

# जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील-प्रतापराव जाधव

## विद्यापीठ संचालित बुलढाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेजच्या नूतन इमारतीचे भूमिपूजन

**बुलढाणा/अमरावती**

बुलढाणा हा जिल्हा शैक्षणिकदृष्टा मागे असला तरी, आता जिल्ह्यात मॉडेल डिग्री कॉलेज, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि कृषी महाविद्यालयासारख्या संस्था उभ्या राहत आहेत. या शैक्षणिक व पायाभूत सुविधांमुळे जिल्ह्याचा कायापालट होणार असून, सर्वांगीण विकासासाठी आम्ही सर्व लोकप्रतिनिधी कटिबध्द आहोत, असे प्रतिपादन केंद्रीय आयुष (स्वतंत्र प्रभार) तथा आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांनी केले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संचालित बिरसिंगपूर येथील मॉडेल डिग्री कॉलेजच्या नूतन इमारतीचे भूमिपूजन ना. प्रतापराव जाधव यांच्या हस्ते पार पडले, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आ.संजय गायकवाड, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, वित्त व लेखा अधिकारी सीए पुष्कर देशपांडे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. व्ही. एच. नागरे, मॉडेल डिग्री कॉलेजचे मानद संचालक डॉ. ए.आर. म्हळसने, कार्यकारी अभियंता जे.एन. काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील तसेच बिरसिंगपूरच्या सरपंच वैशाली शिंदे, प्राचार्य डॉ. निलेश गावंडे, राजेंद्र पांडे, राजपूत आदी उपस्थित होते.केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव म्हणाले की, जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींच्या सातत्यपूर्ण प्रयत्नातून आज महाविद्यालयाच्या इमारतीच्या कामाला सुरुवात होत आहे. या



महाविद्यालयामुळे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी उत्तम सोय उपलब्ध होणार आहे. सुसज्ज शैक्षणिक व प्रशासकीय इमारतीसोबतच येथे स्विमिंग पूल, क्रीडांगण यांसारख्या आधुनिक सुविधा निर्माण केल्या जातील. यातून गुणवंत विद्यार्थी घडतील आणि जिल्ह्याचा नावलौकिक वाढेल. मॉडेल डिग्री कॉलेज हे सर्व कॉलेज करता आदर्श राहील. तसेच, सध्याच्या जागतिक युध्दजन्य परिस्थितीचा विचार करता, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या काटकसरीच्या आवाहनाचे सर्वांनी पालन करावे, असेही त्यांनी नमूद केले.आ.संजय गायकवाड यांनी आपल्या भाषणात सांगितले की, विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी बाहेरगावी जावे लागत होते. परंतु आता मॉडेल डिग्री कॉलेजमुळे जिल्ह्यातच गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध होणार असल्याचे सांगितले.भूमिपूजन सोहळ्याचे अध्यक्षीय भाषण विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.मिलींद बारहाते यांनी केले. यावेळी कंत्राटदार प्रतीक राजपूत व आर्किटेक्चर संजय देशमुख यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विद्यापीठाचे कार्यकारी अभियंता शशिकांत रोडे यांनी मान्यवर अतिथींना मॉडेल डिग्री कॉलेजच्या इमारतीच्या मॉडेलची सविस्तर माहिती दिली. सुरुवातीला छत्रपती संभाजी महाराज व कर्मयोगी श्री संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी, तर सूत्रसंचालन व आभार जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी केले. कार्यक्रमाला अभियंता शशिकांत रोडे, उपकुलसचिव विधी मंगेश जायले, प्राचार्य डॉ.गजानन जाधव, प्राचार्य डॉ. नितीन सांगोले, प्राचार्य डॉ. गायकी, विद्यापीठ प्राधिकारणीचे सदस्य, बुलढाणा शहरातील गणमान्य नागरिक, बिरसिंगपूर येथील रहिवासी तसेच विद्यापीठातील अभियांत्रिकी विभागातील कर्मचारी, मॉडेल डिग्री महाविद्यालयाचे प्राध्यापक तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

# कौटुंबिक वादाचा रक्तरंजित शेवट; पत्नीची हत्या करून पतीने केले विषप्राशन

## -टाकळी जहागीर हादरले; वृद्ध दाम्पत्यातील वादातून घटना

**अमरावती/प्रतिनिधी:-** नांदगाव पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील टाकळी जहागीर येथे शुक्रवारी (दि.१५) सायंकाळी कौटुंबिक वादाचा रक्तरंजित शेवट झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. कौटुंबिक वादातून पतीने पत्नीवर सब्बलने प्राणघातक हल्ला करून तिची हत्या केली आणि त्यानंतर स्वतःही विषारी द्रव्य प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला.

या घटनेत राजकन्या अर्जून सोनोने (वय ६०) यांचा मृत्यू झाला असून, आरोपी पती अर्जून नामदेवराव सोनोने (वय ७०) याच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी सायंकाळी सुमारे सहा वाजताच्या सुमारास अर्जून आणि राजकन्या सोनोने हे दोघेच घरी उपस्थित होते. त्यावेळी किरकोळ कारणावरून दोघांमध्ये वाद झाला. वादाचे रूपांतर अचानक हिंसक संघर्षात झाले आणि संतापाच्या भरात अर्जून सोनोने यांनी घरातील सब्बल उचलून पत्नीवर हल्ला केला.

डोक्यावर व शरीरावर गंभीर मार लागल्याने राजकन्या या जागीच रक्ताच्या थारोळ्यात कोसळल्या. पत्नी गंभीर जखमी



झाल्यानंतर अर्जून यांनीही विषारी द्रव्य प्राशन केल्याचे समोर आले.

घरातून आवाज येत असल्याने शेजारील नागरिक आणि कुटुंबातील सदस्यांना संशय आला. सुनेसह काही नागरिकांनी घराकडे धाव घेतली. मात्र, घराचे दार आतून बंद असल्याने काही काळ गोंधळ उडाला.

नागरिकांनी वारंवार हाक मारल्यानंतर अर्जून यांनी दार उघडले. आत प्रवेश करताच राजकन्या या रक्तबंबाळ अवस्थेत पडलेल्या दिसून आल्या, तर अर्जून यांची प्रकृतीही बिघडलेली होती. घटनेनंतर नागरिकांनी तत्काळ अर्जून सोनोने यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर गावचे पोलीस पाटील यांनी नांदगाव पेठ पोलिसांना ☞(पान २ वर)

# वाघ पकडणारा अधिकारी मेळघाटला

**वर्धा :** परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या पट्टेदार वाघांना पिंजराबंद करून शेतकऱ्यांना दिलासा देणारे वनपरिक्षेत्र अधिकारी निलेश रमेश गावंडे यांची धारणी मेळघाट येथे अतिक्रमण निर्मूलन विभागात बदली करण्यात आली आहे. गावंडे यांनी सहकाऱ्यांसह रात्रंदिवस जंगल पिंजून दोन वाघांना पकडण्याची धाडसी मोहीम यशस्वी केली होती. त्यामुळे समुद्रपूर परिसरातील ग्रामस्थांचा त्यांच्यावर मोठा विश्वास निर्माण झाला होता.

स्थानिक शेतकरी आणि शेतमजुरांची त्यांना मुदतवाढ द्यावी अशी जोरदार मागणी असतानाच त्यांची बदली झाल्याने वनवर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. आता नव्या अधिकाऱ्यांना वाढत्या मानव-वन्यजीव संघर्षात कितपत यश मिळते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# १७ वर्षीय मुलीचा १३ महिन्यात दोनवेळा बालविवाह

## -दोन्ही पतींसह सात जणांविरुध्द गुन्हा दाखल

**खल्लार/प्रतिनिधी:-** १७ वर्षीय मुलीचे १३ महिन्यात एकनव्हे तर तब्बल दोनवेळा बालविवाह लावण्यात आले. तिच्या दोन्ही पतींनी पिडीतेचे शोषण केले मात्र सद्या दोघांनीही तिला सोडून दिले. ही धक्कादायक घटना दर्यापूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत एका गावात समोर आली आहे. पिडितेच्या तक्रारीवरुन दर्यापूर पोलिसांनी (दि.१४) पिडितेच्या आई-वडिलांसह दोन्ही पती आणि सासरच्या मंडळींविरुध्द विविध कलमान्वये गुन्हे दाखल केले आहेत.

पिडित मुलगी जेमतेम १५ वर्षांची असतानाच २०२४ मध्ये तिचा पहिला बालविवाह लावून देण्यात आला होता. काही महिने पहिल्या पतीकडे ती राहीली, या काळात त्याने पिडीतेवर लैंगिक अत्याचार केले. काही महिन्याने मात्र पिडीतेचा पहिल्या पतीसोबत



वाद झाला. त्यामुळे ती माहेरी परतली. त्यावेळी मुलीच्या सावत्र पालकांनी तिचे समुपदेशन करण्याऐवजी वयाच्या अवघ्या १६ व्या वर्षी २०२५ मध्ये अकोला जिल्ह्यात तिचा दुसरा बालविवाह लावून दिला. दुसऱ्या पतीनेसुध्दा तिला काही दिवस घरी ठेवले. या काळात त्यानेही पहिल्या पतीप्रमाणेच अत्याचार करुन छळ केला. मात्र त्याच्यासोबतही पिडीतेचे पटत नसल्यामुळे ती पुन्हा पहिल्या पतीकडे आली. काही दिवस त्याच्याकडे राहीली. मात्र नंतर त्यानेही आता तू घरात राहू नको म्हणून घरातून निघून जाण्याबाबत सांगितले. त्यामुळे पिडीतेने दर्यापूर पोलिस ठाणे गाठून कैफियत सांगितली. तक्रारीच्या आधारे दर्यापूर पोलिसांनी पिडीतेसोबत बालविवाह व अत्याचार करणारे दोन्ही पती, दोघांचेही आई वडील, पिडीतेची आई व सावत्र वडील या सात जणांविरुध्द बालविवाह ☞(पान २ वर)

# NEET पेपरफुटी विरोधात युवक काँग्रेस आक्रमक

## -जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

**अमरावती/प्रतिनिधी:-** देशभरात गाजत असलेल्या NEET परीक्षा पेपरफुटी प्रकरणाचे तीव्र पडसाद अमरावती शहरात पाहायला मिळाले. या गंभीर प्रकरणाचा निषेध नोंदवण्यासाठी अमरावती जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सोमवारी जोरदार आंदोलन करण्यात आले. यावेळी संतप्त कार्यकर्त्यांनी केंद्र सरकार आणि शिक्षण विभागाच्या



कारभाराचा निषेध करत केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचे पोस्टर जाळून आपला रोष व्यक्त केला.

वैद्यकीय शिक्षणासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी NEET परीक्षा यावर्षी वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. पेपरफुटी आणि निकालातील अनियमितेमुळे लाखो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य अंधारात असल्याचे सांगत युवक काँग्रेसने केंद्र सरकारवर टीकेची झोड उठवली. शिक्षण क्षेत्रात सुरू असलेला हा भ्रष्टाचार थांबवून प्रामाणिक विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

या आंदोलनाचे ☞(पान २ वर)

# लक्झरी बसची दुचाकीला जोरदार धडक; नवविवाहित दाम्पत्याचा दुर्दैवी अंत

**अमरावती/प्रतिनिधी:-** आयुष्यभर एकमेकांच्या साथीने जगण्याची शपथ घेतलेल्या नवविवाहित दाम्पत्याचा संसार अवघ्या तीन महिन्यांतच संपुष्टात आला. बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वरुडा राष्ट्रीय महामार्गावर गुरुवारी (दि.१४) सायंकाळी झालेल्या भीषण अपघातात पुरण कौशल कोठार आणि त्यांची पत्नी वैष्णवी यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, नातेवाईकांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

मृत पुरण कोठार (वय २१) आणि वैष्णवी कोठार हे मूळचे पाळा दाभा परिसरातील रहिवासी





होते. तीन महिन्यांपूर्वीच दोघांचा विवाह मोठ्या उत्साहात पार पडला होता. नव्या आयुष्याची स्वप्ने रंगवत हे दाम्पत्य संसार उभा करण्याच्या तयारीत असतानाच नियतीने त्यांच्यावर क्रूर घाला घातला.

माहितीनुसार, गुरुवारी सायंकाळी पुरण आणि वैष्णवी हे ॲक्टिवा मोपेडने (एमएच २७ सीई ०२९१) बडनेऱ्यातील पवन नगर परिसरातून आपल्या गावी परत निघाले होते. वरुडा फाट्याजवळ राष्ट्रीय महामार्ग ओलांडत असताना अमरावतीकडून भरधाव वेगाने येणाऱ्या लक्झरी बसने (एमएच ३७ डब्ल्यू ८१११) त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.

धडक इतकी भीषण होती की, दोघेही काही अंतरावर फेकले गेले. अपघातानंतर घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तत्काळ मदतीसाठी धाव घेतली. गंभीर जखमी अवस्थेत दोघांनाही १०८ रुग्णवाहिकेद्वारे जिल्हा सामान्य ☞(पान २ वर)

# स्व-जणगणनेत तिवसा तालुक्यातील सुलतानपूर ठरले पहिले पूर्ण गाव



**तिवसा/प्रतिनिधी:-** भारत सरकारच्या आगामी स्व-जनगणना २०२७ उपक्रमाला तिवसा तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, तालुक्यातील मौजे सुलतानपूर हे गाव स्व-जनगणना प्रक्रिया शंभर टक्के पूर्ण करणारे पहिले गाव ठरले आहे. गावातील नागरिकांनी प्रशासनाच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत अल्पावधीत संपूर्ण माहिती नोंदवून हा मान मिळविला.

स्व-जनगणना प्रक्रियेत नागरिकांनी स्वतःहून कुटुंबीयांची माहिती ऑनलाइन व अधिकृत माध्यमातून भरून प्रशासनाला सहकार्य केले. ग्रामपंचायत, महसूल विभाग व स्थानिक प्रशासनाच्या समन्वयातून ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यात आली. त्यामुळे सुलतानपूर गावाचा तालुक्यात आदर्श निर्माण झाला आहे. या यशस्वी उपक्रमानिमित्त आयोजित कार्यक्रमाला तिवसा तहसीलदार मयूर कळसे, नायब तहसीलदार आशीष नागरे तसेच महसूल ☞(पान २ वर)

# सोलर पंप योजनेच्या नावाखाली लाखोंची फसवणूक

## -बुलढाण्यातील आरोपीविरुद्ध अमरावती ग्रामीण पोलिसांत गुन्हा

**अमरावती/प्रतिनिधी:-** महाराष्ट्र शासनाच्या 'मागेल त्याला सोलर' योजनेत जास्त क्षमतेचे (HP) सोलर पंप मंजूर करून देण्याचे आमिष दाखवत शेतकरी व ऑनलाईन सेंटर चालकाची तब्बल ४ लाख ७०२ रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी अमरावती ग्रामीण पोलिसांनी बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर येथील सुनिल विश्वेश्वर टाके (वय ४०) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

नांदगाव खंडेश्वर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी सुरज सुभाषराव आडकिने हे टोंगलाबाद नांदगाव खंडेश्वर येथील रहिवासी असून, ते बासस्थानाक



परिसरात 'सोमेश्वर झेरॉक्स अ‍ॅण्ड ऑनलाईन सेंटर' चालवितात. शासनाच्या विविध योजनांचे ऑनलाईन अर्ज भरण्याचे काम ते करतात. 'मागेल त्याला सोलर' योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना सोलरवर चालणाऱ्या मोटार पंपासाठी अर्ज भरले जात होते. या योजनेत सर्वसाधारण प्रवर्गातील शेतकऱ्यांना १० टक्के, तर अनुसूचित जाती-जमातीतील लाभार्थ्यांना ५ टक्के रक्कम भरावी लागत होती. उर्वरित रक्कम शासनाकडून अनुदानाद्वारे दिली जात होती. दरम्यान, ☞(पान २ वर)

# पोलीस आयुक्त राकेश ओला यांना पदोन्नती

## -डीआयजी रँकसह अमरावतीतच नियुक्ती कायम

### -डीसीपी गणेश शिंदे यांची मुंबई येथे बदली

**अमरावती/प्रतिनिधी:-** राज्य गृह विभागाने आज (दि.१५) पोलीस दलातील शेकडो वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आणि पदोन्नतीचे आदेश निर्गमित केले आहेत. यामध्ये अमरावती शहर पोलीस दलाच्या दृष्टीने



अत्यंत महत्त्वाचे फेरबदल झाले असून, पोलीस आयुक्त राकेश ओला यांना पदोन्नती देण्यात आली आहे.

सीपी राकेश ओला यांना डीआयजी (पोलीस उपमहानिरीक्षक) रँकवर पदोन्नती मिळाली असून, विशेष म्हणजे त्यांना अमरावती शहरातच पोलीस आयुक्त पदावर कायम ठेवण्यात आले आहे. त्यांच्या या पदोन्नतीमुळे अमरावती पोलीस दलात आनंदाचे वातावरण आहे.

दुसरीकडे, अमरावती शहराचे ☞(पान २ वर)

# धारणीत अवैध गोवंश मांस विक्रीवर पोलिसांची धाड

**१.९३ लाखांचा मुद्देमाल जप्त**

**धारणी/प्रतिनिधी:-** धारणी शहरातील कुरेशी मोहल्ला परिसरात अवैधरित्या गोवंश जातीच्या जनावराचे मांस साठवून विक्री केली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी धाड टाकून चार आरोपींना अटक केली. या कारवाईत सुमारे १ लाख ९३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

माहितीनुसार, १५ मे २०२६ रोजी धारणी पोलीस ठाण्याला गुप्त बातमीदारामार्फत कुरेशी मोहल्ला परिसरात अवैध गोवंश मांस विक्री सुरू असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार स्थानिक पोलीस कर्मचारी व आरसीपी पथकाने सकाळी ७.३० ते १०.३० या वेळेत संयुक्त कारवाई केली.

या कारवाईदरम्यान पोलिसांनी शेख वसीम शेख गफूर (वय ३८), शेख कादर शेख खैराती (वय ४५), शेख वाजीद शेख मेहमूद (वय ३२) आणि शेख अकरम शेख शकील (वय ३४, सर्व रा. वार्ड क्र. १६, कुरेशी मोहल्ला, धारणी) यांच्या ठिकाणावर छापा टाकला. छाप्यात आरोपींच्या ताब्यातून अंदाजे ३७० किलो गोवंश प्राण्याचे मांस, दोन लोखंडी तराजू, वजनाचे गोटे, दोन लाकडी ठोकळे, दोन लोखंडी कुऱ्हाडी, दोन सुऱ्या, मटण विक्रीतील रोख रक्कम तसेच मांस वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या दोन मोटारसायकली असा एकूण १,९३,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी धारणी पोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९९५ तसेच सुधारित अधिनियम २०१५ मधील कलम ५, ५(ब), ५(क) आणि ९(ब) अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अटक करण्यात आलेल्या चारही आरोपींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना एक दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. ☞(पान २ वर)

# प्रभाताई निस्ताने यांचे निधन

**धामणगाव रेल्वे/प्रतिनिधी:-** धामणगाव रेल्वे येथील प्रतिष्ठित नागरिक पंडितराव शंकरराव निस्ताने यांच्या मातोश्री प्रभाताई शंकरराव निस्ताने (वय ८३) यांचे वृद्धपकाळाने दुःखद निधन झाले.



त्यांची अंतिम यात्रा राहते घरून एलआयसी ऑफिस मागे लुनावत नगर येथून दिनांक १६/०५/२०२६ शनिवारला सकाळी १० वाजता हिंदू स्मशानभूमी येथे निघेल. त्यांच्या मागे एक मुलगा, चार मुली व नातवंड असा बराच मोठा हप्ता परिवार आहे.

# परतवाडा शहरातील आठवडी बाजारात पुन्हा आग

## -सरगम बिअर शॉपीतील साहित्य जळून खाक

**अचलपूर/प्रतिनिधी:-** परतवाडा शहरात सातत्याने आगीच्या घटना घडत आहेत. शुक्रवारी दि.१५ मे २०२६ रोजी सकाळी छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संकुल परिसरातील आठवडी बाजारात असलेल्या 'सरगम बिअर शॉपी'ला अचानक आग लागल्याची घटना घडली. प्राथमिक माहितीनुसार विद्युत घर्षणामुळे (शॉर्ट सर्किट) ही आग लागल्याचे सांगण्यात येत आहे.आग लागल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली.



दुकानातून धूर व आगीचे लोळ बाहेर येत असल्याचे पाहून नागरिकांनी तत्काळ अग्निशमन विभागाला माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे बंब घटनास्थळी दाखल झाले आणि जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली. या आगीत दुकानातील मोठ्या प्रमाणावर साहित्य जळून खाक झाले असून लाखो रुपयांचे नुकसान ☞(पान २ वर)

# नामांकित शाळेतील इयत्ता पहिलीच्या प्रवेश प्रक्रियेला तात्पुरती स्थगिती

## -अंजनगाव सुर्जी पंचायत समिती गटशिक्षणाधिकाऱ्यांचे आदेश

### रयत प्रमुख राहुल कडू यांनी केली होती तक्रार

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधी:-** अंजनगाव सुर्जी शहरातील नामांकित शाळेत इयत्ता पहिलीच्या प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या लकी ड्रॉ प्रक्रियेविरोधात रयत चे राहुल कडू यांनी गटशिक्षण अधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल केल्यानंतर, शाळेची संपूर्ण प्रवेश



प्रक्रिया तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे. या प्रकरणामुळे स्थानिक पालकांमध्ये मोठी चर्चा आणि असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.

> तक्रारींच्या आधारे सीताबाई संगई प्राथमिक शाळेची इयत्ता पहिलीची प्रवेश प्रक्रिया तात्पुरती थांबविण्याचे आदेश दिले असून शासनाच्या नियमानुसार पारदर्शक पध्दतीने प्रवेश प्रक्रिया राबविली जाणार आहे.
>
> **-शिला आठवले,** गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती अंजनगाव सुर्जी

रयत प्रमुख राहुल कडू यांचेनुसार, दि. १२ मे रोजी गटशिक्षण अधिकारी, पंचायत समिती अंजनगाव यांना दिनांक ११ मे २०२६ रोजी सिताबाई संगई प्राथमिक शाळेत इयत्ता पहिलीच्या प्रवेशासाठी लकी ड्रॉ (लॉटरी) पद्धतीने प्रक्रिया राबवण्यात आली. मात्र या ड्रॉमध्ये केवळ १४ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करण्यात आले.शाळेला तीन तुकड्यांची परवानगी आहे.परंतु गेल्या अनेक वर्षांच्या अनुभवावरून शाळेत इयत्ता पहिलीला १५० ते २०० विद्यार्थ्यांचे ☞(पान २ वर)

# उन्हाच्या तडाख्याने दर्यापूरातील रस्ते ओस

## बाजारपेठेतही शुकशुकाट



**खल्लार/प्रतिनिधी:-** दर्यापूर शहरात दिवसेंदिवस वाढत असलेल्या तापमानाने नागरिक हैराण झाले असून कडक उन्हाच्या तडाख्यामुळे जनजिवन विस्कळीत झाले आहे. दुपारच्या वेळेत अक्षरश अंगाची लाही लाही होत असल्याने नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळले असून शहरातील मुख्य रस्ते आणि बाजारपेठांमध्ये शुकशुकाट पाहायला मिळत आहे.नेहमीच वाहनांनी आणि नागरिकांच्या गर्दीने गजबजलेले दर्यापूर शहर दुपारच्या सुमारास ओस पडलेले दिसत आहे.शहरातील मुख्य चौकांमध्ये वाहनांची संख्या कमी झाली असून बाजारपेठेत ग्राहकांची वर्दळ घटल्याने अनेक दुकानदार रिकामे बसले असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. वाढत्या उकाड्यामुळे बाजारपेठेतील व्यवहारांवरही परिणाम जाणवत आहे.कडक उन्हाचा सर्वाधिक फटका विद्यार्थ्यांना बसत असून महाविद्यालये व खासगी क्लासेसला ये-जा करताना विद्यार्थ्यांची ☞(पान २ वर)

# जिल्हाधिकाऱ्यांकडून संत्रा बागेतील आधुनिक एआय तंत्रज्ञानाची पाहणी

**अमरावती/प्रतिनिधी:-** कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने आधुनिक संत्रा बाग व्यवस्थापनाला बळकटी देण्यासाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी मोर्शी तालुक्यातील एआय आधारित संत्रा प्रात्यक्षिक प्रकल्पाला प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. सिट्रस इस्टेट उमरखेड अंतर्गत या नाविन्यपूर्ण प्रकल्पाची माहिती त्यांनी जाणून घेतली.



मोर्शी येथील प्रगतशील शेतकरी नवीन पेठे यांच्या शेतावर हा प्रयोग राबविला जात आहे. यावेळी ☞(पान २ वर)

# चांदूर रेल्वे हद्दीत अवैध देशी दारू वाहतूक उघड

**७४ हजारांचा मुद्देमाल जप्त**

**अमरावती/प्रतिनिधी:-** चांदूर रेल्वे पोलीस ठाण्याच्या हद्दीत स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीण यांनी अवैध देशी दारू वाहतुकीवर कारवाई करत दोन आरोपींना ताब्यात घेतले. या कारवाईत मोठ्या प्रमाणात देशी दारूचा साठा आणि मोटारसायकल असा एकूण ७४ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. मिळालेल्या माहितीनुसार, दि. १४ मे २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक चांदूर रेल्वे परिसरात पेट्रोलिंग करत असताना गोपनीय माहिती प्राप्त झाली होती. त्यानुसार अंजनगाव बारी ते मांजरी म्हसला रोडवर सापळा रचण्यात आला. दरम्यान, दोन संशयित इसम मोटारसायकलवरून विनापरवाना देशी दारूची वाहतूक करताना पोलिसांच्या हाती लागले. तपासणीदरम्यान त्यांच्या ताब्यातून ९० एमएलच्या ३०० देशी दारूच्या बाटल्या, १८० एमएलच्या ९६ बाटल्या तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेली हिरो झूम मोटारसायकल जप्त करण्यात आली. या प्रकरणी आरोपी स्वप्निल विरेंद्र बेथारिया (वय ३८, रा. राधा सिटी, अमरावती) आणि भूषण किसनराव तायडे (वय ४५, रा. अंजनगाव बारी) यांच्याविरुद्ध महाराष्ट्र ☞(पान २ वर)